
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १३७६




REFBK-0012290

दा.सं.
१२२९०

निर्वाचित
१९५८

अनुक्रम ३२८.६३ वि: नि. कादंबरी
क्रमांक ......१३८१५..... नों: दि: २४.११.८२

# जवानांचा जीवनधर्म

☆

REFBK-0012290

नारायण हरि आपटे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२२९०

एकमेव विक्रेते
हिन्दुस्थान साहित्य
३०१ शनिवार, मोतीबाग, पुणें २

प्रकाशिका :
**सौ. सरस्वतीबाई आपटे**
आपटे आणि मंडळीकरितां
कोरेगांव ( जि. सातारा )

☆

सर्व हक्क प्रकाशिकेकडे

☆

**मूल्य तीन रुपये**

वेष्टन-चित्र
प्रभाकर जोशी

☆

आवृत्ति पहिली
१ ९ ६ २

☆

मुद्रक :
**रा. ना. सरनाईक,**
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार पेठ,
पुणें २

*लोकमान्य बाळ गंगाधर टिळक*
*ह्यांच्या पवित्र स्मृतीला*
*हें पुस्तक*
*अत्यंत श्रद्धापूर्वक अर्पण —*

लोकमान्य,

इ. स. १९१५ मध्यें आपला **गीतारहस्य** ग्रंथ वाचण्यांत आला. पुढें आपलें दर्शनहि घेतलें. मनाला थोडी धन्यता वाटली.

त्या वेळीं ह्या गोष्टी न घडत्या तर हा पामर जीव स्वतःच्या निष्क्रिय व निष्फल जीवन-प्रवाहांत कोठें वाहत गेला असता, काय सांगावें !– पण आपल्या **गीतारहस्यानें** मला फार चांगलें मार्गदर्शन केलें. कांहीं तरी मार्गाला लागलों.

तेव्हांपासून आतांपर्यंत मी त्याच प्रकाशांत वाटचाल करीत आहें. अन्तापर्यंत हें असेंच चालावें, अशी इच्छा आहे.

आपला आशीर्वाद असावा.

आपल्या पदीं
सदैव नम्र असलेला,

कोरेगांव. ( सातारा ) *नारायण हरि आपटे*

* * *

## प्रास्ताविक

महाराष्ट्रांतील प्रत्येक तरुणानें स्वावलंबी, कर्तृत्ववान्, पराक्रमी व नामवन्त व्हावें व भारताच्या संघराज्यांत, महाराष्ट्राचें नांव अग्रभागीं असावें असा प्रयत्न मोठ्या उत्साहानें व आग्रहपूर्वक करावा असा या लेखमालेचा प्रमुख हेतु आहे.

या पूर्वी इ. स. १९५३ सालीं मुंबईस निघणाऱ्या प्रसिद्ध **वसन्त** मासिकांत ही लेखमाला त्रोटक स्वरूपांत प्रसिद्ध झाली होती व त्याच वेळीं ती लोकप्रिय झाली होती. अनेक सुविद्य पालकांनीं व शिक्षक-प्राध्यापकांनीं ती पुस्तकरूपानें काढण्याबद्दल लेखकास त्याच वेळीं सुचविलें होतें. प्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ डॉ. ग. श्री. खैर यांनीं लेखमाला वाचून कांहीं सुंदर सूचनाहि केल्या होत्या. हें नवें संस्करण त्यामुळें पुढें येत आहे. स्नेहपूर्वक केलेल्या सहाय्याबद्दल मी 'वसन्त'चे संपादक श्री. दत्तप्रसन्न काटदरे व डॉ. खैर यांचा अत्यंत कृतज्ञ आहें. तूर्त एवढें पुरें.

कोरेगांव,
जि. सातारा.

*नारायण हरि आपटे*

★ ★ ★

## विचारसूत्रांचा अनुक्रम


| | |
|---|---|
| स्वयमेव मृगेन्द्रता ! | १ |
| व्याख्या व लक्षणें | ५ |
| जीवन जगण्याचें तंत्र व मंत्र | १५ |
| जीवन जगण्याचें कार्यक्षेत्र | २३ |
| कार्यक्षेत्राचें तीन भाग | ३२ |
| स्वतःला ओळखा— नंतर हळूहळू शिकवा | ४३ |
| लोकशाहीचा कारभार : त्यांत जवानांचें स्थान | ५१ |
| जवानांचें भाग्य व भांडवल | ६० |
| लौकिक व्यवहारांत— | ७३ |
| जीवनधर्मांतील पथ्यापथ्य-विचार | ८३ |
| जवानांचा संगतपरिवार | ९३ |
| जवानांच्या पौरुषाचा कस ! | १०१ |
| जीवनांत धर्मनिष्ठेचें महत्त्व | १०९ |
| समारोप | ११८ |
| परिशिष्ट | १२० |


★ ★ ★

# जवानांचा जीवनधर्म

*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२२

*विचारसूत्र पहिलें*

## स्वयमेव मृगेन्द्रता !

जवानांनो,

आतां तुम्ही तारुण्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलां आहां. मोठी भाग्याची गोष्ट आहे ही. यापुढें स्वतःचें जीवन स्वतंत्रपणें जगण्याची अपूर्व संधि तुम्हांला लाभलेली आहे. तुमच्या हिताची काळजी वाहिलेले तुमचे आप्त व गुरुजन तुमच्या पाठीशीं अद्यापि उभे आहेत. त्यांच्या आशीर्वादाचा हात तुमच्या मस्तकीं आहे. चला, उत्साहानें व धैर्यानें पुढें सरा. नव्या जीवनाचीं कर्तव्यें समजून घ्या आणि यशोमंदिराकडे चाललेल्या मार्गाला लागा.

ध्यानांत असूं द्या. तरुणपिढी, मागें असणाऱ्या वडील पिढीचें फार मोठें अशास्थान आहे ! या वडील पिढींत तुमचे मातापिता आहेत. गुरुजन आहेत. समाजधुरीण आहेत. राष्ट्रपुरुषहि आहेत ! म्हणून म्हणायचें : तुम्ही सर्वांचें आशास्थान आहां.

तुमचें उसळतें तारुण्य, निर्भय मनोवृत्ति, धावमान् गति आणि प्रफुल्लित मुद्रा पाहतांच मनांत येतें कीं, तुमच्या दृष्टीपुढें कांहीं उच्च ध्येय असलें पाहिजे. आणि तुमच्या आशा-आकांक्षाहि त्या तोलाच्या असल्या पाहिजेत.

तरुणांचें हें मानसचित्र खरेंच मोठें स्पृहणीय आहे. कोणाहि माता–पित्याला असेंच वाटतें : " पुत्र विजयी आणि पंडित। शतायुष्यी भाग्यवंत। " असा व्हावा. तेव्हां जवान मित्रांनो, त्यांची ही मनोवांच्छा सिद्धीस नेणें तुमच्या हातीं आहे हें सांगायला का हवें ?– याकरितां तुम्ही आपला जीवनधर्म समजून घ्या नी तडातडीं कार्याला लागा.

यासंबंधीं आपलें पहिलें सूत्र आहे : स्वयमेव मृगेन्द्रता ! काय बरें याचा अर्थ ?– पुढील सुभाषित पाहा.

*नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने ।*
*विक्रमार्जितसत्त्वस्य स्वयमेव मृगेन्द्रता ॥*

अर्थ स्पष्ट व सुलभ आहे. सिंह पशूंचा राजा ! म्हणून त्याचें नांव मृगेंद्र ! हें राजपद त्याला कोणीं दिलें ? त्याचा राज्याभिषेक केव्हां झाला ?– छे: ! तसें कांहींच घडलें नाहीं. न कसला अभिषेक, न कसला संस्कार ! पण सिंहाचा पराक्रमच असा; मृगेन्द्रता त्याच्याकडे आपोआप धांवून आली ! स्वतःच्या पराक्रमानें तो राजपद पावला !

तरुणांनीं हें मर्म ध्यानीं घ्यावें. आपल्या जीवितकार्याचा मार्ग निश्चित करावा. आपल्या भोंवतालच्या जगांत मानास्पद व्हावयाचें असेल तर अमोघ कर्तृत्व गाजवणें हाच एक सरळ मार्ग. मात्र, ही गोष्ट सहजसाध्य नाहीं, तडकाफडकीं होण्यासारखें नाहीं, याचें स्मरण ठेवावें. जगाला स्वतःचें महत्त्व व श्रेष्ठत्व पटविणें म्हणजे कातळ शिळेंतून सुंदर मूर्ति निर्माण करणें ! घाव चुकतां कामा नये. हाताला अपाय होतां कामा नये !

जवानांनो, स्वतःच्या भोंवतालचें जग नी त्याची रहाटी सहज अवलोकन करा. विचारांतीं तुम्हांला दिसून येईल कीं, त्या कार्यक्रमांत कणाला व क्षणाला अत्यंत महत्त्व आहे. कणाकणानें पर्वतांची रचना झाली आहे ! क्षणाक्षणानें पुढें जाणारा काल युगें निर्माण करीत आहे ! यांत कुठेंहि घाई नाहीं. उलटपक्षीं दिरंगाईहि नाहीं. सारें कांहीं समधात असून त्यांत एक विशेष प्रकारची तालबद्धता आहे. हा सृष्टिनियम ध्यानीं घेऊन कार्योत्सुक तरुणानें आपलें जीवन पडताळावें व जीवनधर्म समजून घ्यावा.

यांत चांगलें मार्गदर्शन होणें आवश्यक आहे, नाहीं का ? मग जवान मित्रांनो, दिवंगत व विद्यमान अशा थोर लोकांचीं चरित्रें वाचणें व अभ्यासणें हा एक सहजसाध्य उपाय आहे. आपल्या अलौकिक कर्तृत्वानें थोर पदास चढलेल्या स्त्री-पुरुषांची मालिका लक्षांत घ्या आणि त्यांपैकीं कोणाचेंहि चरित्र थोड्या आस्थेनें अभ्यासा. तुमच्या हें ध्यानीं येईल कीं, त्या त्या थोर लोकांनीं स्वतः होऊन स्वीकारलेली जबाबदारी केवढीहि लहान-मोठी

वा महत्त्वाची असो, ती एकदम कवटाळण्याचा अट्टाहास त्यांनीं केला नाहीं. कण व क्षण यांना किती महत्त्व आहे, हें आधीं ध्यानीं घेतलें. नंतर कार्याला हात घातला.

पुन्हां थोरांचीं चरित्रें असें स्पष्ट सांगतात कीं, सिंहत्व प्राप्त होणें शब्द-पांडित्यांत नाहीं. शब्दशौर्य गाजवूनहि तें मिळत नाहीं. आधीं स्वतःच्या आंवाका जाणला पाहिजे. मग त्यावर मनोराज्य. आणि मग यशःसिद्धि लाभण्याकरितां तपस्या ! सोपानपरंपरा आहे ही !

स्वतःचें असें कांहीं निश्चित ध्येय, त्यास अनुरूप असे आचार-विचार, त्याकरितां अविश्रान्त परिश्रम करण्याची तयारी, मग त्यांत आरंभीं आरंभीं येणारीं अपयशें हंसतमुखानें स्वीकारण्याइतका धिमेपणा, किंवा यश आल्यास नम्रपणा आणि श्रेय हस्तगत होईपर्यंत आवश्यक अशी चित्ताची समता या गोष्टी ज्यांना साधतात, त्यांच्याकडे त्यांनीं अपेक्षिलेली मृगेन्द्रता चालून येते !

प्रत्येक जवानानें हें समजून असावें कीं, मनोराज्य नी त्यांतून निर्माण होणारी श्रेयःसिद्धि यांतील अंतर दांडगें आहे. पण जसा प्रयत्न तसें त्याचें फल आणि भोंवतालचें गुणग्राहक जग अल्प स्वल्प यशाचेंहि कौतुक करतेंच करतें.

होतकरू तरुणांना हा आधार फार मोठा आहे.

आपल्या शक्ति-बुद्धीप्रमाणें जीवनधर्म समजून घेणें आणि तो प्रत्यक्ष आचरून दाखविणें हें कर्म मोठें कठिण तर खरेंच; पण तें अमक्याला साधेल आणि अन्य कोणाला साधणार नाहीं, असें मात्र नाहीं. जीवन पराक्रमी करणें यांत लिंगभेद, जात-गोत, वय, किंवा बरीवाईट परिस्थिति यांपैकीं कोणताहि अडथळा येत नाहीं. स्वयमेव मृगेन्द्रता ! ही गोष्ट निश्चित आहे.

या संबंधांत आणखी एक गोष्ट लक्षांत घेणें अत्यावश्यक आहे. सिंह स्वपराक्रमानें पशूंचा राजा होतो, हें उदाहरण माणसाच्या पराक्रमाला मर्यादित स्वरूपांत लागू पडतें, हें ध्यानांत घेतलें पाहिजे. सिंह पराक्रमी खरा, पण मृगेन्द्रता मिळविण्यापलीकडे निसर्गतःच त्याला कांहींच करतां येत नाहीं. या दृष्टीनें मनुष्य हा अगदीं एकमेव व आगळा प्राणी आहे.

थोडा विचार केला कीं, आपणांस हें स्पष्ट दिसून येतें. मनुष्य व मनुष्येतर प्राणी किंवा सबंध जीवकोटी या दोहोंत महान् अन्तर आहे! साऱ्या जीवांना त्यांच्या त्यांच्या शरीररचनेप्रमाणें ज्ञानेंद्रियें व कर्मेंन्द्रियें आहेत, मेंदू आहे, रागलोभादि विकारहि आहेत! पण माणसानें आपल्या बुद्धिबलानें जो चमत्कार करून दाखविला आहे त्याला तोड नाहीं! उत्क्रान्तीच्या दृष्टीनें मानवेतर जीवसृष्टि मूल स्वरूपांतच नांदते आहे! याच्या उलट मानवाची प्रगति अवलोका. त्याची शरीररचना, त्यांत सामावलेलें एवढें तेवढें बल आणि सबंध विश्वाला गवसणी घालणारें त्याचें बुद्धि-सामर्थ !—तुलना होऊंच शकत नाहीं कशाशींहि!

कालौघांत गडपच्च झालेला इतिहास असें सांगतो. इतर वन्य व हिंस्र पशूप्रमाणेंच मनुष्यरूपानें अवतरलेला द्विपाद या सृष्टींत वावरत होता. सिंह, वाघ, हत्ती यांच्या बलापुढें माणसाचें शारीरिक बल अगदींच तुच्छ होतें! परंतु त्याला लाभलेली ती बुद्धि, त्याची मेधाशक्ति, डोळे, कान, नाक इत्यादि ज्ञानेंद्रियांनीं जाग्रत झालेली आकलनशक्ति आणि प्रेरक विचार-शक्ति या सर्वांच्या समुच्चयानें तो किती अल्पकालांत पुढें सरकला! दिग्विजयास निघालेल्या सम्राटाप्रमाणें त्यानें निसर्गावर व प्राणिसृष्टीवर अफाट विजय मिळविले! परमेश्वराप्रमाणेंच तो जगाचा स्वामी झाला!

—आणि आज!—त्यानें परमेश्वरशक्तीशीं स्पर्धा चालविलेली आहे! विजयमालांचा खच त्याच्याभोंवतीं पडला आहे!

जवान मित्रांनो, ही वस्तुस्थिति ध्यानीं घ्या. मनुष्ययोनींत आपला जन्म याचें स्मरण ठेवा आणि आपणहि कांहीं ध्येय मनाशीं ठेवून कांहीं श्रेयस्कर करावें, अशी आकांक्षा धरा.

पुन्हां एकवार स्वयमेव मृगेन्द्रता या वचनाचा अभ्यास करा!—उत्तिष्ठ! उत्तिष्ठ!!

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32043 वि:
क्रमांक नों दि:

*विचारसूत्र दुसरें*

# व्याख्या व लक्षणें

स्वयमेव मृगेन्द्रता म्हणजे काय ?—याचा ऊहापोह इष्ट तेवढा करून आपण या विषयाचा उपन्यास केला. यावरून कोणाहि महत्त्वाकांक्षी तरुणाला जीवनांत यश व लोकांत मान्यता मिळविणें असल्यास त्याला स्वावलंबनानेंच सर्व कांहीं शक्य आहे, अन्य मार्ग नाहीं, एवढें सिद्ध झालें. आतां या लेखांत *जवानांचा जीवनधर्म* या नांवाची व्याख्या व लक्षणें आपणास समजून घ्यावयाचीं आहेत.

तीन शब्द आपल्यापुढें आहेत. जवान. जीवन. धर्म. अर्थात् यासंबंधीं तीन प्रश्न आपणांस सुचतील.

जवान कोणाला म्हणतां येईल ?

जीवन म्हणजे काय ?

धर्म कशाला म्हणतात ?

क्रमानें विचार करूं. पहिला प्रश्न : जवान कोणाला म्हणतां येईल ?—सोपें उत्तर : तारुण्यांत पदार्पण केलेला मनुष्य. पण ह्या व्याख्येनें अर्थ कळला तरी मनाचें समाधान होणार नाहीं. कांहीं तरी अपुरें वाटेल. लगोलग मनांत येईल : वयांत आलेला प्रत्येक तरुण जवान म्हणवून घेण्यास पात्र असतो का ?—आणि मग आपल्याला जवान शब्दावर थोडा निराळा विचार करावा लागेल.

भाषेंत समानार्थी शब्द पुष्कळ असतात. पण त्यांत कांहीं शब्दांना वैशिष्ट्य असतें. जवान शब्द त्यांपैकीं आहे. भाषेचा संकेत म्हणा व सर्व-साधारण समजूत म्हणा, जवान शब्द उच्चारला कीं त्याला कांहीं वजन आहे असें मनांत येतें. त्यांत एक विशेष जोम आहे, असें प्रत्ययास येतें.

पुष्कळदां आपल्यापुढून जाणाऱ्या तरुणांच्या झुंडींत एखाद्या तरुणाकडे अंगुलीनिर्देश करून आपण सहज म्हणतों : " तो जवान पाहिलांत—"

त्या वेळीं त्या तरुणाविषयीं आपण कांहीं गौरवपूर्ण सांगूं–बोलूं इच्छितों असा भाव स्पष्ट प्रगट होतो. जवान शब्दाची हीच मौज आहे. तो एखाद्या पदवीप्रमाणें मोठा सूचक आहे. सरसकट सर्व तरुणांना तो लावतां येत नाहीं. ज्या तरुणांत कांहीं तगडेपणा आहे किंवा कांहीं कर्तृत्वशीलता आहे त्यालाच आपण जवान म्हणून दर्शवितों.

यावरून जवान शब्दाची विस्तृत व्याख्या करणें झाल्यास असें म्हणतां येईल—

निकोप व सुदृढ प्रकृति, कृतिवृत्तींत बुद्धीची चमक व धडाडी, प्रबल महत्त्वाकांक्षा, मुद्रेवर खेळकर हास्य, सभ्यतेची जाणीव, प्रयत्नशीलता व कष्टाची आवड, बरीचशी आढ्यता व तापटपणा, जुन्या-नव्या गोष्टींचा वा विचारांचा एकदम तिटकारा किंवा वृथा अभिमान, केव्हां स्वमताविषयीं आग्रह व त्याच वेळीं समजुतीनें घेण्याची तत्परता, कुठें तरी विलक्षण श्रद्धा किंवा भारी अविश्वास इत्यादि गुणावगुणांची सरमिसळ वा प्रकर्ष ज्या तरुणांच्या ठायीं आढळतो, त्यांना आपण जवान शब्दानें संबोधतों. तात्पर्य, स्फूर्ति, जोम व उच्छृंखलता हें जवानीचें प्रतीक असतें. वडील माणसांना त्याचा राग येतो. कौतुकहि वाटतें. मग आपण त्या जवानाविषयीं अनुकूल बोलतों व प्रतिकूलहि.

जवानाचें हें उभयविध चित्र कांहींसें विलक्षण आहे यांत शंकाच नाहीं. पण त्यांतच त्याचें उज्ज्वल भवितव्य गुरफटलेलें असतें !— सर्वच जवानां-विषयीं असें म्हणतां येईल असें नाहीं. आंब्यांच्या आढींतील कांहीं चांगले आंबे एकाएकीं डागळलेले आढळतातच. तरुणांच्या जीवनाला हाच नियम लागूं आहे.

कोणाहि जवानाचें मूल्यमापन करतांना आपण एवढें ध्यानांत घ्यावयाचें कीं, व्यक्तीच्या ठिकाणीं गुणावगुणांचें मिश्रण आहे. पूर्ण निर्दोषत्व कुठेंच नाहीं. शिवाय जे गुण दोषास्पद वाटतात ते सर्व वेळां तसेच असतात असें नाहीं. अहंकार, स्वच्छंदी वृत्ति, आग्रही असणें, शंका घेणें, अश्रद्धा बाळगणें व चिकित्सा करणें इत्यादि स्वभावविशेष टोंचणारे–खुपणारे–असले तरी

त्यांना एकदम त्याज्य मानणें फारसें सुसंगत होणार नाहीं. थोडा विचार केल्यास असें दिसून येईल कीं, जीवनांत पुढें सरू पाहणाऱ्या व्यक्तीच्या अंगीं कांहीं तिखट गुण असणें आवश्यक आहे. जवानांच्या अंगीं तर ते असावेतच.

आणखी एक गोष्ट. ज्ञान हें स्वभावतःच कांहींसें खोडकर व अवखळ आहे. त्याला सत्य शोधावयाचें असल्यामुळें मतामतांच्या गलबल्याला वा चकचकाटाला तें मुळींच भाळत नाहीं. भीतहि नाहीं. ठराविक आचारां-विचारांचीं बन्धनें त्याला नको असतात. त्यामुळें बाबा वाक्यं प्रमाणम् ही आज्ञाधारकता त्याला भावत नाहीं.

ज्ञानाची ही खोड ध्यानीं घेऊन आपण जवानांच्या गुणावगुणांकडे पाहिलें पाहिजे. तरुण मंडळींची अश्रद्धा व स्वतंत्र विचारांची धडक यांत मोडते. निर्बुद्ध आज्ञापालन व प्रवाहपतितत्व आचरण्यास सोपें असलें व ठराविक चाकोरींत तें नीट बसत असलें तरी जागरूक मनाला व ध्येयप्रवणतेला तें खपत नाहीं. म्हणून जवानांच्या आचारांविचारांतील ताजेपणा व कडकपणा वडील माणसांनीं व गुरुजनांनीं कौतुकास्पद मानावा. उगीच रागावणें व खिन्न होणें प्रशस्त नाहीं.

मात्र जवान मित्रांनो, तुम्हींहि आपलें उत्तरदायित्व नीट जाणलें पाहिजे. आदर कुठें राखायचा व तुच्छता कुठें दाखवावयाची ? विनोद केव्हां करावयाचा व कुचाळी कोठवर न्यावयाची ? आणि मोडतोड करतांना तडजोड कां करावयाची याचें तारतम्य तुम्ही राखलें पाहिजे. हें अवधान न ठेवाल तर, तुमचे तिखट गुण तुम्हांला नडवतील व तुमच्या कर्तृत्वाला घृणा लागेल ! सावधान, सावधान !

आतां जवान शब्दाचा एक नवा प्रयोग होऊं पाहतो आहे. तोहि विचारांत घेणें योग्य होईल. इंग्रजी भाषेंत Cadet असा एक शब्द आहे. तरुण सैनिक असा याचा भावार्थ आहे. आपल्या स्वतंत्र भारताच्या लष्करी शिक्षणांत Cadet म्हणजे जवान असें मानलें जातें. आपल्या चालू विवेचनांत हा नवा अर्थ आणखी चपखल बसतो.

जवान म्हणजे तरुण सैनिक ! खाकी वेशांतील ताठ, चपल, सावध, आज्ञाधारक, संघशक्तीनें कार्य करणारा—किती गुण सांगावे ! देशाच्य

रक्षणाकरितां, सार्वजनिक सेवेकरितां आणि नाठाळ शत्रूला वचक बसविण्याकरितां असल्या जवानांची ( तरुण सैनिकांची ) केवढी आवश्यकता आहे हें काय सांगायला पाहिजे ?

तात्पर्य, जवान व त्यांची जवानी यांची व्याख्या व लक्षणें अशीं आहेत. यासंबंधीं आणखी पुष्कळ विचार पुढें करावयाचा आहे. म्हणून आपण आतां ‘ जीवन ’ या शब्दाकडे वळूं.

जीवन म्हणजे काय ? असा प्रश्न विचारण्यांत आला तर आपण काय उत्तर देऊं ?– आपण जन्माला येतों, जगतों, काहीं बरेंवाईट उपभोगितों व आयुष्य संपतांच कालौघांत नाहींसे होतों. याचें नांव जीवन. व्याख्या सरळ व अचूक. पण असल्या ठराविक जगण्या–मरण्याला जीवन म्हणतां येईल ?–इतर प्राणिमात्रांना लागू असणारा हा नियम मानवी जीवनाला लावतां येईल ?–मानवी जीवनाला एवढाच अर्थ आहे ?–नाहीं. मुळीच नाहीं. केवळ निसर्गनियमाप्रमाणें जन्माला येणें आणि कसें तरी जगून काळाच्या टाचेखालीं चिरडून जाणें हें जीवन नव्हेच मुळीं. मुकी बिचारीं कुणी हांका–अशा धर्तीचें परतंत्र, निर्बुद्ध व तेजोहीन जीवन ! छेः ! स्वयंप्रज्ञ मनुष्याचें जीवन हें खासच नव्हे.

मग जीवनाचें स्वरुप कसें असावें ?–सृष्टीची रचना व त्यांत बुद्धिमान् मनुष्याचें स्थान पाहा. चटकन् ध्यानीं येईल; मनुष्यमात्राचें जीवन आगळें आहे व तें सार्थ करण्याचें दायित्व जवानांच्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. तरुण पिढीनें हें समजून घेतलें पाहिजे.

जीवन म्हणजे जीवन ! केवळ चैतन्यमय, स्वायत्त, स्फूर्तिप्रद ! आणि उसळ्या मारणारें, पुढें धांवणारें, निर्मल असणारें, आनद व प्रसन्नता पसरविणारें ! आणि पुढें—कोणत्याहि विरोधास न जुमानतां आपला मार्ग काढणारें–याचें नांव जीवन ! व्याख्या थोडी ढगळ. पण ती पुढें ठेवून लक्षणांचा विचार करूं लागल्यावर ध्यानांत येतें कीं, जीवन म्हणजे वाहता जलप्रवाह !–आणि जलाला प्रतिशब्द आहे जीवन ! जवान मंडळींनीं पाण्याचा हा गुणधर्म ध्यानांत घ्यावा व अभ्यासावा. तसा ओळा आपल्या जीवनास लावावा.

याकरितां महत्त्वाकांक्षी तरुणांनीं काय करावें ?—जीवन समजून घेण्याकरितां रानेंवनें घुमवीत जाणाऱ्या एखाद्या वाहत्या ओढ्याच्या कांठाकांठानें हिंडण्यास जावें, सृष्टीचें वैभव पाहात दृष्टिसुख लुटावें आणि कांहीं अभ्यासहि करावा.

आपला महाराष्ट्र तसा मोठा भाग्यशाली आहे. सह्याद्रीच्या सान्निध्यामुळें त्याचा वर्षाकाल मोठा बहारीचा असतो. दिवाळीच्या आगें मागें स्वच्छ पाण्याचे लहान-मोठे प्रवाह सर्वत्र आढळतात. त्यांच्या भोंवतालची वनश्रीहि सौन्दर्यसम्पन्न असते. अशा वैभवांतून वाहणारा जलप्रवाह. त्याची गति ढाळ देत व वळणें घेत मोठ्या डौलांत चाललेली असते. कधीं संथ तर कधीं उसळ्या मारीत आणि कधीं झेपा टाकीत. सारें कांहीं दर्शनीय.

हिंडतां फिरतां तहान लागली; पाणी प्यावें, शांत व्हावें. स्नान करावेंसें वाटलें; स्नान करावें. शुद्ध व्हावें. वस्त्रें धुण्याची आवश्यकता असली; स्वच्छंदानें तें कार्य करावें, निर्मलता मिळवावी. स्फटिकवत् अशा जलप्रवाहाची महति किती वर्णावी !— सांगावें तेवढें थोडें.

आणखी पाहा. हा प्रवाह योग्य स्थान पाहून आडवावा. पाट काढून पाणी दूरपर्यंत न्यावें, सोनें पिकवावें ! पाणी उंचीवर चढवावें; काव्यमय कारंजें निर्माण करावें ! या झाल्या साध्या गोष्टी. पण हीच दृष्टि नदीच्या प्रवाहाकडे वळवा, धबधब्याची प्रचंड शक्ति ध्यानांत घ्या आणि ती शक्ति माणसानें आपल्या बुद्धिबलानें कोणकोणत्या कार्याला जुंपली आहे, त्यांचा अंदाज करा.

एवढा एवढासा जलबिन्दु ! त्यांच्या संघातानें निर्माण झालेला प्रचंड धबधबा आणि त्याच्या पोटीं जन्माला आलेली ती वासवी शक्ति विद्युत् ! ही महामाया काय करीत नाहीं ? मोठमोठे कारखाने चालविते. रात्रीचे दिवस बनविते. क्षणार्धांत इकडचा निरोप तिकडे पोंचविते. पडद्यावर निर्जीव पुतळ्या सजीव दाखविते आणि भूभागावर कुठेंहि चाललेलें सुंदर गायन तुमच्या घरांत सर्वांना ऐकविते !

जवानांनो, तुमच्या जीवनांतील कण व क्षण असाच अत्यंत बलशाली आहे. जसा आणि जेवढा त्यांचा उपयोग कराल, त्या प्रमाणांत तो तुमच्या

उपयोगी पडेल !– थोरथोर स्त्री-पुरुषांचीं जीवनचरित्रें याला साक्ष आहेत. हें तो प्रचीतीचें बोलणें !

आतां ज्या जीवनाचें आपण स्तुतिस्तोत्र गायिलें आणि त्याची गुणवत्ता पाहिली, त्याचेंच हें दुसरें स्वरूप पाहा.

पाणी वहातें आहे तोंपर्यंतच तें स्वच्छ, निर्मल, सामर्थ्यसंपन्न, तृषाशामक व प्रसन्नतादर्शक. पण तें वाहण्याचें थांबलें कीं, संपलें ! अल्प कालांत त्याला अवकळा येऊं लागते. सांचलेलें पाणी. लागलीच कुजूं लागतें. त्यांत विषारीपणा निर्माण होतो. त्याचा रंग बदलतो व तें घाणूंहि लागतें. त्या घाणेरड्या पाण्याची स्थितीच विपरीत. तें पिण्यास अयोग्य, स्नानास अयोग्य, धुण्यास अयोग्य ! उलट असल्या पाण्याचें डबकें मोटें अपायकारक होतें ! तें नाहींसें करणें आवश्यक असतें !

मनुष्याच्या जीवनाला हाच नियम तंतोतंत लागूं आहे. तें खडक फोडून बाहेर पडणारें, सतत वहात जाणारें, निर्मल दिसणारें व असणारें असें हवें. त्याची गतिमानता हीच त्याची मोठी शक्ति ! प्रत्येक जवानानें याचा विचार केला पाहिजे.

येथपर्यंत आपण जीवन शब्दाची व्याख्या व लक्षणें समजून घेतलीं. त्याप्रमाणें आपलें जीवन प्रवाहित असलें पाहिजे, तें सतत पुढें जात असलें पाहिजे हें स्पष्ट झालें. यासंबंधीं कसें व काय याचा विचार ओघानें करतां येईल. सध्यां आपण तिसरा शब्द ' धर्म ' सामान्यतः विचारांत घेऊन हें सूत्र संपवूं.

लोकव्यवहारांत धर्म या शब्दाचा जो प्रचलित अर्थ आहे तो लक्षांत घेऊन आपल्यास कसलाच विचार करावयाचा नाहीं, हें प्रथम सांगितलेलें बरें. आपण केवळ तरुण पिढीच्या कर्तृत्वासंबंधीं ऊहापोह करणार आहों. अर्थात् यांत जाति, पंथ, संप्रदाय इत्यादि भेददर्शक वर्ग पाहण्याचें कांहींच कारण नाहीं. जवान म्हणजे सर्वत्र – समाजांतील कोणत्याहि थरांत – दिसणारा जवान ! अशा सर्वसामान्य जवानांचा जीवनधर्म एकच असूं शकतो. तेव्हां त्या उदार दृष्टीनें धर्म शब्दाची व्याख्या व लक्षणें आपल्यास पाहावयाचीं आहेत.

व्यक्तीच्या जीवनांत देश-कालपरत्वें देव-धर्म-उपासना इत्यादि गोष्टींना

कांहीं महत्त्व आहे यांत शंका नाहीं व एकूण जीवनधारणेला त्यांची फार आवश्यकता आहे, ही गोष्ट निःसंदिग्ध. हिन्दू धर्मीय जवानांकरितां तसा कांहीं विचार करणें या लेखमालेंत क्रमप्राप्त आहे. तो पुढच्या एका सूत्रांत करूं. या वेळीं आपण व्यक्तिमात्राला आवश्यक असा जो व्यापक व महान् धर्म आहे त्याची व्याख्या व लक्षणें समजून घेऊं.

यासंबंधीं स्वतःचें कांहीं सांगण्यापेक्षां एका फार थोर व लोकोत्तर ठरलेल्या पुरुषाचे विचार सादर करणें अत्यंत उचित होईल. म्हणून लोकमान्य टिळकांच्या ' गीतारहस्यां 'तील धर्मविवेचन थोडक्यांत देतों :

*धारणाद्धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजाः ।*

*यस्याद्धारण संयुक्तं स धर्म इति निश्चयः ॥*

धर्म हा शब्द धृ = धारण करणें या धातूपासून निघाला असून धर्मानेंच सर्व प्रजा बद्ध झालेली आहे. ज्यानें सर्व प्रजेचें धारणपोषण होतें, तोच धर्म हा निश्चय होय. म्हणून हा धर्म सुटतां कामा नये. असा धर्म सुटला तर समाजाचीं बंधनें तुटलीं असें समजावें. आणि समाजाचीं बन्धनें तुटलीं म्हणजे आकर्षणाखेरीज आकाशांतील सूर्यादिक ग्रहमालेची किंवा सुकाणूखेरीज समुद्रावर तारवाची जी स्थिति व्हावयाची तीच समाजाची होत असते. तेव्हां अशा शोचनीय अवस्थेस समाज पोंचून त्याचा नाश होऊं नये म्हणून, अर्थ किंवा धर्म मिळवावयाचे झाल्यास तें धर्मानें म्हणजे समाजाची घडी न बिघडवितां, मिळवा आणि कामादिक वासना तृप्त करणें असल्यास त्याहि धर्मानेंच करा अशी आमच्या ऋषींची शिकवण आहे.

धर्मासंबंधीं अशी फोड करून नंतर लोकमान्य अन्यत्र असें सांगतात कीं, वरील व्याख्या ध्यानीं घेऊन जीवन जगण्याचें ठरविल्यास प्रत्येकाचा उत्कर्ष त्याच्या त्याच्या शक्तिबुद्धीप्रमाणें आपोआपच घडून येतो. कारण, समाजाचें कल्याण तें आपलें कल्याण असें मानून व समजून आचरिलेला धर्म–माणसाचें मन तयार करतो. नंतर सर्वांच्या कल्याणाकरितां स्वार्थत्याग कां करावयाचा ? याचा मनोनिग्रह धर्म शिकवितो. यामुळें मनाचें संकुचितपण नाहींसें होतें. यांत मनुष्य खरा धार्मिक होतोच. पण नवीन कालाला अनुरूप असा उत्कृष्ट नागरिकहि होतो.

लोकमान्यांनीं अधिकारवाणीनें सांगितलेली धर्माची ही व्याख्या व लक्षणें किती समर्पक व सहज कळण्यासारखीं आहेत !

जीवनाला धर्माची आवश्यकता याकरितां आहे. समाज व व्यक्ति परस्परांस पूरक झालीं पाहिजेत. व्यक्तीचें कर्तृत्व समाजाच्या उपयोगी पडावें आणि त्याच्या बदल्यांत समाजानें त्या व्यक्तीचें रक्षण करून तिचें जीवन सुखी करावें, असा हा न्याय आहे.

तात्पर्य, जवान – जीवन – धर्म या तीन शब्दांत कोणतें सार आहे, हें तरुण मंडळींच्या ध्यानीं आतां येईलच.

सद्यःकाल भूतकालाच्या पोटांतून आला असला तरी त्याचें सध्यांचें स्वरूप अगदीं भिन्न, अगदीं नवीन आहे. ऐन उमेदीच्या जवानांनाहि तें कांहींसें भयावह, गोंधळांत पाडणारें व कांहींसें निराशाजनक वाटेल यांत शंका नाहीं. पण तेवढ्यानें मूढमति बनून चालणार नाहीं. अभिमानानें जीवन जगावयाचें तर आपल्यासमोर असलेल्या कालाचें स्वागत निर्भय मनानें केलें पाहिजे आणि अभ्यासपूर्वक त्याचें अद्‌भुत रूप समजून घेतलें पाहिजे. आदर्श अशा थोर स्त्रीपुरुषांचीं चरित्रें आपले वाटाडये होत. त्यांच्या आधारें कोणालाहि आपला जीवनक्रम आंखतां येईल. अभ्युदय व निःश्रेयस मिळवितां येईल.

म्हणून काल ओळखा, पुढें सरावकर्तव्यें जाणून घ्या. कुठेंहि रेंगाळूं नका. उगीच घाई करूं नका. पावलें टाकण्यांत जोम असूं द्या आणि धिमेपणाहि.

याला थोडा अभ्यास हवा, सतत मनन व चिंतन हवें, नाहीं का ?— मला वाटतें, खालीं दिलेलीं संस्कृत सुभाषितें तरुण मंडळींनीं पाठ करावीं. मनांत मुरवावीं. शक्ति-बुद्धीप्रमाणें आचरणांत आणावीं.

*अनुक्त्वा विक्रमेद्य तद्वै सत्पुरुषव्रतम् ।*

न बोलतां पराक्रम करून दाखविणें हेंच थोर पुरुषाचें व्रत होय. १

*एतावानेव पुरुषो यदमर्षी यदक्षमी ।*

जो अपमान व अपकार सहन करत नाहीं, तोच पुरुष. २

*शुभं वा यदि वा पापं यो हि वाक्यमुदीरितम् ।*
*सत्येन प्रतिगृह्णाति स वीरः पुरुषोत्तमः ॥*

शुभ किंवा अशुभ वाक्य उच्चारल्यानंतर तो जें खरें करून दाखवितो, तो पुरुष श्रेष्ठ होय. ३

*न त्वेवात्मावमन्तव्यः पुरुषेण कदाचन ।*
*न ह्यात्मपरिभूतस्य भूतिर्भवति शोभना ॥*

पुरुषानें स्वतःस केव्हांहि हीन लेखूं नये. कारण, स्वतःस हीन मानणारांस उत्तम प्रकारचें ऐश्वर्य प्राप्त होत नाहीं. ४

*श्रुतेन तपसा वापि श्रिया वा विक्रमेण वा ।*
*जनान्यो ऽऽभि भवत्यन्यान् कर्मणा हि स वै पुमान् ॥*

विद्येनें वा तपानें, संपत्तीनें किंवा पराक्रमानें जो इतरांवर मात करतो, तो आपल्या कर्तृत्वामुळें खरा पुरुष ठरतो.

*क्लीबा हि वचनोत्तराः ।*

नामर्द लोक बोलण्यांत शूर असतात.

*अश्नाम्याच्छादयामीति प्रपश्यन्पापपूरुषः ।*
*नामर्षं कुरुते यस्तु पुरुषः सो ऽधमः स्मृतः ॥*

'अन्नवस्त्रादि कामापुरतें मिळत आहे ना? पुष्कळ झालें!' असें मानणारा व उत्कर्षाची चाड न बाळगणारा मनुष्य अधम व पापी होय.

*अश्रुतश्च समुन्नद्धो दरिद्रश्च महामनाः ।*
*अर्थांश्चाकर्मणा प्रेप्सुर्मूढ इत्युच्यते बुधैः ॥*

अध्ययन नसतां गर्विष्ठ, दरिद्री असून मोठमोठ्या खर्चाच्या गोष्टी मनांत आणणारा, आणि उद्योग न करतां द्रव्यप्राप्तीची इच्छा धरणारा अशा मनुष्याला शहाणे लोक पुरा मूर्ख समजतात !

*यस्य वृत्तं न जल्पन्ति मानवा महदद्भुतम् ।*
*राशिवर्धनमात्रं स नैव स्त्री न पुनः पुमान् ॥*

ज्याच्या हातून एखादी अद्‌भुत वा पराक्रमाची गोष्ट झाल्याचें लोक बोलत नाहींत, त्यानें लोकसंख्येंत भर टाकली इतकेंच. त्याला स्त्री म्हणतां येत नाहीं आणि पुरुष तर तो नव्हेच नव्हे.

या व्यतिरिक्त—

१. अमेरिकन कवि लॉंगफेलो याचें The Psalm Life.

२. कविश्रेष्ठ केशवसुत यांची कविता : **तुतारी** व **नवा शिपाई**.

३. बालकवि ठोंबरे यांची कविता : **निर्झरास**.

आणखी असे किती तरी उतारे. जीवनाचे साद-पडसाद दाखविणारे !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम 32043 दि: 1.7.64
क्रमांक 2375 नों: दि: 21.4.62

*विचारसूत्र तिसरें*

# जीवन जगण्याचें तंत्र व मंत्र

तरुण मित्रांनो,

गेल्या विचारसूत्रांत आपण **जवान** व **जीवनधर्म** या शब्दांच्या व्याख्या व लक्षणें समजून घेतलीं. त्यांचा विचार साकल्यानें केल्यास आपल्या असें ध्यानांत येतें कीं—

१– जवानी ही निसर्गाकडून लाभलेली सहज देणगी असली तरी ती बहुमोल ठरणें वा मातीमोल होणें हें ज्या त्या व्यक्तीच्या आचारा-विचारावर व कर्तृत्वावर अवलंबून असते.

२– प्रत्येक जवान हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. तो सामर्थ्यसंपन्न, विवेकी व कार्यकुशल असला पाहिजे. तरच व्यक्तिशः त्याला सुखस्वास्थ्य लाभते व तो समाजाची इष्ट ती सेवा करूं शकतो. आणि अशा तरुणांच्या सांखळीनेंच समाजाची धारणा व्यवस्थित राहाते.

३– याकरितां प्रत्येक जवानानें आपलें जीवितकर्तव्य नीट समजून घेतलें पाहिजे आणि स्वतःवरील उत्तरदायित्व प्रामाणिकपणानें पार पाडलें पाहिजे. त्याच्या जीवनधर्माचें रहस्य यांत गुंफलेलें आहे.

जाणत्या व महत्त्वाकांक्षी जवानांनीं वरील गोष्टींचा विचार साक्षेपानें करावा आणि त्याप्रमाणे आयुष्याला वळण लावून घ्यावें. मात्र, यांत त्यांनीं एक सावधानता राखावी. 'अल्पारम्भः क्षेमकरः' हें वचन विसरूं नये. एकदम आकाशाला गवसणी घालण्याचा खटाटोप करूं नये. सृष्टीच्या रचनेंत वा कार्यक्रमांत एकाएकीं अचाट असें कांहीं घडत नाहीं. पाऊस झिमू झिमू पडतो. थेंबाथेंबांनीं सरोवर भरतें! एवढ्याशा बीजांत वृक्षाचा विस्तार सांठविलेला असतो! सृष्टीचा हा निरपवाद नियम आहे. त्याच्याकडे दुर्लक्ष

करण्यांत अर्थ नाहीं. कार्यारंभीं जवान मंडळींनीं दक्षतेनें पावलें उचलावीं. मार्गदर्शनार्थ खालच्या ओळी लक्षांत घ्याव्या :

*थोर महात्मे होउनि गेले चरित्र त्यांचें पहा जरा ।*
*आपण त्यांच्या समान व्हावें हाचि सापडे बोध खरा ॥*

आदरणीय अशा थोर थोर स्त्री-पुरुषांचीं चरित्रें ! गतकालांत होऊन गेलेल्या व सद्यःकालीं दृष्टिपथांत असलेल्या महाभागांचीं चरित्रें ! तरुण मंडळींना मार्ग दाखविणारे दीपस्तंभच ते ! त्यांची महति काय वर्णावी ? जवानांना जीवन जगण्याचें तंत्र शिकविण्यास व मंत्र सांगण्यास ते पूर्ण समर्थ आहेत. त्यांच्या पायाशीं बसून कोणाहि जवानानें आपला मार्ग समजून घ्यावा. त्याची दिशाभूल होणार नाहीं.

थोर लोकांच्या चरित्रासंबंधीं एक स्वतंत्र परिशिष्ट पुढें दिलें आहे. सध्यांपुरतें एवढें सांगतां येईल : थोरांचें जीवन जगण्याचें तंत्र निश्चित ध्येय व त्याच्या सिद्धीकरितां अविरत प्रयत्न हें असून त्यांतून प्राप्त झालेली सफलता " इदं न मम – जगद्धिताय ! " हा त्यांचा मंत्र आहे. जवानांनीं तो मननपूर्वक समजून घेतला पाहिजे. असो.

जीवन यशस्वी व कल्याणकारी करण्याचा हा प्रारंभिक उपाय. याचा अभ्यास करीत आपण दुसराहि एक मार्गदर्शी उपाय समजून घेणें आवश्यक आहे.

आपल्या सभोंवतीं असलेल्या सृष्टीच्या जीवनाशीं आपलें जीवन सुसंगत ठेवणें यालाहि मोठें महत्त्व आहे. कसें ?— तो विचार आतां करूं.

ज्या विशाल व अद्भुतरम्य सृष्टींत आपण मानवरूपानें अवतरलों आहों व सबंध जीवन जागणार आहों; ती आपली जगज्जननी आपण नीट कधीं पाहातच नाहीं, असें विधान करणें मोठें चमत्कारिक आहे. पण वस्तुस्थिति तशी आहे खरी. ' अतिपरिचय खोटा, मान राहात नाहीं ' असा हा प्रकार आहे. आपण तो पडदा बाजूला सारूं आणि स्वतःच्या हिताकरितां सृष्टिमातेचें सुंदर मुख पाहून घेऊं.

कुठें तरी रानावनांत जा. चित्त एकाग्र करा आणि भोंवतालीं पाहूं लागा. केवढा अवाढव्य कारभार किती संथपणें चालू आहे ! आश्चर्यानें व

कौतुकानें मन भारावून जाईल ! आणखी थोडें लक्ष द्या. थोडें थोडें कळूं लागेल. आपलें उत्तर शोधा. हवें तें गवसेल !

सृष्टीचा दैनंदिन कार्यक्रम !— केवढा समतोलपणा व तालबद्धता आहे त्यामध्यें ! दिवसामागून रात्र नि रात्रीमागून दिवस. सारखें तेंच, तें पण त्यांत सुसंगति आहे आणि वैचित्र्यहि ! हें पाहा : दिवस रात्रीच्या पाठशिवणीच्या खेळांतून ऋतुचक्र निर्माण झालें आहे ! उन्हाळा-पावसाळा-हिंवाळा ! एकाच्या पोटांतून दुसरा नि दुसऱ्याच्या पोटांतून तिसरा ! किती सहजपणें, किती गमतीनें ! आणखी निरीक्षण करा : ऋतूंचा हा चक्राकार सारखा चालूं आहे. कुठेंहि उसन्त नाहीं. घाई नाहीं. गोंधळ नाहीं. विसंगतीहि नाहीं. साऱ्या घटना घेर धरून फिरताहेत. प्रत्येकीला कांहीं रीत आहे. आणि त्या सांखळींत असलेल्या प्रत्येक घटकाला कांहीं कार्य आहे ! जणूं एक फार मोठा खेळ संगनमतानें चालूं आहे.

तात्पर्य, सातत्य व सुसूत्रता हें सृष्टीच्या जीवनाचें मुख्य तंत्र असून, सूक्ष्मांतून विशालता व अपूर्णांतून पूर्णता हा तिचा मंत्र आहे !

सृष्टीचें हें मार्गदर्शन आपलें जीवन नीटनेटकें करण्यास केवढें तरी उपयुक्त आहे, नाहीं का ?— जवानांनीं अवश्य विचारांत घ्यावें.

सृष्टीचें हें सूत्रबद्ध जीवन म्हणजे एक मोठा खेळ चालला आहे, असें आपण वर म्हटलें आहे. तेव्हां त्या दृष्टीनेंहि आपण मार्गदर्शनाचा एक नवा धडा शोधूं.

मानवी जीवन हाहि एक मोठा खेळ आहे. या खेळांत आपण प्रत्यक्ष भाग घेणारे भिडू आहों आणि तटस्थ राहून मौजेनें खेळ पाहणारे प्रेक्षकहि आहों. दोन्ही भूमिका अगदीं वेगळ्या आहेत. दोन्हींतील कर्तव्य नि उत्तर-दायित्व वेगवेगळें आहे. तेव्हां या गोष्टी नीट समजून घेऊन जीवनाचा खेळ खेळणें व पाहाणें आगत्याचें आहे व त्यांत आपलें खरें कौशल्य आहे. खरी कसोटीहि आहे. याकरितां एखाद्या खेळाचें उदाहरण पुढें घेऊन आपण आपला प्रमुख हेतु शोधून पाहूं. बैठ्या खेळापेक्षा मैदानी खेळ विशेष उपयुक्त. म्हणून आपण कोणताहि मैदानी व मर्दानी खेळ विचारांत घेऊं शकतों.

उदाहरणार्थ, आट्यापाट्या, खो खो, हुतुतू हे देशी खेळ व क्रिकेट, फुटबॉल इत्यादि विदेशी खेळ. यांत निवड करायची झाल्यास मला वाटतें. क्रिकेटच्या खेळाला प्राधान्य देणें उचित होईल. हा खेळ मुळांत परकीय असला तरी आतां आम्ही तो इतका स्वकीय केला आहे कीं, त्याचें परकेपण राहिलेलें नाहीं. क्रिकेट हा जगाच्या मालकीचा खेळ झाला आहे. सर्वविश्रुतहि आहे. म्हणून त्याचा विचार करावयाचा.

क्रिकेटच्या खेळाला आज सर्व जगभर जी मान्यता, प्रतिष्ठा, प्रसिद्धि व लोकप्रियता मिळालेली आहे ती अगदींच असाधारण व अद्भुत आहे ! या खेळाचे होणारे जागतिक सामने लक्षांत आणावे. कुठें इंग्लंड, कुठें ऑस्ट्रेलिया नी कुठें आपला हिन्दुस्थान ! सहस्रों कोसांचें अंतर ! पण तें या खेळाच्या सामन्यांत विरून जातें ! अन् ते पाहण्यास आबालवृद्धांच्या झुंडीच्या झुंडी सामने होणाऱ्या मैदानाकडे धावतात ! तेव्हा अशा या महान खेळापासून जीवन जगण्यासंबंधीचे धडे मिळणें किती सुलभ आहे, नाहीं का ?——म्हणून आपण थोडक्यांत या खेळाचा परामर्श घेऊं.

आमचा तरुण विद्यार्थिवर्ग या खेळाचा मोठाच भोक्ता आहे. आणि अनेकांना त्यांत प्रावीण्य मिळविण्याची महत्त्वाकांक्षाहि असते. त्याचप्रमाणें सर्वसाधारण सुशिक्षित नागरिक हाहि प्रेक्षक नात्याने या खेळाचा भक्त असतो. त्याला मैदानावर जातां आलें, छानच. पण तें जमलें नाहीं तर रेडिओ व वर्तमानपत्रें यांच्या द्वारें तो या खेळाचीं वर्णनें ऐकून-वाचून-आनंद लुटतो. तात्पर्य, क्रिकेटच्या खेळाचें सामान्य स्वरूप, ज्ञान व मर्म सर्वांना ज्ञात असतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणून यासंबंधींचें आपलें विवेचन स्थूल मानानें करूं.

सामना खेळणाऱ्या दोन गटांत अकरा अकरा गड्यांची वांटणी असते. यांत फलंदाज म्हणजे फळी-( बॅटी )-ने चेंडू उडविणारा व गोलंदाज म्हणजे चेंडू फेकणारा यांना फार महत्त्व असून ते आपल्या कर्तृत्वांत मोठे निपुण व दक्ष असतात. यष्टीरक्षण व क्षेत्ररक्षण हें बाकीच्या भिडूंना सांभाळावें लागतें. सबंध खेळाचें निरीक्षण करणारा व योग्य निवाडा देणारा एक न्यायी तटस्थ असतो.

गोलंदाज व फलंदाज एकमेकांच्या विरुद्ध पक्षांतील असतात. क्षेत्ररक्षक गोलंदाजाच्या बाजूचे व त्याला सहाय्यक असतात. चेंडू फेकणें यांत खरें कौशल्य फलंदाज बाद करणें यांत आहे. आणि फलंदाजाने चेंडूला टोला देऊन त्याला दूर भिरकावणें व तो परत गोलंदाजाच्या हातांत येईपर्यंत जास्तींत जास्त धावा काढणें यांत त्याचें प्रावीण्य आहे. या स्पर्धेमुळें व त्यांतील धावपळीमुळे क्रिकेटचा खेळ फारच रंगतो. आणि जयापजयाचें पारडें सारखें अस्थिर असतें. याचे सामने दीर्घकाल चालतात व त्यांत दिवसानुदिवस रंग चढत जातो तो यामुळें.

अशा या दमदार व उत्साही खेळांत प्रावीण्य मिळवणें व सदा विजयी असणें ही गोष्ट सहजसाध्य नाहीं. त्यालाहि दीर्घकाल अभ्यास करावा लागतो. सारखें कष्ट करावे लागतात व जयापजयाची पर्वा न करतां तपस्या करावी लागते. क्रिकेटपटुत्व मिळवूं पाहणाऱ्या जवानाला अहंभाव, आळस, उच्छृंखलता व औदासीन्य या अवगुणांपासून नेहमींच दूर राहावें लागतें आणि धिमेपणा, चपलता, दक्षता व आत्मविश्वास यांची जोपासना करावी लागते.

जें विद्यार्जनांत तेंच क्रीडापटुत्वांत ! वर्षानुवर्षे व आजन्म तो विद्यार्थींच असतो. क्रीडाक्षेत्रावर प्रवेश करण्याच्या आधीच तो प्रतिपक्षाकडे कोण कोण भिडू आहेत, खेळाच्या बाबतींत त्यांचें बलाबल काय आहे आणि आपल्या पक्षांत कोणते गडी कणखर आहेत व कोणते कामचलावू आहेत याचा विचार करतो. विजयाची तो अपेक्षा धरून असतो. पण त्यांतील अनिश्चितताहि तो दृष्टिआड करीत नाहीं. निग्रहाने व ध्यान ठेवून खेळणें यावर तो आपली सारी बुद्धि व शक्ति केंद्रित करतो. तेंच एक कर्तव्य मानतो. म्हणून विजयश्री त्याच्याकडे येते. कधी धावत तर कधी लाजत मुरकत ! पण दोन्ही वेळां तो धिमा राहतो. चंचल होत नाहीं. पायरी-पायरीने आपल्याला वर चढावयाचें आहे, याचें त्याला भान असतें. किरकोळ जयापराजयाचा विचार तो कारणापुरता करतो. तो फारसा हुरळत नाहीं व उगीच खंतहि पावत नाहीं. आणि याचमुळें तो प्रतिपक्षा-विषयीं निःस्पृह पण गुणग्राहक असतो. प्रतिपक्षांतील क्रीडापटु विजयी झाला व स्वतः तो पराजित झाला तरी हा मोकळ्या मनाने व हसतमुखानें

याच्याशीं हस्तांदोलन करून त्याचें योग्य भाषेंत अभिनंदन करतो. बरें, तो स्वतः जयी झाला तर प्रतिपक्षापुढे तो ताठतो का ?—मुळींच नाहीं. उलट पराजित खेळाडूनें दाखविलेलें नैपुण्य ध्यानीं घेऊन त्याची पाठ थोपटतो व त्याला दिलासा देतो.

खऱ्या खेळाडूचा पिंड असा असतो व असावाहि लागतो.

आतां आपली प्रेक्षकाची भूमिका. तिलाहि मोठा अर्थ आहे. पुष्कळ लोक खेळ पाहण्यास जातात म्हणून आपण जायचें. वेळीं-अवेळीं टाळ्या वाजवून गोंगाट करायाचा ! ' वाहवा ! ब्रेव्हो ! ' या शब्दांची खैरात करायची आणि खरा निर्णय ध्यानीं न घेतां आग्रहानें निंदा किंवा स्तुति करीत सुटायचें. याला कांहीं अर्थ नाहीं. खेळ पाहण्यांत खरी रम्यता, गुणग्राहता व सहृदयांत हवी. एरव्हीं सारें फोल !

रंगांत आलेला क्रिकेटचा खेळ पाहतांना खरा प्रेक्षक अगदीं तन्मयतेनें गुणग्रहण करीत असतो व त्या वेळीं त्याचा जीव सारखा वर-खालीं होत असतो. जयापजयाच्या पारड्याकडे सारखा पाहतो. अडाखे बसवितो कधी त्याचें गणित बरोबर येतें. कधीं फसतें ! पण दोन्ही वेळां त्याला आनंद मिळतो तो अगदी अनोखा !

हा देखावा पहा.

फलंदाज बॅट सरसावून येणाऱ्या चेंडूच्या गतीवर लक्ष ठेवून उभा आहे. गोलंदाज त्याला बाद करण्याच्या ईर्ष्येनें अवसान धरून चेंडू फेकतो आहे. प्रेक्षकाचें उत्सुक कंपित मन विचारांत पडतें. चेंडूनें विकेट उडणार कीं, बॅटीचा रट्टा खाऊन चेंडू अंतराळांत उडणार ?

आणि दुसऱ्या क्षणाला चपल व दक्ष फलंदाज चेंडूला सरळ आकाश दाखवितो ! धावा सुरू होतात ! टाळी पडते. वाहवा ! वाहवा ! !

आणि तितक्यांत काय होतें ? चेंडू खालीं येणाऱ्या दिशेला तिकडे असणारा क्षेत्ररक्षक शिकारी कुत्र्याप्रमाणे आपल्या भक्ष्यावर टपलेला असतो चेंडू झेलला जातो ! प्रेक्षक पुन्हा थक्क होतो, म्हणतो : " शाबास ! काय झेल आहे ! बिचारा फलंदाज ! टाळ्यांचा कडकडाट ऐकत त्याला तंबूकडे परतावें लागतें. "

किती वर्णन करावें क्षणभरांत होणाऱ्या या घटनेचें ! त्यांतील औत्सुक्याचें व आशानिराशेचें !

मानवी जीवनाचा खेळ हा असा आहे, त्यांतील चढउतार, धावाधाव, गम्मतजम्मत आणि बरें वाईट या धर्तीवर आहे ! अर्थात् यांतील तंत्र व मंत्र आपल्या जीवन जगण्याच्या खेळाला उपयुक्त होण्यासारखे आहेत नाहीं का ?—जवानांनीं तुलना करून पाहावी.

वरील विवेचन करीत असतां How to play ही एक सहज वाचलेली कविता मनांत येते—

Play the game for the game's sake
Play for your side and not for yourself

[ खेळण्याकरितांच खेळ खेळा. आणि तो आपल्या गटाकरितां खेळा. स्वतःकरितां नव्हे. ]

Be a good winner and a good loser
That is modest in victory and generous in defeat.

[ विजयांत नम्रता आणि पराभवांत नाखंत असावी. ]

Accept all dicisions in a proper spirit
Be chivalrous towards a defeated opponent.

[ खेळांत जे निर्णय एकमताने घेतले जातील, ते तुम्हांला पटोत न पटोत माना आणि पराभूत पक्षाविषयीं दाक्षिण्य दाखवा. ]

कवितेचा चुटका साधा आहे. पण किती अर्थपूर्ण आहे. यावरून एवढें निश्चित ठरतें कीं, खेळाचा प्रकार कोणताहि असो, त्यापासून आनंद निर्माण झाला पाहिजे आणि त्या आनंदांत सर्वांचा समान भाग असला पाहिजे. खेळ म्हटला कीं, अटीतटीचा सामना. मग त्यांत दोन व्यक्ति असोत किंवा दोन गट असोत. त्यांत विजय मिळविण्याची स्पर्धा असावयाचीच. मधून मधून भांडणाचे, राग राग करण्याचे प्रसंग यावयाचे. कांही लांडी-लबाडी दिसायची. पण या धांगडधिंग्यांत कोणाहि भिडूला शारीरिक अपाय न होईल याबद्दल जसें सर्वांनीं जपावयाचें, तसेंच कोणाच्या मनाला जखम न होईल यालाहि सर्वांनीं जपायचें. खेळ संपला कीं, सर्वांच्या वांट्याला

फक्त आनंद व उत्साह आला पाहिजे व सर्वांचीं मनें सर्वांविषयीं साफ असलीं पाहिजेत.

जीवन जगण्याचें तंत्र या पद्धतीचें हवे. संबंधित अशा सर्व माणसांना आनंद होईल असा त्यांचा मंत्र हवा.

आदरणीय अशा स्त्री-पुरुषांच्या चरित्रांत हीच गोष्ट प्रामुख्यानें आढळते. आपल्या भोंवतालच्या सृष्टींत चाललेली घडामोड याच धर्तीची असते आणि मनोरंजनार्थ निर्माण झालेल्या खेळांचाहि हेतु तोच असतो.

जवान मंडळींनीं योग्य तो विचार करावा आणि तसें वळण आपल्या जीवनाला लागेल याकरितां झटावें.

## अभ्यासाकरितां आणखी थोडें

म. गांधी युगांतील प्रज्ञावन्त लेखक— श्री. काका कालेलकर, श्री. शंकरराव जावडेकर, आचार्य भागवत, साने गुरुजी, किशोरीलाल मश्रुवाला आणि विनोबा भावे यांचें वाङ्मय चाळावें. वाचावें. अभ्यासावें.

### वचनें

प्रज्ञाबलं च सर्वेषु मुख्यं कार्येषु साधनम् ।

[ प्रज्ञाबल – सर्वश्रेष्ठ ज्ञान – हेंच खरें सामर्थ्य होय. सर्व कार्यें तडीला नेण्याचें हेंच मुख्य साधन होय. ]

* * *

*विचारसूत्र चौथें*

# जीवन जगण्याचें सध्यांचें कार्यक्षेत्र ( पूर्वार्ध )

## १. थोडें प्रास्ताविक.

तरुण मित्रांनो,

जीवन कसें जगावें ? याचें तंत्र-मंत्र आपण गेल्या लेखांकांत समजून घेतलें. आतां त्याच्या कार्यक्षेत्राची पाहणी करूं.

या पाहणींत स्थलाबरोबर कालाचा व भोंवतालच्या एकूण परिस्थितीचा विचारहि करणें आवश्यक आहे.

या वेळीं सहजच उत्तर रामचरित्र नाटकाचा कर्ता भवभूति याच्या एका प्रसिद्ध वाक्याचें स्मरण होतें. तें वाक्य असें—

*" काल अनन्त आहे. पृथ्वी विशाल आहे ! "*

खरें म्हणजे कवीनें हे उद्गार कांहीं निराळ्या हेतूनें काढलेले आहेत. पण त्यांतील मथितार्थ आपल्या चालू विवेचनास उपयोगी पडण्यासारखा आहे म्हणून त्याचा विचार करावयाचा.

काल अनन्त, पृथ्वी विशाल ! गोष्ट खरीच आहे. माणसाचें औट हाताचें शरीर आणि त्याला जेमतेम लाभणारें शंभर वर्षांचें आयुर्मान यांची तुलना, चोवीस हजार मैलांच्या घेराचा भूगोल नी आदि-अंत नसलेला काल यांच्याशीं करून पाहावी. कसलाच मेळ बसणार नाहीं ! वरील वाक्य प्रत्ययकारी वाटेल. यांतच आपण गतकालाचा म्हणजे दीड-दोन शतकांपूर्वींचा आढावा घेतल्यास तें आणखी सयुक्तिक वाटेल.

त्या कालांत स्थलकालाचें क्षेत्रमापन करण्याचीं माणसाचीं प्रमुख साधनें तीन : डोळे व कान हीं ज्ञानेंद्रियें आणि अनुमान करण्याची शक्ति. पण या तिन्ही साधनांची कार्यक्षमता अगदीच मर्यादित होती.

त्या वेळीं माणसाची गतिमानता पायांनीं वा वाहनांनीं घंट्याला पांच-सहा कोसांपलीकडे नव्हती. यामुळें त्याला स्वतःच्या भोंवतालचें जग अफाट व काळ अचाट वाटत होता ! याचप्रमाणें त्यानें टोकलेली जोरदार आरोळी किंवा शिंगाची ललकारी दोन-तीन कोसांतच ऐकूं जात होती. हीच गोष्ट दृष्टीच्या पल्ल्याची. उंच स्थानावरूनहि त्या काळचा तीक्ष्ण दृष्टीचा माणूस आसपासची फक्त पंचक्रोशी पाहूं शकत होता. बरें, कोणत्याहि निमित्तानें त्यानें लांब-दूरचा प्रवास केला तरी त्याला भौगोलिक ज्ञानाची नीट कल्पना नसल्यामुळें तो सारेंच अनंत व अफाट मानीत होता.

स्थल-कालाविषयींचें हें अनुमान त्या वेळच्या ज्ञात जगांत सर्वत्रच होतें. आजचीं सुधारलेलीं व अत्यंत ज्ञानसंपन्न अशीं पाश्चिमात्य राष्ट्रेंहि याच अंधारांत चाचपडत होतीं. अशी वस्तुस्थिति असतां, चमत्कार हा कीं, आजच्या अभूतपूर्व अशा विज्ञानयुगाचे प्रवर्तक पाश्चिमात्य लोक आहेत.

## २. आमची सुषुप्ति ! : युरोपांतील जागृति !

जगाच्या इतिहसांत ही एक मोठी क्रांतिकारक घडामोड घडलेली आहे. गेल्या हजार-पांचशें वर्षांचा काळ पहावा. आणि त्यांत प्रामुख्यानें आढळणाऱ्या युरोपांतील राष्ट्रांची जागृति व बौद्धिक आक्रमणशक्ति विचारांत घ्यावी. खरोखरच सुजाण माणसाचें मन नवलानें भांबावतें व आदरमिश्रित आनंदानें भारावतें !

आणि त्याच वेळीं मनाला एक विचार चाटून जातो कीं, त्या काळीं अनेक दृष्टीनें अग्रेसर असलेल्या भारतामध्यें ह्या विचारक्रांतीचा सामान्य किरणहि कां दिसला नाहीं ? कोणती कमतरता होती इथें ?

उपनिषदांतील थोर तत्त्वज्ञान व अध्यात्म, गीतेंतील कर्मयोग, महाभारतांत कांटोकांठ भरलेलें राजनीतीचें शास्त्र व धर्मज्ञान, उच्चप्रतीचा पुरुषधर्म शिकवणारें रामचरित्र आणि अनेकानेक ग्रन्थांतरीं आढळणारी ज्ञानविज्ञानाची चर्चा केवळ आमची असतां; आमचा आर्य पिण्ड अनार्य कसा व कां होत गेला ? असें विचारांचें वादळ मनांत उठतें ! तें विलक्षण दुःखित होतें व खंतहि पावतें !

कांहींहि प्रकार असो. आम्हा भारतियांना मरगळ येत गेली आणि युरोपीय सुबुद्ध जनता जागी होत चालली हें मात्र सत्य.

तिकडे युरोपांत गटेनबर्गनें मुद्रणविद्येचा शोध लावून भूतकालांत केवळ ग्रन्थान्तरीं सांठवून ठेविलेलें व भविष्यकालांत अमाप तयार होणारें ज्ञानभाण्डार सर्वांना मुक्तद्वार केलें ! तर त्यानंतर केवळ शतकाभरांत धाडसी दर्यावर्दी कोलंबस अवतरला आणि त्यानें प्राणपणाला लावून भेसूर व अगाध वाटणार अटलांटिक पालथा घातला आणि विशाल भूगोलाची मर्यादा सशास्त्र प्रस्थापित केली !

भूगोलाची परिक्रमा सफल झाली व धाडसी लोकांना पराक्रमाचे नवे नवे मार्ग दिसूं लागले व सुचूं लागले. यांतच मार्टिन लूथरनें पोपच्या अबाधित धार्मिक सत्तेला सुरुंग लावून धर्मभोळेपणाचा पाया उखडून टाकला व विचार-स्वातंत्र्याचा पोत पाजळून ठेवला !

अशा प्रकारें भूगोल हस्तगत होत असतां कोपर्निकस, ग्यालिलियो, न्यूटन इत्यादि खगोलशास्त्रज्ञ व गणिती उदयास आले व त्यांनीं नव्या नव्या ज्ञानाचीं भाण्डारें खुलीं करून प्रज्ञाबलानें साधा मनुष्य कर्तुमकर्तुम् होऊं शकतो हें दाखवून दिलें. तात्पर्य, युरोपांतील शेंकडों ज्ञानवन्तांनीं विलक्षण आचार-विचार-क्रान्ति करून अर्वाचीन ज्ञानयुगाला फार मोठी गति दिली.

या वेळीं आमच्या भारतांत कांहींच खळबळ नव्हती का ? असें कसें म्हणतां येईल ?—त्या कालांत इकडेहि मोठमोठे राजकर्ते झाले, अनेक राजकुलें उदायास आलीं. भास्कराचार्य, वराहमिहिर, पाणिनी, मनु, याज्ञवल्क्य, श्रीमत् आद्य शंकराचार्य असे दैदीप्यमान् पुरुष निर्माण झाले व त्यांनींहि ज्ञान-विज्ञानाची पातळी वाढविली ! पण त्यांत पाश्चिमात्य लोकांची ज्ञान-लालसा, जग जिंकण्याची विजीगीषा, महान् आक्रमणशीलता व अपूर्व साहस इत्यादि गुणांचे अंकुर निर्माणच झाले नाहींत किंवा झाले असल्यास त्यांची वाढच झाली नाहीं ! केवढी दुःखदायक व मानहानिकारक वस्तुस्थिति आहे, नाहीं का ?—असो.

यानंतर एकोणिसावें शतक आलें. भारत आतां पूर्ण पंगुळला होता व पांगळाहि झाला होता. अर्थात् मोगलशाही आली व शिरजोर झाली ! आम्ही डाराङ्रूर ! पुढें आले पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज !—आणि धूर्त व

राजकारणपटु इंग्रजांनीं मोगलांना लोळविलें व मराठ्यांना! आणि अल्पावकाशांत तो हिंदुस्थानचा राजा झाला! सहा हजार मैल दूर राहून आमच्यावर अगदीं निष्कंटक राज्य केलें!

इकडे हा चमत्कार घडत असतांच पाश्चिमात्य प्रज्ञावन्तांनीं विद्युत्-शास्त्राचा पाया घालून ती वासवी शक्ति आपल्या मुठींत आणून ठेविली! आज आतां विसाव्या शतकाच्या मध्यावर काय आढळतें?

दुर्बिणी, टेलिफोन, रेडिओ, टेलिव्हीजन, राडार, सोनार इत्यादि किती प्रकार सांगावे?—सारखे नवे नवे शोध, नवीं नवीं यंत्रें, नवे नवे प्रयोग! नवें नवें संशोधन! पाश्चिमात्य शास्त्रज्ञांचें प्रज्ञाबल सामान्य बुद्धीला न पेलेल इतकें बिकट झालें असून स्थलकालांतील विशालता व अनन्तता आखडत चालली आहे!

याचा परिणाम असा—

विज्ञानयुगांतील आजचा सुबुद्ध मानव खगोलाच्या कोट्यवधि कोसांच्या अंतरावर असलेल्या ताऱ्यांची, तारामंडळांची व तेजोमेघांची माहिती घेऊं शकतो आणि त्यांच्या गतीचें, प्रकाशाचें व प्रचंड व्याप्तीचें मोजमापहि अचूक ठरवून टाकतो! विविध स्वरूपाचीं व प्रचंड गतीचीं आकाशयानेंहि त्यानें बनविलीं असून खगोलाची अगाधता त्यानें विरघळून टाकली आहे! याचबरोबर त्याचें कर्णेन्द्रियहि तिखट व अफाट पल्ल्याचें झालें आहे. तो आतां हजारों मैलांवरून आपसांत बोलूं शकतो आणि तितक्याच अंतरावरील सुरेल गाणीं, चटकदार संवाद व बाजाराच्या बातम्या आम जनतेला ऐकवूं शकतो!

अशा या प्रज्ञावन्तानें सध्यां काय योजिलें आहे. अग्निबाणाच्या साह्यानें चंद्र, मंगळ व शुक्र यांच्यावर मोहिमा चालूं करावयाच्या! तात्पर्य, अत्यंत आश्चर्यकारक, रहस्यमय व गूढातिगूढ निसर्गापुढे सध्याचा मानव मोठ्या शौर्यधैर्यानें ताठ उभा ठाकला आहे व कविवर्य टिळकांच्या भाषेंत म्हणतो आहे—

*भूगोल हा दोन बोटांत माझ्या*
*नको अंतराळा तुझी थोरवी!*

*बोला हवें तें मला काय त्याचें ?*
*पुरें जाणतो मीच माझें बल !*

मानवाचा हा उन्माद आहे का ? नाहीं. हा आत्मविश्वास आहे.

## ३. आमचें पतन ! — आणि पुनरुत्थान !

गेल्या दीड शतकांत जगांत कोणत्या घडामोडी झाल्या आणि प्रज्ञावन्त शास्त्रज्ञांनीं निसर्गावर कसे कसे व कोणकोणते विजय मिळविले; याचें अद्‌भुतरम्य रेखाचित्र आपण पाहिलें. आतां याच कालखंडांत दुसरा एक संघर्षात्मक चमत्कार घडून आला, त्याचाहि परामर्श घेऊं. कारण तो आमच्या म्हणजे भारताच्या दुर्दैव–सुदैवाचा झगडा आहे !

भारताच्या अर्वाचीन इतिहासांत–तागडीबहाद्दर इंग्रज साध्या वेशांत आला काय, आमच्या मोहनिद्रेचा वा मूर्खपणाचा त्यानें फायदा घेतला काय आणि संग्रामाचे प्रसंग न उद्भवूं देतां या खंडप्राय राष्ट्राचा धनी झाला काय!— साराच चमत्कार !

दीड शतकाचा काल लोटला असला तरी हा सारा इतिहास ताजा आहे. ग्रन्थान्तरीं संग्रहित झाला आहे. भावी उत्कर्षाकरितां, तरुण मित्रांनो, तुम्ही त्याचा अभ्यास साक्षेपानें केला पाहिजे.

त्यासंबंधीचें एक साधें रेखाचित्र इथें देत आहें.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभींच इंग्रजी सत्ता हिन्दुस्थानांत पुष्कळ पसरली होती व तिचे पाय इथे पक्के रोवले गेले होते ! पारतंत्र्याविषयीं आम्ही बेफिकीर असलों तरी आमचा पिण्ड शूरावीरांचा असल्यामुळें १८५७ सालीं आम्ही इंग्रजी सत्तेला एक जोराची धुशी देण्याचा प्रयत्न केला; पण ती धडक वीरत्वाची असली तरी समरकुशलतेची नव्हती ! त्यामुळें आम्ही सगळीकडून पराभूत झालों ! या धकाधकींत आम्ही स्वतःला नीट ओळखलें नाहीं. पण इंग्रजानें आमची नस न् नस ओळखली ! आणि त्यांनीं आपले पाश निरनिराळ्या प्रकारें जखडून टाकून, कायद्यानें प्रस्थापित झालेलें राज्य आमच्या माथीं मारलें !

आम्ही शूर वीर असलों तरी भोळे व मूर्ख होतों व आम्हांला राष्ट्रीय

जीवनाची दृष्टीहि नव्हती. यामुळें इंग्रजांच्यापुढें पराभूत झाल्यानंतर आपण परवशतेच्या खाईंत पडलों आहों, हें आमच्या ध्यानींच आलें नाहीं. उलट, इंग्रजांची सत्ता म्हणजे परमेश्वरी प्रसाद असें आम्ही मानूं लागलों ! राजकर्त्यांचीं तशीं स्तुतिस्तोत्रेंहि गाऊं लागलों ! जवळ जवळ पन्नास वर्षें आम्ही या धुंदींत होतों ! अर्थात् इंग्रजी सत्ता या देशांत कशी दृढमूल होत गेली असेल हें काय सांगायला पाहिजे ?—हा सारा प्रकार आमच्या दृष्टीने उद्वेगजनक पण इंग्रजांच्या दृष्टीनें मोठा हास्यरसोत्पादक होता ! साऱ्या जगांत आमची कीर्ति एक नादान राष्ट्र याच स्वरूपांत होती. असो.

आमच्यावर स्थापन झालेली ही आंग्लसत्ता मोठी दुर्दमनीय, आम्हांला लाजिरवाणी व अत्यंत अर्थशोषक होती ! आमच्या राष्ट्राची अक्षरशः लूटमार झाली व प्रजा या नात्यानें आम्ही अगदीं हीन दीन, मानहीन व दुर्दैवी झालों. पण घाणींतून अत्तर निघावें किंवा विषापासून अमृत प्राप्त व्हावें; तसा एक विलक्षण प्रकार आमच्या पारतंत्र्याहून निघाला ! तो म्हणजे आमच्या जागृतींत होय. इतिहासांतील हा चमत्कारहि अभ्यास करण्या-सारखा आहे.

इंग्रजी सत्ता भारताला कितीहि मारक झालेली असो, त्यांचें तेथील शासनतंत्र मोठें व्यवस्थित, न्यायप्रिय व निर्दोष होते यांत शंकाच नाहीं. आणि तें निर्धोक व निश्चित, चालावें म्हणून त्यांनीं नव्या ज्ञानाचे झोत आमच्यावर सोडले ! शाला, पाठशाला, महाविद्यालयें आणि विश्वविद्यालयें भारताच्या सर्व भागांत प्रस्थापित झालीं. आणि शिक्षणाचा प्रसार वाढत चालला !

भारताच्या भाग्याची ही खरी प्रभात होय. आमची राष्ट्रीय अस्मिता आपोआपच जागृत झाली आणि आम्ही स्वातंत्र्योत्सुक होत चाललों. अवघ्या पाव शतकाच्या आंतच आम्ही भारतवासियांनीं सत्ताधारी इंग्रजांना हें दर्शवून दिलें कीं, दैवाच्या गफलतीनें आम्ही नादान ठरलों असलों तरी आम्ही बुद्धिप्रधान लोक आहों. पाश्चिमात्यांचें सर्वंकष ज्ञान आम्ही सुलभतेनें ग्रहण करूं शकतों, पचवूं शकतों व बलिष्ठहि होऊं शकतों. अर्थात् आमची ही पात्रता इंग्रजप्रभूंना पटली नाहीं असें नाहीं; पण ती त्यांना रुचली नाहीं आणि सर्वतो-परी दुर्बल प्रजा व सर्व सत्ताधारी बलिष्ठ राजा असा संघर्ष सुरू झाला !

अनुक्रम 32023 दि: 11.9.
क्रमांक 9355 नों दि: 2452



जवळ जवळ पन्नास वर्षें हा संग्राम भारतीय पुढाऱ्यांनीं मोठ्या हिकमतीनें व हिमतीनें चालविला! राष्ट्राच्या सर्व प्रांतांत अनेकानेक पुढारी निर्माण झाले आणि सहस्रों संख्येनें त्यांना अनुयायी मिळाले! यांत आपला महाराष्ट्र स्वातंत्र्य मिळेपर्यंत बिनीवर राहिला!

सत्तालोलुप इंग्रजांनीं अधिकाराच्या तोऱ्यांत उग्र व भयंकर निर्दयी रूप धारण केलें! आणि आमची राष्ट्रीय स्वातंत्र्याची रणधुमाळी नरडीला नख देऊन मारण्याचा प्रयत्न केला! कांहीं कालांतच त्यांना कळून चुकलें कीं, भारतवासी मुळांत वाघ आहेत. त्यांना पाजलेलें वाघिणीचें दूध त्यांच्या चांगलेंच पचनीं पडलें आहे.

खरेंच आहे. चांगल्या भूमींत पडलेलें सकस बीज अंकुरित झालेंच झालें व फोफावूं लागलें! मग इंग्रजांनीं आम्हांला मधून मधून थोडेंसें चुचकारलें आणि सत्तेचा धाक कायम राहावा म्हणून झोडपूनहि काढलें!

प्रयत्नशील व्यक्तीचें सुदैवहि मग त्याच्यावर भाळतें व त्याला साह्य करीत राहातें. आमचा स्वातंत्र्यसंग्राम सगळीकडून पेटतांच तिकडे युरोपांत दोन महायुद्धें प्रचंड स्वरूपांत घडून आलीं. आम्हांला इंग्रजांचें नरडें धरण्यास संधि मिळाली. दोन्ही युद्धांत इंग्रज विजयी होऊनहि त्याचा कांटा ढिला झाला!

या दोन महायुद्धांनीं जगाची सारीच परिस्थिति पार बदलून गेली. राजेरजवाडे कोलमडून पडले व साम्राज्यशाहीचें सौभाग्य एकदम मावळलें कम्युनिझमची एक नवीन संस्कृति जन्माला आली!

कालाचें हें स्वरूप राजकारणपटु इंग्रजानें तात्काळ ओळखलें. भारतासारखे स्वातंत्र्योत्सुक देश कवळांत दाबून ठेवण्याचें सामर्थ्य आतां आपल्या मनगटांत राहिलेलें नाहीं; ही गोष्ट ध्यानांत येतांच त्यानें काढता पाय घेतला. आम्हांला स्वातंत्र्य देण्याचा काळ एक वर्षानें आरती ओढला. मोकळ्या मनानें आमचें स्वातंत्र्य आम्हांला बहाल केलें आणि आमचे धन्यवाद घेत व मित्रत्व कायम राखून तो निघून गेला! याला म्हणतात खरें शहाणपण!

जवान मित्रांनो आपल्या राष्ट्राच्या पतनाचा व पुनरुत्थानाचा इतिहास हा असा आहे. तो जितका उद्बोधक आहे, तितकाच रोमहर्षकहि आहे.

इथें त्याची जी रूपरेखा देण्यांत आली आहे. त्याचा हेतु एवढाच कीं, आमचें पतन फार मोठें असलें तरी तें मंदगतीनें झालें. आणि पारतंत्र्याची दुर्गति यायला कित्येक शतकें लागलीं ! राष्ट्र या नात्यानें आम्ही खरे नामशेष झालों : अव्वल इंग्रजी अमदानींत ! एऱ्हीं आम्ही शिवशाही व मराठ्यांची साम्राज्यशाही पाहिली नसती !

इंग्रजानें आम्हांला पुरतें लोळवलें ही गोष्ट वादातीत. पण आम्हांला शुद्धीवर येण्यास वेळ लागला नाहीं. ती जागृति येतांच आम्ही झपाट्यानें पुढें सरसावलों. कार्याला लागलों. नवा काल आम्ही त्वरित जाणला. नवें ज्ञान चटकन् आत्मसात् केलें. स्वातंत्र्यसाधनें अचूक शोधलीं आणि प्रबळ इंग्रजशाहीला मोठ्यांत मोठी धडक दिली ! याचा अर्थ असा : आमच्या पतनाला कालावधि लागला हजार वर्षांचा. पण पुनरुत्थान करून स्वातंत्र्य संपादन करण्याचें दुर्घट कार्य आम्ही एका शतकांत करून दाखविलें ! तेव्हां यांत आमच्या पूर्वसुरींनीं जी वीरता, धीमता आणि पराक्रमशीलता दाखविली; त्या साऱ्या गुणांचा तुम्हांला अभ्यास करावयाचा आहे व ते स्वतःच्या अंगीं बाणवून घ्यावयाचे आहेत. एवढेंच नव्हे तर पुढच्या पिढीला पोंचेल अशी दक्षता तुम्हांला घ्यावयाची आहे.

हें उत्तरदायित्व फार मोठें व महत्त्वाचें आहे. त्याचें स्मरण ठेवा. कार्याला लागा. म्हणून लोकमान्य टिळकांनीं कर्मयोग शिकवितांना तरुण मंडळींना उपनिषदांतील जो एक संदेश दिला आहे तोच इथें सादर करितों :

*उत्तिष्ठत ! जाग्रत ! प्राप्य वरान्निबोधत ! !*

[ उठा जागे व्हा आणि हे प्राप्त वर समजून घ्या ! ]

## अभ्यासाकरितां आणखी थोडें

हीं पुस्तकें वाचा. श्री. प. म. बर्वेकृत "युरोपचा इतिहास." श्री. तात्यासाहेब केळकरांचें – मराठे आणि इंग्रज. श्री. बापूसाहेब माटेकृत विज्ञानबोध. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचा ग्रन्थ—"ज्ञानोपासना."

## खालचीं वचनें पाठ करा.

*आयुषः क्षण एकोऽपि सर्वरत्नैर्न लभ्यते ।*
*नीयते तद्वृथा येन प्रमादः सुमहानहो ॥*

[ रत्नाच्या राशी दिल्यानेंहि गेलेल्या आयुष्याचा क्षण मिळत नाहीं हें निश्चित होय. मग आयुष्य व्यर्थ घालविणें हा मोठा अपराधच नव्हे का ? ]

*न तदास्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा क्वचित् ।*
*पौरुषेण प्रयत्नेन यन्नाप्नोति गुणान्वितः ॥*

[ या भूलोकीं, आकाशांत किंवा देवलोकांत अशी एकहि वस्तु नाहीं कीं, जी प्रयत्न करणाऱ्या गुणवान् मनुष्याला साध्य होत नाहीं. ]

* * *

*विचारसूत्र पांचवें*

# कार्यक्षेत्राचे तीन भाग

### १. महाराष्ट्र, २. भारत, ३. जग.

तरुण मित्रांनो,

गेल्या लेखांकांत आपण जगताच्या एकंदर परिस्थितीचा आणि त्यामुळें संकोच पावलेल्या स्थलकालाचा विचार केला. आतां आपण प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर आलों आहों. याचे तीन भाग वर दर्शित केलेले आहेतच, ते क्रमानें विचारांत घेऊं.

पहिला भाग आपला महाराष्ट्र.

महाराष्ट्र ही आपली सर्वांची जन्मभूमि आणि कर्मभूमि. हिचा महिमा काय वर्णावा ! स्वर्गादपि गरियसि ! हाच तिचा मोठा गौरव. महाराष्ट्र या नांवांतच केवढी जादू भरली आहे ! महान् राष्ट्र तें महाराष्ट्र. कमींत कमी दोन हजार वर्षें तरी या नांवानें हा देश भूषित झाला आहे आणि सर्वांची मानवंदना घेतो आहे.

महाराष्ट्रास लाभलेलें हें महत्पद अढळ राखण्याची जवाबदारी जवान मित्रांनो, तुमच्यावर फार मोठी आहे. आणि ती पार पाडण्याचा मार्ग एकच : तुमचा जीवनधर्म अत्यंत निर्मल व उच्च ध्येयप्रवण असला पाहिजे. म्हणून असा जीवनधर्म आचरण्याचा विडा उचलतांना तुम्ही मनोमन अशी शपथ घेण्यास हवी :

‘ महाराष्ट्र माझा. मी महाराष्ट्राचा ! त्याचें कल्याण तेंच माझें कल्याण आणि त्याचा गौरव तोच माझा गौरव ! या क्षणापासून माझें जीवनसर्वस्व त्याच्या सेवेंत कारणीं लागो ! ’

आतां नवनिर्मित महाराष्ट्राचें ताजें मानचित्र पुढें घ्या आणि स्थूलमानानें त्याचें भौतिक स्वरूप समजून घ्या.

भारताचें वैभव वाढविलें आहे हिमाद्रीनें ( हिमालयानें ). त्याच धर्तीनें महाराष्ट्राला आहे सह्याद्रि ! हा पर्वतराज महाराष्ट्राच्या पाठीशीं एखाद्या अजस्त्र तटाप्रमाणें उभा आहे आणि त्याच्या दोन्ही – पूर्व-पश्चिम – अंगांस महाराष्ट्र अस्ताव्यस्त पसरलेला आहे. अद्याप तो जितका एकरूप व संयुक्त व्हावयास हवा, तितका तो झाला नाहीं, ही गोष्ट खरी; तरी पण आपण मराठी भाषी लोक मोठ्या प्रमाणावर एकत्र आलों असून भारताच्या संघराज्यांत महाराष्ट्राला एक मानाचें स्थान लाभलें आहे, ही गोष्ट नाकारून चालणार नाहीं.

महाराष्ट्राचें सध्याचें हें यश टिकविणें आणि भविष्यकालीं तें सारखें वाढतें ठेवणें या गोष्टी तरुणांच्या कर्तृत्वावर अवलंबून आहेत हें सांगावयाला नकोच.

आम्ही महाराष्ट्रीय भारतांतील या जगतांतील इतर लोकांप्रमाणेंच सर्वसामान्य मानवप्राणी असून आमचा पिंड नाना प्रकारच्या चांगल्या गुणांनीं व घाणेरड्या दोषांनीं लिप्त आहे. यामुळें राष्ट्रीय दृष्ट्या आम्ही गुणसंपन्न किती ? आणि दोषलिप्त किती ? हें ठरविणें मोठें गुंतागुंतीचें काम आहे. पण सामान्यत: महाराष्ट्रीय म्हणजे कणखर व राकट प्रकृतीचा मनुष्य; पण मोठा बुद्धिमान व वीर्यशाली प्रवृत्तीचा रंगेल गडी; असें त्याचें वर्णन केल्यास तें त्याला शोभून दिसेल, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हा आमचा गुणविशेष आम्ही सह्याद्रीपासून उचलला असला पाहिजे. आमच्या देशाच्या पाठीशीं उभा असलेला हा पर्वतराज अनेक उंच उंच शिखरांनीं अलंकृत आहे, त्याच्या उदरांतून लहान-मोठ्या नद्या जन्म पावून पूर्व समुद्राकडे धांवत आहेत व त्याच्या दऱ्या-खोऱ्यांतून अनुपम असें वनश्रीसौंदर्य विखुरलें आहे. पण थोडा विचार केल्यास या सर्व वस्तुजातामध्यें कणखरपणा व राकटपणा असल्याचें दिसून येतें. अर्थात् सह्याद्रीची ही प्रकृति त्याच्या कुशींत जन्म पावलेल्या महाराष्ट्राची असावी यांत नवल तें काय ?

महाराष्ट्र महान् राष्ट्र म्हणून कां गाजत राहिलें? हें आणखी नीट समजून घ्यावयाचें असल्यास त्याच्या पिंडांत आढळून येणाऱ्या खालील पांच गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत. त्या अशा :

**महाराष्ट्र.** महाराष्ट्रामध्येंच जन्माला आलेला व आचारांत असलेला हा एक विशेष मौल्यवान् ठेवा केवळ महाराष्ट्राचाच आहे. त्याचें स्वरूप व आचारविचार नीट आकलन होण्यास त्याचा स्वतंत्रच अभ्यास केला पाहिजे. इथें कारणापुरतें इतिहासाचार्य राजवाडे यांचें एक वचन उद्धृत करतों. त्यावरून महाराष्ट्रधर्माची रूपरेखा कळेल.

राजवाडे म्हणतात, "अर्वाचीन कालीं महाराष्ट्रधर्माचे प्रमुख वक्ते श्री समर्थ रामदास स्वामी झाले आणि प्रमुख कर्ते श्रीमत् छत्रपति शिवाजी राजे झाले. महाराष्ट्रधर्माचें संकलित रूप पहिल्याच्या ग्रंथांत व कृतींत सांपडतें आणि दुसऱ्याच्या पत्रव्यवहारांत आणि पराक्रमांत आढळतें. अर्थात् ज्यांना ज्यांना म्हणून महाराष्ट्र धर्म समजून घ्यावयाचा असेल त्यांनीं त्यांनीं या नर-नारायणांच्या लेखांचा व कृतींचा अभ्यास साक्षेपानें केला पाहिजे."

**मराठी संस्कृति.** महाराष्ट्रधर्माबरोबर महाराष्ट्रीय लोकांनीं आपली अशी एक स्वतंत्र संस्कृति निर्माण केली असून तिचें स्वरूप मोठें अपरूप आहे. कोणत्याहि संस्कृतीचें स्वरूप सदैव सर्वव्यापक व सर्वप्रसृत असतें. मराठी संस्कृति या नियमाला अपवाद नाहीं. ती महाराष्ट्रीय लोकांच्या भाषेंत आचाराविचारांत दैनंदिन व्यवहारांत, कुलधर्म-कुलाचारांत, दैवतांत, तीर्थादिकांच्या स्थानीं आणि यात्राजत्रांतून आढळतें. या संस्कृतीचें ठळक स्वरूप पाहावयाचें असल्यास वारकरी संप्रदायाची पंढरीस जमणाऱ्या भक्तमंडळींच्या दिंड्या पाहाव्या आणि त्याच्या जोडीला (पूर्वकालीं) निघणारीं राजांची शिलंगणाची स्वारी आठवावी! मराठी संस्कृतीचे रक्षक व भोक्ते वारकरी आहेत व तिचे अभिमानी प्रतिपालक धारकरी म्हणजे वेळोवेळीं निर्माण झालेले वीर-पुरुष आहेत! म्हणून आमचा हा वडिलार्जित ठेवा आम्ही नीट समजून घेतला पाहिजे. त्याची उपेक्षा होतां कामा नये. अभ्यासाकरितां शिवशाहीचा काल ध्यानीं घ्या. त्या कालीं आमचा उदय होऊन राष्ट्र या नात्यानें आम्हांला जें महत्पद प्राप्त झालें व आमच्या पुरख्यांनीं जें राजवैभव भोगलें, त्याचें प्रमुख कारण, आमच्या सन्तांचें व शूरावीरांचें मराठी संस्कृतीचें

परिपालन हेंच होय. देश-काल-परिस्थिति ओळखून आम्ही आजहि हें जुनें ठेवणें नव्या दृष्टीनें जोपासलें पाहिजे. तें फलदायी झाल्यावांचून राहणार नाहीं. त्याबद्दल प्रयत्न हवा. आत्मविश्वासहि हवा. असो.

**मराठ्यांचा इतिहास.** सध्यांच्या पडत्या कालांत आमच्या निराश मनाला नवा उत्साह देणारा व मार्गदर्शन करणारा असा हा अमृताचा झरा आहे. आम्ही याचा उपयोग करून घेऊं तेवढा तोकडा पडेल. श्री ज्ञानेशांच्या उदयकालापासून आम्ही याचा मागोवा घ्यावा. आमच्या परिशीलनाचें सार्थक झाल्यावांचून राहणार नाहीं. एक शिवचरित्राचें पर्व घ्या. पराक्रमाची शौर्याधैर्याची, मनःसामर्थ्याची आणि राजकरणपटुत्वाची केवढी महनीय परंपरा आढळते ! श्रीमत् छत्रपति शिवाजी राजांची थोरवी तुम्ही आम्ही काय वर्णावी ! मानवजातीच्या ज्ञात इतिहासांत ज्या शूरावीरांनीं स्वतःच्या बलावर राज्यें मिळाविलीं वा स्थापिलीं त्या सर्व वीराग्रणींत आमच्या शिवबाचें चरित्र अगदीं आगळें म्हणूनच अत्यंत वंदनीय असें आहे. यासंबंधांत श्रीसमर्थ रामदासांनीं या थोर पुरुषाचा किती गौरव गाइला आहे, पहा—

> " निश्चयाचा महामेरु । बहुत जनासि आधारु । अखंड स्थितीचा
> निर्धारु श्रीमंत योगी ॥ "
>
> " शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
> शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ! ! "

आणखी यांत काय सांगावें ?— आजच्या कालाला अनुरूप असा श्री शिवबांच्या चरित्रापासून जो कांहीं बोध मिळेल, त्याचा एकसहस्रांश आम्ही आचाराविचारांत आणूं तर आमच्या मायभूचे पांग केवढ्या तरी मोठ्या प्रमाणांत फेडूं शकूं.

आणि ज्या राष्ट्राचा भूतकाल असा उज्ज्वल व स्फूर्तिदायक आहे त्याचा भविष्यकालहि तसा होणें काय अशक्य आहे ?— जवान मित्रांनो याचें समर्पक उत्तर तुम्ही द्यावयाचें आहे.

**मराठी भाषा.** आम्हा महाराष्ट्रीयांची मायबोली — मराठी. आज ती भाग्यानें महाराष्ट्र राज्याची राजभाषा ठरलेली आहे. अर्थात् यापुढें

आमची प्रतिज्ञा अशी असली पाहिजे—

*हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू,*
*वसे आमुच्या मात्र हृन्मंदिरीं ।*
*जगन्मान्यता हीस अर्पू प्रतापें*
*हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं ।*

कवीची ही इच्छा अगदीं वास्तववादी असून जगाच्या मौलिक साहित्य-संभारांत मराठी भाषेला व तिच्या साहित्याला मानाचें स्थान मिळवून देणें अशक्य नाहीं. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आमच्याकडे पाहण्याची पाश्चिमात्यांची दृष्टि पूर्वीसारखी तुच्छतेची वा अवमानकारक राहिलेली नाहीं. भारत देश राष्ट्र नात्यानें विद्या, कला, साहित्य, तत्त्वज्ञान इत्यादि विषयांत मोठें गुणसंपन्न असून त्याच्यापासून शिकण्यासारखें पुष्कळ आहे, असें पुढारलेल्या राष्ट्रांना पटूं लागलें आहे.

तेव्हां ही सुसंधि महाराष्ट्रीयांनीं दुर्लक्षून चालणार नाहीं. त्यांनींहि आपली भाषा, इतिहास, संस्कृति यांचें वैभव पाश्चिमात्यांना सुलभ करून दिलें पाहिजे. आपण आपलें महत्त्व नीट जाणलें म्हणजे तें इतरांनाहि पटवून देतां येतें.

भारतांत सध्यां ज्या पुढारलेल्या व वाङ्मयानें समृद्ध भाषा आहेत; हिन्दी, बंगाली, गुजराथी इत्यादि—त्यांच्या मांडीला मांडी लावून बसण्याइतका थोरपणा मराठी भाषा व तिचें साहित्य यांना आहे. आम्ही तें आग्रहपूर्वक पुढें मांडलें पाहिजे. अल्पावधींत त्यांची योग्यता भारतांतील इतर देशांना व जगाला कळल्यावांचून राहणार नाहीं. आमच्याकडून प्रयत्नपूर्वक उत्थान झालें पाहिजे.

महाराष्ट्र भाषेच्या पोटांत तिच्याशीं पूर्ण संलग्न अशा दुय्यम मराठी बोलभाषा आहेत. त्या सर्वांचा संसार मोठा व्यापक हृदयग्राही व अभ्यसनीय आहे. आम्ही मनावर घेतल्यास आमच्या भाषेची ही मौलिकता जगाला सहज पटवून देऊं.

तरुण मित्रांनो आपल्या मायबोलीचे हे पांग फेडण्याचें तुम्हीच मनावर घेतलें पाहिजे.

**मराठी बाणा.** महाराष्ट्रीय लोकांत अंगभूत असे जे कांहीं श्रेष्ठ गुण आहेत, त्यांत त्यांचा बाणा हा एक विशेष स्वभावधर्म आहे. महाराष्ट्राच्या नवीन पिढीनें हा आपला राष्ट्रीय बाणा नीट समजून घेतला पाहिजे. *मराठा* या जोमदार नांवांत त्याचें रहस्य आहे.

मरहट्ट या मूळ शब्दापासून मराठा हा प्राकृत शब्द तयार झाल्याचें सांगतात. किंवदन्तीनें या मरहट्ट शब्दांतून असा अर्थ काढला आहे कीं, जो मरेपर्यंत हटत नाहीं, तो मरहट्टा = मराठा !

या दृष्टीनें विचार केल्यास आम्ही मराठा या नांवास पात्र आहोंत का ? आमच्या इतिहासाचें उत्तर ' होय ' असें आहे.

कोणतेंहि लहान-मोठें संकट असो वा शत्रु असो, आम्ही महाराष्ट्रीय त्याच्यापुढें ताठ उभें ठाकलों कीं, आम्ही माघार घेत नाहीं. संकटाला वा शत्रूला आमच्यापुढें हार खावी लागते ! या झटापटींत खरी मौज ही आहे कीं, वीरश्रीच्या भरांत आम्ही स्वतःचा बळी सुखासुखीं देत नाहीं. वीर मरणाचें महत्त्व आम्ही जाणतों. पण तें अविचारानें न यावें याची आम्ही दक्षता घेतों. मरहट्टा या शब्दाचा खरा अर्थ असा आहे. स्पष्ट सांगावयाचें म्हणजे आम्हा मराठ्यांना शूराचा हात आहे तसा मुत्सद्द्याचा मेंदूहि आहे ! आमच्या गतेतिहासांत या विधानाची साक्ष पानोपानीं आहे. आणि श्रीशिवछत्रपतींचें चरित्र हें त्याचें बांकें उदाहरण आहे !

तात्पर्य, मराठी बाणा म्हणजे महाराष्ट्रधर्माचा प्रमुख आचार. बाहुबलानें झुंजायचें आणि बुद्धिबलानें संकटपार व्हावयाचें ! असो.

येथपर्यंत आपण महाराष्ट्र व महाराष्ट्रीय लोक यांच्यासंबंधीं जें परीक्षण-निरीक्षण— केलें तें गुणैक दृष्टीनें. पण एवढ्यावरच हा विषय पुरा करून चालणार नाहीं. वर्तमानकालांत आम्ही व आमचें महाराष्ट्र कोणत्या पायरीवर उभें आहे. तें पाहिलें पाहिजे. मागची कीर्ति सांगण्यांत कसलाच पुरुषार्थ नाहीं. उलट ती गोष्ट अत्यंत हास्यास्पद व अनुचित आहे.

म्हणून सद्यःकालाचा विचार करावयाचा.

आजचा महाराष्ट्र व त्यांत नांदणारे आम्ही महाराष्ट्रीय लोक कसे आहोंत ?

शरमेनें मान खालीं घालण्याचा प्रसंग येईल अशी वस्तुस्थिति आम्ही आमच्या कर्मानें करून घेतलेली आहे.

महाराष्ट्रीय म्हणजे बुद्धिमान् व लढवय्या लोकांची जात, हा आमचा लौकिक भारतांतील इतर लोक आजहि मानतात; पण त्यापलीकडे आमची गुणवत्ता एकदम संपते ! आणि तेथून आमच्या दुर्लौकिकाला प्रारंभ होतो.

आतां अगदीं निःस्पृहपणानें व कडक शब्दांतच बोललें पाहिजे. प्रथमच सांगावयाचें म्हणजे व्यक्तिशः व राष्ट्रीय दृष्टीनें आमच्या अंगीं अनेक दोषांनीं व दुर्गुणांनीं असें कांहीं ठाण मंडलें आहे कीं, आमच्या साऱ्या राष्ट्रीय सद्गुणांची पूर्ण राखरांगोळी झाली असून आम्ही पूर्ण अधःपतित झालों आहों व सर्वांचा तिरस्कार व अवहेलना आमच्या वांट्याला आलेली आहे !

आपसांतच कडाडून भांडणें, परस्परांचा परस्परांनीं द्वेष करणें, कोणा-चाहि उत्कर्ष कोणाला सहन न होणें, साध्यासुध्या गोष्टींतहि मिळतें न घेणें आणि स्वतःची अहंमन्यता टिकविण्याकरितां राष्ट्रहिताचा व सामाजिक स्वास्थ्याचा बळी देणें या गोष्टी आमच्या इतक्या अंगवळणीं पडल्या आहेत कीं, त्याची लाज वा खंत आम्हांला काडीमात्र वाटत नाहीं.

यांतच पराकोटीची स्वार्थलंपटता, परकान्ता व परधन लुबाडण्याची राक्षसी वृत्ति आणि इतरांच्या प्राणांविषयीं बेपर्वा या दुर्गुणांनींहि आम्ही पूर्ण माखलों आहों.

या साऱ्या प्रकारामुळें आम्ही महाराष्ट्रीय किती कर्मदरिद्री, निर्धन, निर्लज्ज व तिरस्कारार्ह आहों, हें काय सांगायला पाहिजे ?

विशेष लिहिण्यांत अर्थ नाहीं. मी हें सारें दृष्टिआड करून तरुण पिढीकडे आशेनें पाहत आहें व त्यांच्या कर्तृत्वाला आवाहन देत आहें. तरुण पिढी हेंच आमच्या राष्ट्राचें मोठ्यांत मोठें आशास्थान आहे.

जवान मित्रांनो, तुमचें कार्यक्षेत्र तुमच्यापुढें आहे. पूर्वजांची पुण्याई तुमच्या पाठीशी आहे. इतिहासाची शिकवण तुम्हांला मार्गदर्शन करील. सज्जन तुम्हांला आशीर्वाद देतील. परिस्थिति किती वाईट आहे वा अनुकूलता किती थोडी आहे हें पाहूं नका. राष्ट्रहितवर्धक व लोककल्याण-कारक काम करतां येईल याचा विचार करा आणि जीवनधर्म अचरण्यास

प्रारंभ करा. तुमचें कर्तृत्व वाढीला लागूं दे. यश तुमचें आहे. निश्चितपणें यश तुमचें आहे. तुमच्या आचाराविचारानें महाराष्ट्राचा गमावलेला मान शंभरांत एक या प्रमाणांत परत आला तरी तुम्ही फार मोठी कामगिरी बजावलीत, असें जग म्हणूं लागेल.

आता कार्यक्षेत्राचा दुसरा किंवा पुढचा भाग म्हणजे भारत होय. यांचा थोडक्यांत विचार करूं.

आम्हांला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पुढारलेल्या राष्ट्रांची आमच्याकडे पाहण्याची दृष्टि बदललेली आहे. स्वतंत्र राष्ट्र म्हणून आम्हांला कांहीं मान आहे यांत शंका नाहीं. पण त्याचें स्वरूप केवळ शिष्टाचाराचें आहे, त्यांत सत्याचा अंश अगदीं थोडा आहे हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे.

इंग्लंड, अमेरिका, जर्मनी यांचा राष्ट्रीय विकास ज्या गुणांनीं झाला, त्यांपैकीं एकहि चांगला राष्ट्रीय गुण आमच्या अंगीं नाहीं. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. आमच्यावर सुखानें राज्य करणारा इंग्रज. पण शंभर-सव्वाशें वर्षें त्यांच्या अंकित राहून आम्ही त्यांच्यापासून राष्ट्रहित-संवर्धक असा एकहि गुण उचलला नाहीं; हें केवढें नवल ?—आणि त्यांनीं मात्र आमच्या नालायखीला किती अचूक ओळखलें ?

उद्यमशीलता, कष्टसहिष्णुता, निरलसवृत्ति, ध्येयनिष्ठा, सत्यशोधनाची जिज्ञासा, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता सांभाळण्याविषयीं दक्षता व स्वराष्ट्रहितार्थ स्वार्थनिरपेक्षता हे इंग्लिश-अमेरिकन-जर्मनादि लोकांच्या ठायीं आढळणारे प्रमुख राष्ट्रीय सद्गुण. पण यांपैकीं एक तरी राष्ट्रीय सद्गुण आम्हा भारतवासियांना ग्रहण करतां आला का ? सुतराम नाहीं. तेंच जपान या पौर्वात्य राष्ट्राकडे पहा. गेल्या युद्धांत त्याचा सपशेल पराभव झाला व तें अगदीं नामोहरम झालें. पण पाश्चिमात्यांचे गुण ग्रहण केलेलें प्रबळ व शहाणें राष्ट्र तें. आज पुन्हा तें आपल्या गुरूच्या मांडीला मांडी लावून बसलें आहे. युद्धपूर्वकालीन प्रतिष्ठा व वैभव पुन्हा हस्तगत करीत आहे !

आणि जपानच्या अगदीं उलट आम्ही बनलों आहों. इंग्रजांनीं आपली सत्ता आवरती घेतली व आम्हांला हवें असलेलें स्वातंत्र्य देऊन टाकलें ! परिणाम काय झाला ? इंग्रजांनीं कसें तरी आवळून धरलेलें भारत राष्ट्र पुन्हा पूर्ण विस्कळित झालें आहे ! आणि पारतंत्र्यांतील दुर्दशेपेक्षाहि आम्ही

आणखी दुदर्शित व बेबंद झालों आहों. सर्व राष्ट्रभर बजबजपुरी माजली असून नाना प्रकारच्या अंतःकलहांनीं आम्ही पिसाट बनलों आहों !

बाहेरचीं शहाणी राष्ट्रें आमची ही नालायकी पूर्ण ओळखीत आहेत. शिवाय, बाहेरच्या राष्ट्राशीं आमचा जो व्यापारटिपार सुरू झाला; त्यांतहि आम्ही सचोटी न दाखविल्यामुळें तिकडून आम्ही हलकट ठरलों आहों. स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें आमची ही केवढी अप्रतिष्ठा आहे !

तरुण मित्रांनो, भारताच्या या अधोगतीचा विचारहि तुम्ही तरुण मंडळींनीं मोठ्या पोटतिडकीनें केला पाहिजे. कारण, आपण मुळांत महाराष्ट्रीय व महाराष्ट्रभूचे असलों तरी भारताचे नागरिक आहों, हें विसरून चालणार नाहीं. आणि बाह्य जगताच्या दृष्टीनें आमचें भारतीयत्व फार महत्त्वाचें आहे. बाहेरचीं राष्ट्रें आमच्याकडे पाहतांना हा मराठा, हा बंगाली, हा राजस्थानी असें वर्गीकरण करून ओळखीत नाहींत. भारतांतील रहिवासी तो भारतीय नागरिक एवढें ते ओळखतात. तेव्हां जगतामध्यें भारताची प्रतिष्ठा वाढविण्याचें योजिल्यानंतर महाराष्ट्रीय हें प्रादेशिक नातें विसरून भारतीय हें नातें ध्यानांत घेणें इष्ट.

भारताच्या पोटांत राहून महाराष्ट्राचें यश वाढवावयाचें म्हटलें कीं आपण महाराष्ट्रीय. जगांत भारताचें नांव राखायचें तेव्हां भारतीय. असें व्रत आपण स्वीकारलें पाहिजे. आणि सर्वांशीं सहकार्य करून व स्नेह वाढवून त्याची सांगता केली पाहिजे.

सध्यांच्या तरुण मंडळींवर हें फार मोठें उत्तरदायित्व आहे. पण तें त्यांनीं मोठ्या उत्साहानें, धैर्यानें व आनंदानें स्वीकारलें पाहिजे आणि आजच्या चिन्तातुर झालेल्या वृद्ध पिढीला दिलासा दिला पाहिजे. अर्थात् हें कार्य सोपें नाहीं. पण तरुणांनीं तें अवघडहि मानतां कामा नये. कमर कसून व दंड थोपटून त्यांनीं कालाचें हें आव्हान स्वीकारलें पाहिजे.

याकरितां त्यांनीं गेल्या तीन-चार पिढ्यांच्या कर्तृत्वाचा इतिहास पाहावा. राजसत्ता म्हणून इंग्रजांचें वर्चस्व प्रस्थापित होतांच त्या काळच्या समाज-धुरीणांनीं काय केलें ? त्यांनीं मन समतोल राखून आपले अवगुण शोधले आणि इंग्रजांचे गुण पारखले ! बंगालमध्यें राजा राममोहन राय, ईश्वरचंद्र

विद्यासागर व महाराष्ट्रांत लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित, महर्षी रानडे यांनीं काळ ओळखून समाजसुधारणेला हात घातला आणि पन्नास वर्षांच्या आंत सामाजिक सुधारणांत क्रान्ति घडवून आणिली.

आणि या क्रान्तींतून जन्म झाला भारताच्या स्वातंत्र्याचा ! तेंहि आंदोलन त्या त्या कालच्या लोकाग्रणींनीं साम-दाम-दंडादि साधनें वापरून जोरानें चालविलें आणि पुढच्या पन्नास वर्षांत स्वातंत्र्यहि संपादिलें ! आतां या पिढीपासून काय करावयाचें आहे? राष्ट्राची अंतःशुद्धि आणि नव्या कालांत प्राप्त झालेल्या भौतिक ज्ञानाची उपासना, असें द्विविध वा अनेकविध कार्य करावयाचें आहे. आणि तें सर्वांनीं वांटून घेऊन करावयचें आहे. मधमाश्याप्रमाणें अविरत, संघानें व कणाकणानें. कांहींच कठिण नाहीं यांत. तरुण मंडळींनीं तसा ध्यास घेतला पाहिजे व कार्याला लागलें पाहिजे.

अशा प्रकारें तरुण मंडळींनीं आपली जन्मभूमि व भारत राष्ट्र यांची सेवा आरंभिली कीं, त्यांच्या कृतिवृत्तीला व विचारांना प्रतिष्ठा लाभत जाईल व जगाच्या संसारांत त्यांना मानाचें स्थान आपसुखच मिळेल. मग त्यांच्या कार्याचें तिसरें क्षेत्र जें जग त्याच्या हिताहिताचा विचार करण्यास संधि मिळेल व सवडहि सांपडेल.

सध्यां पाश्चिमात्यांनीं — यांत रशिया व चीन हे देश आलेच — भौतिक ज्ञानानें व शास्त्रीय संशोधनानें निसर्गावर मोठा विजय मिळविलेला आहे. एकंदर प्रगति न भूतो न भविष्यति अशी झाली आहे. पण त्याबरोबरच या मोठमोठ्या शक्तिसंपन्न राष्ट्रांत सत्तेसंबंधीं मोठी अटीतटीची स्पर्धा सुरू आहे आणि तींत वैरभाव फार दांडगा आहे. परिणाम असा झाला आहे कीं, जगभर अशांतीचा गोंधळ माजला आहे व पुन्हा एखादें महायुद्ध पेटतें की काय, ही शंका सर्वांनाच भयव्याकुळ करीत आहे.

अशा विपरीत अवस्थेंत भारताकडे शांतिदूताचें कार्य करण्याची भूमिका येण्याचा संभव आहे, कोणी सांगावें. तेव्हां आपण त्या दृष्टीनें जागरूक असणें आवश्यक आहे. शिवाय, अंतर्बाह्य शत्रूपासून त्रास आहेच. तरुण मित्रांनो, ही सारी धुरा वाहण्याचा भार तुमच्यावर पडणार ! म्हणून सावधान ! सावधान !!

## थोडा विशेष अभ्यास

महाराष्ट्राचें स्वरूप समजण्याकरितां खालील पुस्तकें वाचणें उपयुक्त होईल :

१. डॉ. सौ. इरावतीबाई कर्वे कृत — **मराठी संस्कृति.**
२. श्री. स. आ. जोगळेकर यांचें — **सह्याद्रि.**
३. पं. महादेवशास्त्री जोशी — **तीर्थरूप महाराष्ट्र.**
४. आचार्य अत्रे–कुलकर्णीकृत — **महाराष्ट्र गाथा.**

भारताचें महत्त्व समजण्यास

१. The Discovery of INDIA. पं. जवाहरलाल नेहरू.
२. भारताचार्य वैद्यकृत – मध्ययुगीन भारत – खंड १·२·३

× × ×

*नरदेह परम दुर्लभ । येथें वडे अलभ्य लाभ ।*
*दुर्लभ तें सुलभ । होत आहे ॥*
*येथें जेणें आळस केला । तो सर्वस्वें बुडाला ॥ १ ॥*

*यत्नाचा लोकभाग्याचा । यत्नेंवीण दरिद्रता ।*
*उमजला लोक तो धाला । उमजेना तो हपापला ॥ २ ॥*

*मुख्य यत्न विचाराचा । त्यावरी बोलणें बरें ।*
*चालणें सत्य नेमाचें । नीतिन्याय चुको नये ॥ ३ ॥*

× × ×

*आधीं कष्ट मग फळ । कष्टाचि नाहीं तें निर्फळ ।*
*साक्षेपेवीण केवळ । वृथा पुष्ट ॥ १ ॥*

*व्याप आटोप करिती । धकेचपेटे सोसिती ।*
*तेणें प्राणी सदेव होती । देखत देखतां ॥ २ ॥*

*अहो या शहाणपणा कारणें । बहुतांचे कष्ट सोसणें ।*
*परंतु शहाणपण शिकणें । हें उत्तमोत्तम ॥ ३ ॥*

*जो बहुतांसी मानला । तो जाणावा शहाणा जाला ।*
*जनीं शहाण्या मनुष्याला । काय उणे ॥ ४ ॥*

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 32043 .. वि: निबंध
क्रमांक 2375 नों: दि: 24५८

*विचारसूत्र सहावें*

# स्वतःला नीट ओळखा, नंतर हळूहळू शिकवा

जीवनधर्म आचरण्याचा हा पहिला धडा होय. स्वस्थचित्तानें व स्वतंत्र वेळ काढून हा समजून घेतला पाहिजे.

स्वतःचा अहंभाव बाजूला ठेवून स्वतःलाच नीट ओळखावयाचें आणि नंतर स्वतःच स्वतःचें शिष्यत्व पत्करून स्वतःजवळच शिकावयाचें. थोडा विचित्र विचार आहे हा, नाहीं का ! पण तो आपल्या हातांतील आहे व प्रत्यक्षांत आणण्यास बराचसा सुलभहि आहे. स्वतःशीं प्रामाणिक राहून त्याबद्दलचा प्रयत्न मात्र तळमळीनें व चिकाटीनें केला पाहिजे.

प्रथमच एक गोष्ट ध्यानांत घेण्यास हवी. वरील गुरु-शिष्य संबंध व त्याविषयींचा आचारविचार हा आपल्या नि त्याच्या जीवनांतील एक आगळा कप्पा आहे. अर्थ असा, प्रत्येक जवानाला शालेय शिक्षण संपल्या-नंतर क्रमप्राप्त व आवश्यक असें कौटुंबिक जीवन पत्करावें लागतें. उदर-निर्वाहार्थ अर्थोपार्जनाच्या मागें लागणें व जगरहाटीप्रमाणें यांत्रिक आयुष्यक्रम कंठूं लागणें प्रत्येकाचें अद्य कर्तव्य ठरतें. तेव्हां ते फेरे घेतांना, वर सांगितलेला धडा विचारांत घ्यावयाचा आहे.

मनुष्यस्वभावाला आवश्यक व पोषक असें सांसारिक जीवन यंत्राप्रमाणें गति घेऊन आपोआपच फिरूं लागतें. माणसाला त्यांत विशेष बुद्धि वा पराक्रम दाखविण्याचें कारण पडत नाहीं. पण ज्या जवानांचें ताजें रक्त आपण आपल्या समाजाकरितां, देशबांधवांकरितां व राष्ट्राकरितां कांहीं विशेष कर्तृत्व केलेंच पाहिजे या तळमळीनें सळसळूं लागतें; त्यांनीं आपला तो स्फुलिंग विझूं देतां कामा नये. ‘अग्नी तो चेतवावारे’ या उक्तीप्रमाणें

तो फुलता ठेवला पाहिजे. याकरितां या लेखांकाचें सूत्र—

*" स्वतःला नीट ओळखा. नंतर हळूहळू स्वतःला शिकवा. "*

मनुष्यस्वभावाची मोठी गम्मत आहे. तो सर्वसामान्य ज्ञानानें जगाला ओळखूं शकतो आणि इतरांसंबंधीं नाना प्रकारची वैचारिक उठाठेव वा धांवपळ करीत राहतो. यांत तो स्वतःच्या जबाबदारीला विसरतो. सामान्य माणसें सामान्य व निष्क्रिय राहतात तीं यामुळें.

कर्तृत्ववान् माणसांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टि याहून वेगळी असते. तीं आधीं स्वतःकडे पाहतात. स्वतःला शहाणीं करतात आणि स्वतःच्या आचारानें जगाला आपल्या मागोमाग येण्यास भाग पाडतात. म्हणून होतकरू तरुणांनीं स्वतःला आधीं पारखावें व शिकवावें. जीवनधर्माचें मर्म त्यांना हळूहळू कळूं लागेल. त्यांच्या हातून इष्ट तें कार्यहि होऊं शकेल.

स्वतःची पहिली ओळख आपल्याला ही झाली पाहिजे कीं, आपण माणूस आहों, आपण केवळ आपल्यापुरतें जीवन जगण्यास वा सुखोपभोग मिळविण्यास मनुष्यजन्म घेतलेला नाहीं. माणुसकीचें स्मरण मला सतत ठेविलें पाहिजे. स्वार्थप्रियता मी जन्मतःच घेऊन आलों आहे. तेव्हां स्वतःच्या सुखदुःखाविषयीं मी जागरूक राहीन. पण जीवनांत तेवढेंच परमसाध्य मानणें केवळ पशुता आहे. ती मला दूर सारली पाहिजे आणि मनुष्य म्हणून माणुसकीनें वागलें पाहिजे.

तरुण मित्रांनो, तुमच्या मनांत माणुसकीसंबंधींचा हा विचार जागृत झाला कीं, तुम्हीं स्वतःची तोंडओळख करून घेतलीत असें समजण्यास कांहींच हरकत नाहीं. यानंतर ही ओळख मनावर पक्की ठसेल असा प्रयत्न झाला पाहिजे. ज्या व्यक्तीविषयीं वा वस्तूविषयीं आपल्याला आत्मीयता वाटते तिचें स्मरण आपल्या मनांत नीट ठसतें. माणुसकीविषयीं आपण तशी आस्था बाळगली पाहिजे. म्हणजे आपण स्वतःला नीट ओळखूं लागूं.

साध्या माणुसकीचा अभाव हें भारताच्या व महाराष्ट्राच्या सर्व आपत्तीचें व अधोगतीचें प्रबल कारण आहे, हें मागच्या सूत्रांत आपण विवेचलें. तेव्हां तें ध्यानी घेऊन जवानांनीं स्वतःला तो पाठ प्रथम दिला पाहिजे.

माणुसकीसंबंधीं एक सोपी व सुंदर व्याख्या वाचण्यांत आली. ती अशी : काल, जीवन, परिस्थिति आणि माणसें या सर्वांशीं सद्भावानें जुळतें

घेणें याचें नांव माणुसकी. या व्याख्येप्रमाणें त्या त्या गोष्टीचा यथायोग्य परामर्श घेत गेल्यास आपल्याला माणुसकीसंबंधीं विशेष उलगडा पडत जाईल व जीवनांत असलेल्या गांठी सुलभतेने सुटतील. पुढच्या प्रतिपादनांत तें क्रमाक्रमानें पाहूं.

आतां यापुढचा दुसरा विचार. स्वतःच गुरु होऊन स्वतःला शिकविणें आणि आपणच शिष्य होऊन शिकणें. सकृद्दर्शनीं हा गुरु-शिष्य भाव चमत्कारिक वाटेल; कठिणहि वाटेल. पण जवान मंडळींमध्यें जागृति होणें व त्यांना स्वकर्तव्याचा नीट उलगडा पडणें, याला अन्य उपाय नाहीं. जवानांनीं जवानींतच हा प्रयोग करून पाहिला पाहिजे. आणि स्वतःच स्वतःला जीवनांतील निरानिराळ्या मूल्यांचें महत्त्व पटवून दिलें पाहिजे.

याचें कारण एकच जवानांची उन्मादकारी मनोवृत्ति होय. महाविद्यालयांतील शिक्षण घेऊन यशस्वीपणानें पार पडलेला तरुण हा कोणाच्याहि अंकित राहूं शकत नाहीं. त्याला कोणाविषयीं व कशाविषयीं फारसा आदर वाटत नाहीं. तो स्वयंशिष्ट, चंचल, बेलगामी व साहसी बनत जातो. विशेषें-करून बुद्धिमान् व क्रियाशील तरुण हटकून या उच्छृंखलपणांत सांपडतो आणि यांत विचारांत घेण्यासारखी मौज ही कीं, हें स्वतःचें उन्मादकारी वर्तन त्याचें त्यालाहि पटत नाहीं आणि आपल्या शक्ती-बुद्धीचें काय करावें याचें त्याला कोडें पडतें !

तरुण मंडळीच्या मनोवृत्तींचा विचार सहानुभूतीने केल्यास वरील विधान कोणाहि वडील माणसांना सहज पटेल. अनुभवाचेंहि वाटेल.

अशा या बुद्धिवान उन्मादी तरुणांच्या मनोधर्मांचा अभ्यास स्थूल मानानें केल्यास त्यांच्यामध्यें दोन परस्परविरोधी वर्ग पडलेले आढळतात. पहिला भांबावून गेलेला निराशावादी आणि दुसरा सुखलोलुप असा केवळ मनोरथ-वादी. दोघेहि विद्याविभूषित. कांहीं केलें पाहिजे असें वाटणाऱ्यांपैकीं. पण दोघेहि आपआपल्यापरी अडलेले.

महाविद्यालयांत मिळालेल्या व्यापक शिक्षणानें भारावलेला पहिल्या वर्गातील तरुण जग व जीवन याचें स्वरूप स्वतःच्या कल्पनारम्य निकषावर घासून पाहतो आणि उतावीपळणानें म्हणतो, “ छे ! आपलें शिक्षण जग व जीवन समजून घेण्यास अगदींच निरर्थक आहे. पाश्चिमात्यांचें वैभव, प्रगति

व त्यांच्या आशा-आकांक्षा ध्यानीं घेऊन तो स्वतःकडे व स्वतःच्या देश-स्थितीकडे पाहूं लागतो ! मग त्याला आपल्या भोंवतालचें जग अगदींच सामान्य भासूं लागतें. जीवन भकास वाटतें आणि परिस्थिति जंजाळमय दिसते. याचा परिणाम म्हणजे त्याची भयंकर निराशा ! अजाण किंकर्तव्य-मूढता ! मग तो मानतो : आपण सर्वस्वीं अपुरे आहों व पलीकडचें जग पूर्णत्वाला पोंचलें आहे. पाश्चिमात्यांची दौड विद्युद्गतीची आहे, आपण लुळे-पांगळे आहों. यांतच त्याच्या कर्तृत्वाची इतिश्री होते.

आतां हा दुसरा मनोरथवादी तरुण. याचा मनोवेग मोठा दांडगा. उत्साह अस्ताव्यस्त. आपण मनांत आणूं तें करून दाखवूं असा आवेश आणि तोंडी शब्दशूरत्व ! या तरुणाला वैचारिक उठाठेव पुष्कळ सुचते आणि स्वतःच्या बुद्धिमत्तेचें व चापल्याचें प्रदर्शन करण्यास तो धावाधावहि खूप करतो ! पण त्याच्या या कृति-वृत्तीला पक्कें अधिष्ठान कसलेंच नसतें !

परिणाम : निराशावादी तरुणासारखाच. किंकर्तव्यमूढता ! आतां या दोन्ही वर्गातील तरुणांची समजूत घालावयाची कोणीं व कशी ? आणि त्यांना मार्गदर्शन तरी कोणीं व कसें करावयाचें ? गुरुजनांचें कांहीं ऐकावें, असें त्यांना वाटत नाहीं. साधा बुद्धिवादहि त्यांना पटत नाहीं.

याकरितां वडील माणसें व गुरुजन यांनीं या तरुण मंडळींची उपेक्षा न करतां वा प्रत्यक्ष कांहीं न सांगतां त्यांचा त्यांना कांहीं उलगडा पडेल असा बनाव रचावा. उपयोग होईलच असें न मानतां सूचक गोष्टी बोलाव्या. आणि अलिप्त राहावें.

तरुणांनीं स्वतःच गुरु-शिष्य भाव पत्करून स्वतः सावध व्हावयाचें या-करितां.

बुद्धिमान् व क्रियाशील अशा तरुणांमध्यें कांहीं निवडक तरुणांच्या ठिकाणीं मधून मधून खऱ्या विवेकाची जागृति होते. त्यांत सर्वांविषयीं जरी कांही निर्वाळा देतां येत नाही; तरी यांपैकीं अनेकांचा पिंड सन्मार्गवर्ती असतो. अशा तरुणांना काय करावें ? आणि काय न करावें ?—हें सुचूं लागतें. विशेषेंकरून निराशावादी तरुणापेक्षां मनोरथवादी तरुणांची विवेक-जागृति फलदायी होऊं शकते. तेव्हां या दोन्ही प्रकारच्या तरुणांनीं स्वतःशीं प्रांजळपणें वागावें, बोलावें, आत्मपरीक्षण करावें.

पुढचा बुद्धिवाद अशा तरुणांशीं आहे.

तरुण मित्रांनो, तुम्ही निराशावादी आहां का ?—ढालीची दुसरी बाजू पाहण्याचे थोडे श्रम घ्या. तुम्हांला असें दिसून येईल कीं, काल थांबलेला नाहीं. म्हणून जग वा जीवन थांबलेलें नाहीं. बाह्य जग, त्यांतील सुधारणा व प्रगति पुष्कळ दांडगी असेल. पण त्याच्याशीं आपल्याला काय कर्तव्य ? आपलें जग व आपली परिस्थिति वेगळी आहे. आपल्याला कोणीं अडविलेलें नाहीं. आपल्या समाजाच्या गरजा पुष्कळ आहेत व आपल्या राष्ट्राच्या पुनरुत्थानाचें कार्यहि प्रचंड आहे. आपण आपल्या शक्तीबुद्धीप्रमाणें सुचेल तें व झेपेल असें कार्य करण्यास प्रारंभ करूं या. थेंबाथेंबानें घडा भरतो. तो लगोलग वा कांहीं वेळानें भरेल. त्याचें काय होय !

असा कांहीं विचार करून नैराश्य झाडून टाकावें. पुढचा सुंदर विचार ध्यानीं घ्या.

> " No one is useless in the world who lightens
> the burden of it for anyone else. "

[ या जगांत भासणारा दुःखाकष्टाचा भार इतरांकरितां कांहीं चांगलें कृत्य करून थोडा तरी हलका करितो, त्याचा जन्म वायां जातच नाहीं. ]

हें झालें निराशावादी तरुणाविषयीं. आतां मनोरथवादींना थोडेंसें ऐकवूं. त्यांच्या उत्साहाला व मनोरथाला आधार हवा, प्रत्यक्ष कृतीचा. बोलाच्या कढी-भातानें लहानशा पांखराचेंहि पोट भरत नाहीं. मोठासा अंधकार दूर सारण्यास मिणमिण करणारी दिवलीहि पुरते.

म्हणून कांहीं कृति हवी. मनोराज्यांत हवेल्या उठवाव्या पण, प्रत्यक्षांत झोपडी बांधावयाची झाल्यास त्याला थोडा तरी पाया हवा.

तरुण मित्रांनो, हें पक्कें जाणून असा कीं, तुमचा तारुण्याचा जोम म्हणजे उंचीवरून खालीं उडी घेणारा प्रचंड शक्तीचा धबधबा ! त्या प्रचंड शक्तीपुढें भांबावून जायचें नाहीं किंवा तिचें केवळ कौतुकहि करावयाचें नाहीं. स्वतःच्या युक्ती-बुद्धीचे टरबाईन्स तिच्या आवांक्यांत बसवावयाचें व सगळीकडे खेळवितां येईल अशी विद्युत् निर्माण करावयाची. हें कार्य म्हटलें तर अवघड आहे, म्हटलें तर सोपें आहे. ज्याच्या त्याच्या कर्तृत्वाचा तो कस आहे.

याकरितां प्रथम थोडा-फार विवेक हवा. नंतर त्यांतून स्वतःचें कांहीं

उद्दिष्ट ठरविलें जावें आणि मग त्याला धरून उद्योगाची कास धरावी. पुढें सरण्याची, प्रगत होण्याची, पौरुष दाखविण्याची व जीवनाच्या भाऊगर्दींतून वाट काढण्याची हींच एकमात्र साधनें आहेत.

विवेक. उद्दिष्ट. उद्योग ! दैनंदिन आयुष्यक्रम आणि सांसारिक जीवन यथासांग करीत ही उपासना केली पाहिजे. महत्त्वाकांक्षी व साक्षेपी तरुणांना हें साधण्यासारखें आहे. असो.

या सूत्राच्या प्रारंभीं आपण मथळ्यांत दर्शविलें आहे कीं, स्वतःला नीट ओळखल्यानंतर स्वतःला हळूहळू शिकवूं लागा. तेव्हां स्वतःच्या शिकवणी-संबंधींचा कांहीं विचार आतां करूं.

तरुण मित्रांनो, शालेय जीवनांतील एक अनुभव तुमच्या अवलोकनांत आला असेल. साधारणपणें चलाख बुद्धीचे विद्यार्थी थोडे बुजट, मागें राहणारे असतात. त्यांच्या हिताची काळजी वाहणारे दक्ष शिक्षक काय करतात, अशा चांगल्या विद्यार्थ्याला अचूक ओळखतात. नंतर त्याच्यावर लक्ष ठेवून त्याला हाताशीं धरतात. मग त्याला योग्य वेळीं धाक दाखवून, कधीं त्याला हिणवून तर कधीं चुचकारून, कधीं शाबासकी देऊन तर कधीं त्याचा धिक्कार करून त्याला शिकवितात व प्रगतिपथावर नेतात. अगदीं याच पद्धतीनें तरुणांनीं स्वतःकडे पाहावें आणि जीवन-धर्माचे धडे त्याला म्हणजे स्वतःला शिकवावे. यांत धिमेपणा हवा आणि कांहीं विशेष पद्धतीचा अभ्यासक्रम हवा.

हें एक उघडें सत्य आहे कीं, सध्यांचें आपलें सांसारिक वा एकंदर राष्ट्रीय जीवन अगदीं एकमार्गी, एकसुरी, निर्जीव व यंत्रबद्ध झालें आहे. त्यांत माणसाचें शरीर विशेष प्रकारच्या कष्टानें झिजत नाहीं. पराक्रमाचा स्फुलिंग चेतत नाहीं आणि ताज्या उत्साहाच्या ऊर्मि उठत नाहींत. ठराविक धनोपार्जन, ठराविक संसारी जीवन ! भोंवतालीं सारें उदास, उदास !

गोष्ट अक्षरशः खरी. तरी पण स्वतःची ओळख पटलेल्या जवानांनीं मनाला आलेली काजळी झाडून टाकली पाहिजे आणि स्वतःला खडसून बजावलें पाहिजे कीं, “ समोर आहे तें सारें मान्य करून मला कांहीं केलें पाहिजे. अमुक नाहीं म्हणून तमुक होत नाहीं, असें तुणतुणें वाजविण्यांत अर्थ नाहीं.”

आणि या विचाराला उत्तेजन मिळेल असें एखादें थोर पुढाऱ्याचें चरित्र पुढें घ्यावें त्यावर चांगला विचार करावा.

थोर थोर लोकांच्या चरित्रांत एक गोष्ट प्रामुख्यानें आढळतें. त्यांना जें थोर पद लाभलें, त्याची पूर्वतयारी वा त्याला आवश्यक अशी अनुकूलता काडीची नव्हती. उलट, साऱ्या गोष्टींची प्रतिकूलताच ! त्या त्या थोर लोकांनीं ती लक्षांत न घेतां स्वतःला धीर देत, पडत झगडत जलप्रवाहा प्रमाणें आपला मार्ग काढला !

उदाहरणार्थ, आपल्यांत होऊन गेलेल्या एका थोर पुढाऱ्याच्या चरित्राची ही रूपरेखा पाहा :

नामदार गोपाळ कृष्ण गोखले हें या महापुरुषाचें नांव. महात्मा गांधी गोखल्यांना राजकारणांत गुरु मानीत. यावरून या पुरुषाची श्रेष्ठता तरुणांनीं ओळखावी.

नामदार गोखल्यांचें जवानींतील कर्तृत्व पाहा. प्रो. सेल्बीसारखा विद्वान् म्हणे : “ गोखल्यांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व एवढें दांडगें आहे कीं, लंडनमध्यें जन्मजात इंग्रजालाहि तें लाजवील. ” दुसऱ्या कित्येक इंग्रजांची व इंग्लंडांतील लोकांची समजूत होती कीं, गोखल्यांना बाळपणापासून एखादी आंग्ल विदुषी दाई ठेवून इंग्रजी भाषेचें शिक्षण दिलें असलें पाहिजे.

कुठें इंग्लंड आणि कुठें गोखल्यांचें विद्यार्थिजीवन ! पण ऐन पंचविशींत गोखल्यांनीं हें भाषाप्रभुत्व मिळविलें होतें. ही सफलता त्यांना कशी लाभली होती ? —तरुण मंडळींनीं आवश्य विचार करावा.

बरें एवढ्यानें गोखल्यांचें कर्तृत्व संपलें ? —नाहीं. ज्या गणित विषयाचा बहुशः सर्व विद्यार्थ्यांना अगदीं कंटाळा असतो, त्यांत व किचकट अशा अर्थशास्त्रांत ते पट्टीचे विद्वान् होते ! त्यांचें ‘ शालेय गणित ’ पुस्तक वर्षानुवर्षे क्रमिक पुस्तक म्हणून अद्याप चालू आहे.

यानंतर गोखले प्राध्यापक म्हणून गाजले. पण तेवढें लहान वर्तुळहि त्यांच्या तेजस्वितेला, प्रचंड बुद्धिमत्तेला व प्रभावशाली वक्तृत्वाला भावलें नाहीं. त्यांचा पुरुषार्थ वाढूं लागला. त्यांची व महर्षी रानड्यांची गांठ पडली ! गोखले राजकरणांत शिरले ! नुसते मिरविण्याकरितां नव्हे. त्यांच्या विवेकाप्रमाणें त्यांनीं आपला मार्ग आंखला ! राजकारणांत त्यांनीं आपलें

स्वतंत्र स्थान असें निर्माण केलें कीं, इंग्रजी सत्तेला तें आदरपूर्वक मानावें लागलें !—आज गोखल्यांचें राजकारणांतील हें तंप इतिहासजमा झालें आहे. पण भारतानें जो स्वातंत्र्यसंग्राम केला, त्यांत गोखल्यांची आघाडीहि मोठी कार्यकारी ठरली आहे. गांधीजींची त्याला मान्यता आहे ! तरुणांनीं या गोष्टीचा खास अभ्यास करावा. त्यांच्या कर्तव्यपथावर झगझगीत प्रकाश पडेल. या चरित्रापासून त्यांना केवढें तरी प्रोत्साहन मिळेल.

आणखी पुढें पाहा. असा हा तगडा विद्वान् नि जाडा राजकारणपटु अन्य क्षेत्रांतहि चमकला !

गोखले टेनिस खेळण्यांत पटाईत, बिलिअर्डचे चांगले माहितगार आणि बुद्धिबळें खेळण्यांत अग्रेसर !– गोखल्यांसंबंधीं ही माहिती फारशी प्रसिद्ध नाहीं; पण ती सत्य आहे. तरुण मंडळीच्या विचारार्थ ती इथें मुद्दाम दिली आहे.

तरुण मित्रांनो, आतां तुम्हीच विचार करा. कर्तृत्ववानाचें चरित्र किती अष्टपैलू असूं शकतें !— आपला जीवनधर्म आचरतांना तुम्हांला कोणत्याहि प्रतिकूलतेचा वा अडचणींचा गाजावाजा करतां येणार नाहीं. तुम्ही प्रयत्नाला लागलेंच पाहिजे.

## थोडा अभ्यास

हें सूत्र समजण्याकरितां पांच निवडक चरित्रें वाचा.

× × ×

*सुप्रणीतो बलौघोहि कुरुते कार्यमुत्तमम् ।*
*अन्ध बलं जडं प्राहुः प्रणेतव्यं विचक्षणैः ॥*

[सामर्थ्याचा ओघ कुशलतेनें वळविला कीं, त्याच्याकडून उत्तम प्रकारचें कार्य होतें. बळ हें आंधळें व अचेतन आहे. सुजाण माणसानें त्याचा उपयोग ( इष्ट कार्याकडे ) करून घेतला पाहिजे. ]

× × ×

*उपाय पर्याय दीर्घ प्रेत्न । विवेकबळें नाना यत्न ।*
*करील तयाचें महिमान । तोचि जाणें ॥*

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
१२३९०

*विचारसूत्र सातवें*

# लोकशाहीचा कारभार : त्यांत जवानांचें स्थान

हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळालें आणि त्यानंतर लागलीच आमच्या लोकाग्रणींनीं आपल्या स्वतंत्र राष्ट्राची शासनप्रणाली कशी असावी याचा विचार केला. आणि युरोप-अमेरिकेंत सुप्रतिष्ठित झालेल्या लोकशाहीप्रमाणें आपला शासनकारभार चालावा, असें निश्चित केलें. नंतर या विचाराला धरून नवी शासनसंहिता तयार करण्यांत आली व तिला अनुसरून आपल्या देशांत लोकशाहीचा कारभार सुरू करण्यांत आला.

या गोष्टीला आतां एक तप होऊन गेलें. पण लोकशाहीच्या प्रमुख तत्त्वा-प्रमाणें आमच्या राज्यकारभाराची घडी अद्याप नीट बसलेली नाहीं. कारण एकच. इंग्रजांनीं स्थापन केलेलें कडक निर्बन्धयुक्त शासन घाई करून मोडून टाकण्यांत आलें आणि लोकशाहीचें नवें शासन आम्हांला कळलेंच नाहीं. यामुळें ‘ तेल गेलें तूप गेलें हातीं धुपाटणें राहिलें ’ या म्हणीप्रमाणें आमची फसगत झाली. आम्ही भांबावलों आणि लोकशाहीच्या नांवाखालीं वेडेचार करण्यास प्रवृत्त झालों. मागें सांगितलें तेंच राष्ट्र व राष्ट्रीयत्व या दोन्ही दृष्टीनें आम्ही अत्यंत अध:पतित झालों आहों आणि म्हणून स्वातंत्र्याच्या स्वर्गांत राहून आम्ही पारतंत्र्यांतील नरकयातना भोगीत आहों.

सुजाण जवानांनीं या वस्तुस्थितीचा नीट अभ्यास केला पाहिजे व जेणें करून आपली अधोगति थांबेल व मिळालेल्या स्वातंत्र्यांतून सुखसमृद्धि सर्वांना सारख्या प्रमाणांत लाभेल याकरितां झटलें पाहिजे.

लोकशाहीची व्याख्या थोडक्यांत अशी आहे :

लोकांचें राज्य. लोकांकरितां राज्य. आणि लोकांकडून चालविलेलें राज्य. याचा अर्थ, व्यक्तीच्या विकासाला सर्वत्र सारखा वाव. म्हणजे राजा आपण. शासनाधिकारी आपण. शासन मानणारी प्रजाहि आपण.

पण सध्यां काय दिसतें ?— आम्ही दुसऱ्याला शासन शिकविण्यास व त्यानें न मानल्यास त्याला कडक शासन झालेंच पाहिजे; असें आग्रहानें म्हणण्यास तयार आहों. पण स्वतः शासनांत वागण्यास तयार नाहीं. आम्ही स्वतःपुरते अधिकार जाणतों. त्यांचा मोठ्यांत मोठा लाभ लुबाडूं पाहतों. मात्र कर्तव्य टाळतों. विसरतों किंवा नाकारतोंहि लोकशाहीची खरी विटंबना आमच्या या स्वार्थलंपटतेमध्यें आहे !—हा कोळसा विशेष न उगाळणें बरें. म्हणून आवश्यक गोष्टी पाहूं.

सबंध भारतच कृषिप्रधान देश. तेव्हां शेती हा मुख्य विषय. आणि याच्याबरोबर शिक्षण, आरोग्य, व्यापार, उद्योगधंदे, याचाहि उत्कर्ष हवा. याकरितां न्यायदान, पोलिस खातें यांची आवश्यकता. मग या साऱ्या खटाटोपाच्या शाखोपशाखा ! यांच्याभोंवतीं सारें राजशासन !

याकरितां एकूण राज्ययंत्रणा अशी चालली पाहिजे कीं, जेणेंकरून लोकशाही सर्वसामान्य जनतेची व जनतेकरितां आहे हें व्यक्तिमात्राच्या प्रत्ययास यावें.

आमच्या राष्ट्राच्या संसारांत शेतीला प्राधान्य आहे. यामुळें खेड्यांना महत्त्व आहे. लोकसंख्येचें प्रमाण खेडोंपाडीं मोठ्या प्रमाणांत पसरलेलें आहे. तेव्हां समाजाची व राष्ट्राची जी कांहीं सुधारणा घडवून आणावयाची तिचा मुख्य भर खेड्याकडे वळविला पाहिजे, हें स्पष्टच आहे. पण यांत एक मोठी शोचनीय अवस्था निर्माण झाली आहे. गेल्या पाऊणशें-शंभर वर्षांत जी औद्योगिक क्रान्ति झाली, तिनें खेड्यांतील समाजधारणेला विस्मयकारक धक्का दिला आहे. देशांत यांत्रिक कारखान्यांची वाढ फार झपाट्यानें होत गेली. नगरें प्रचंड प्रमाणांत वाढत चाललीं. साधेंसुधें जीवन जगण्याचीं सूत्रें मुंबईसारख्या अफाट नगरींतून हलूं लागलीं. इकडे खेड्यांतून केवळ शेतीच्या उत्पन्नावर भागेना. बहुसंख्य खेडुतांना आपलें गांव सोडून

शहरांत येणें भाग पडूं लागलें. आपोआपच खेडीं रोडावत चाललीं व त्यांना अवकळा येऊं लागली ! सामान्य जनता मोठ्या पेचांत सांपडली. खेड्यांत उदरनिर्वाह होईना. नगरांत आल्यानंतर तेथील महागडें जीवन परवडेना. शिवाय, विस्कळितपणामुळें कुटुंबसंस्थेचीहि वाताहत झाली. तेव्हां या मुळांत निर्माण झालेल्या आपत्तीपुढें काय करायचें ?—ही विवंचना रज्याशासन करणाऱ्या मंत्र्यांच्या पुढें आहे. आणि लोकहिताची काळजी वाहणारे समाजांतील नेते व विचारी लोक यांच्याहि पुढें आहे.

बरें. ही शोचनीय अवस्था केवळ खेड्यांपुरतीच मर्यादित नाहीं. सगळीकडे सर्वांचाच बोजवारा उडालेला आहे. सहज खालपासून वरपर्यंत दृष्टि टाकावी. मनाला धसका बसेल अशीच परिस्थिति. खेडीं व्या. नगरें व्या. कुलें व्या. समाज पहा. उद्योग-व्यापार-धंदे पहा. सर्वत्र अंदाधुंदी—कशाकडे लक्ष द्यायचें ? आणि कोणकोणती विवंचना करायची ? पुढें सरकतां येत नाहीं. मागें जातां येत नाहीं. भोंवतालीं गडद अंधार. यांत आतां स्वतःचें सांसारिक जीवन सावरत कसें बसायचें व राष्ट्रीय जीवनाचा विचार केव्हां करायचा ?

प्रश्न सहज उडवून देण्यासारखा नाहीं. काल बदलला आहे. परिस्थिति गुंतागुंतीची झाली आहे आणि जीवनाचीं मूल्येंहि नव्या स्वरूपांत पुढें आलीं आहेत. तेव्हां हें सगळें गृहीत धरून जवान मित्रांनो, तुम्हांला मार्ग काढावयाचा आहे. आणि विश्वास बाळगा, तुम्ही मनावर घेतल्यास तुम्हांला तुमचीच विवेकबुद्धि मातेच्या ममतेनें तुमच्या पाठीवरून हात फिरवील व प्रोत्साहन देत म्हणेल : “ बाळ, हा पहा मार्ग. पाऊल उचल. तूं यशाला सामोरा जा. तें तुझ्या सामोरें येईल. ”

वरील विचार केवळ काव्यकल्पना नव्हे. होऊन गेलेल्या व ह्यात असलेल्या थोर थोर स्त्री-पुरुषांचा तो अनुभव आहे.

कर्तव्य करूं पाहणाऱ्या जवानांनीं एक महत्त्वाची गोष्ट ध्यानांत धरावी. जग व जीवन यांच्या रचनेंत गतिमानता हा प्रमुख व प्रभावी गुण आहे. सतत फिरणारें चक्र ! यामुळें या क्षणाला भयंकर काळोखी रात्र असली तरी ती विलयाला जाण्याच्या धांदलींत आहे आणि नव्या दिवसाचा रम्य प्रभातकाल मोठ्या थाटामाटांत येत आहे ! मग या अंधार रात्रीकडे पाहत

बसून हतबल होण्यापेक्षां प्रभातकालीं करावयाचीं कर्तव्यें योजून ठेवण्यास हरकत कोणती ?

दुसरी गोष्ट. मानवी जीवनांत निरुपायिक असें संकट एकच. मृत्यु ! —पण आयुष्याची दोरी बळकट असेपर्यंत तो येत नाहीं हें निश्चित. मग तोंपर्यंत समोरच्या असणाऱ्या व भासणाऱ्या संकटाचा परामर्श घेत त्यांना उधळून लावण्याची युक्ति का शोधूं नये !

मागच्या सूत्रांत स्वतःला ओळखलें व हळूहळू शिकवावें असें सांगितलें आहे त्याचें मर्म हें आहे. म्हणून व्यक्तीनें स्वतःला चुचकारत धीर देत पुढें ढकलावयाचें, अर्थात् व्यक्ति म्हणजे कुटुंब, कुटुंब म्हणजे समाज आणि समाज म्हणजे राष्ट्र असें पुढचें गणित आहे.

प्रत्येक जवानाच्या पुरुषार्थाचा कस यांत आहे. लोकशाही समजून घ्या. ती आचरूं लागा. कृतीने आपल्या बांधवांना शिकवा. अंधार निवळेल. नवा कार्यक्रम आंखण्यास उत्साह चढेल.

मागें आपण पाहिलें आहे कीं, आधीं सारासार विचार झाला पाहिजे. मग उद्दिष्ट ठरविलें पाहिजे आणि मग उद्योगाला हात घातला पाहिजे. विचारजागृतीचें मोठें खाद्य म्हणजे इच्छित विषयाचें वाचन, परिस्थितीचें अवलोकन आणि विद्वान् लोकांचें भाषण-श्रवण होय. या सर्वांत वाचनाचा उपाय सर्वोत्कृष्ट. कारण यांत स्वातंत्र्य व स्वस्थपणा असतो. शांतपणें अभ्यासहि करतां येतो.

स्वदेश ( महाराष्ट्र ) आणि स्वराष्ट्र ( भारत ) यांच्या हिताहिताविषयीं तळमळ वाटणाऱ्या तरुण मंडळींनीं आपल्या मनांतील ऊर्मि केवळ वाचेंत ठेवूं नयेत वा वाऱ्यावर सोडूं नयेत. आपल्या शक्तिबुद्धीनें लोकसेवेचा कांहीं कार्यक्रम आंखावा व कणाकणानें कांहीं प्रत्यक्ष काम करूं लागावें. आपल्या राष्ट्राचा कारभार लोकशाहीच्या तत्त्वावर चालतो. पण लोकशाही म्हणजे काय ? तींत सर्व प्रजेनें कसें वागावयाचें ? आणि ती पाळण्यास नागरिकानें काय केलें पाहिजे याचें सामान्य ज्ञानहि हिन्दी नागरिकांत नाहीं. ती जागृति फार मोठ्या प्रमाणावर व्हावयाला पाहिजे. जवानांनीं या वैगुण्याचा व त्यावरील उपायांचा विचार करून स्वतःला काय करतां येईल तें पाहिलें पाहिजे.

अनुक्रम...३२०६३... दि. १९.१२...
क्रमांक ...१३७५........ नों: दि: ...२१-१२-६५

इंग्लंडची राजशासनपद्धति या दृष्टीनें अभ्यासिली पाहिजे. चिमुकल्या पण महान् साम्राज्य गाजविलेल्या राष्ट्रानें राजा कायम ठेविला, पण एकंदर राज्यकारभार लोकशाही पद्धतीवर चालविला ! इंग्रज लोकांची ही पुराणप्रियता व आधुनिकता निःसंशय कौतुकास्पद आहे. त्याचप्रमाणें अमेरिका संयुक्त संस्थानांनीं गठित आहे. अनेक लहान-मोठे देशविभाग या अमेरिकेंत मोडतात. असा हा विस्तृत देश अत्यंत सघन, प्रचंड कारखाने असलेला व कल्पक संशोधकांनीं भूषित केलेला खंडप्राय देश आहे. यांत भांडवलशाहीचें प्राधान्य आहे. पण एकूण संस्थानांचा राज्यकारभार चालतो लोकशाही पद्धतीनें. आम्ही भारतीयांनीं आपली राज्यघटना ठरवितांना अमेरिकन शासनपद्धतीचें मोठ्या प्रमाणावर अनुकरण केलें आहे.

या नंतर अभ्यास करण्यासारखें युरोपांतील दोन देश म्हणजे हॉलंड व स्विट्झरलंड हीं चिमुकली राष्ट्रें होत. आमच्या जवान मंडळींनीं या दोन देशांतील शासनपद्धति आणि तेथील नागरिकांचें राष्ट्रीय जीवन पुनः पुन्हा विचारांत घेण्यासारखें आहे.

यानंतर आपल्या राष्ट्राच्या सद्यःस्थितीचा व भवितव्याचा विचार वर सांगितलेल्या राष्ट्रांचा आदर्श पुढें ठेवून तौलनिक दृष्टीनें व निःपक्षपातानें करावा.

भारत महाराष्ट्राचें मायपोट आहे आणि त्यांच्या उत्कर्षापकर्षांशीं आम्ही महाराष्ट्रीय पूर्ण निगडित आहों. म्हणून महाराष्ट्राबरोबर भारताचें हिताहितहि आत्मीयतेनें पाहिलें पाहिजे.

स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें बाह्य जगताशीं आम्हा भारतीयांचा सारखा संबंध येत आहे व आमचें संघटन इतर सर्व राष्ट्राशीं सारखें वाढत आहे. अशा स्थितींत भारताची प्रतिष्ठा व लौकिक जगांत वाढणार किंवा कमी होणार; याचें प्रमाण आमच्या आचारविचारानें ठरणार आहे. तेव्हां परदेशाशीं व्यापार करणारे व्यापारी किंवा विदेश पाहण्यास जाणारे भारतीय प्रवासी किंवा विद्याभ्यासास जाणारे तरुण विद्यार्थी या सर्वांनीं सभ्य व सचोटीच्या वर्तनानें मिळालेल्या संधीचा चांगला उपयोग करून घेतला पाहिजे आणि भारतीय माणूस म्हणजे श्रेष्ठ प्रतीचा नागरिक असें प्रमाणपत्र युरोप-अमेरिके-

तील सर्व देशांकडून मिळविलें पाहिजे. तरुण पिढीवर तर ही जबाबदारी फार मोठी आहे.

आपल्या भारताच्या सर्वांगीण विकासाचा विचार करतांना महाराष्ट्रा-विषयीं जें सांगितलें तेंच मोठ्या प्रमाणांत विचारांत व्यावयाचें. यांतच भर घालावयाची म्हणजे राष्ट्राच्या संरक्षणाच्या व बाह्य उपाधी टाळण्याची दक्षता घेणें होय. कोणीहि सामान्य धटिंगणानें वा सत्तामदानें बेफाम झालेल्या झोटिंगानें आमच्या राष्ट्राचा, धर्माचा, जागतिक प्रतिष्ठेचा, अपमान करतां कामा नये; इतकें आम्ही व्यक्तिशः व राष्ट्रशः बलवान् स्वाभिमान राजनीति-निपुण असलें पाहिजे.

आणि या महान् कार्याचा भारहि आमच्या जवानांच्या कर्तृत्वावर आहे, हें त्यांनीं विसरूं नये.

तरुण मित्रांनो, आपल्या जीवनाचा व जीवन धर्माचा विचार करतांना राष्ट्रोत्कर्षाचे सर्व विषय स्थूलमानाने विचारांत घ्या आणि किती व्यापकतेनें ते सर्व जगताशीं गुंतले आहेत हें अभ्यासपूर्वक पहा. त्यांचें निरीक्षण करा. जणूं महान् वटवृक्षच. राष्ट्राची सर्व प्रजा त्याच्या कक्षेंत सामावलेली आहे. व्यक्तीव्यक्तीच्या कल्याणाचा धागा त्यांत गुंतलेला आहे. तरुणांच्या बुद्धीला व विचारशक्तीला केवढें आह्वान आहे.

राष्ट्राचें आरोग्य निर्दोष व हृष्टपुष्ट राहील तर ? शेती, व्यापार, संरक्षण यांचें संवर्धन व विकसन आपोआपच होईल, नाहीं का ? शिक्षण सर्वतो-मुखीं व अद्यावत् झालें तर ? प्रजेच्या ठायीं श्रेष्ठ प्रतीचें नागरिकत्व सहज बाणेल, नाहीं का ? व्यापार व उद्योगधंदे वाढले तर; प्रजेला अन्न व स्वास्थ्य भरपूर मिळूं लागेल, नाहीं का ? आणि या सर्व विकासामुळें प्रजा पराक्रमी व संरक्षणक्षम होईल. व्यक्तीचे संसार सुखाचे होतील. सर्वत्र शान्ति-पुष्टी-तुष्टि दिसूं लागेल, नाहीं का ?

किती सांगावें ?—सर्वांनींच विचार करावयाचा आहे व स्वतःच्या कर्तव्याचा भार आनंदानें उचलावयाचा आहे.

हा सर्व आढावा लक्षांत घेतल्यावर सुबुद्ध व विचारी मनाला हेंच पटेल कीं, परस्परांस पूरक होणारीं लहान-मोठीं कार्यें सह्याद्रीप्रमाणें पुढें मागें

ताठ उभीं आहेत व सर्वत्र पसरलीं आहेत. तीं घरांत आहेत. घराबाहेर आहेत. समाजांत आहेत. राष्ट्रांत आहेत. प्रत्येक व्यक्तीनें जागृत झालें पाहिजे आणि आपल्या बांधवांना जागें केलें पाहिजे. तरुण-तरुणींनीं तर फारच मनावर घेतलें पाहिजे. आतां आपण स्वतंत्र राष्ट्र म्हणून आहों आपली सर्वांची शक्ति, बुद्धि व संहति एक होईल तर ! किती अल्पकालांत आम्ही वैभवाला चढूं ! एका दोघाकरितां नव्हे. विशेष लोकांकरितां नव्हे. एखाद्या खास जमातीकरितां नव्हे. निढळाचा घाम गाळील त्या प्रत्येका-करितां !

आता यापुढें भारताचें राज्य; भारतियांकरितां, भारतियांच्या स्वामित्वाचें आणि भारतियांकडून चालविलें जाणारें असें आहे.

तरुण मित्रांनो, तुम्हांला कार्य करण्याला व वैभव भोगण्याला ही केवढी मोठी संधि आहे.

हें ध्यानांत असूं दे. सध्यांचें महाराष्ट्र वा भारत सरकार हें प्रजेवर केवळ हुकमत गाजविणारें यंत्र नाहीं. तें तुमचे आमचे मुनीम आहे. आपण प्रजेनें त्यांची निवड व नेमणूक केलेली आहे. प्रजा हेंच खरें सरकार ! म्हणून कांहीं विपरीत घडलें वा उणें पडलें कीं, तिऱ्हाईतपणानें सरकारानें अमुक केलें पाहिजे नी तमकें न केलें पाहिजे, असें म्हणण्यांत स्वरस्य नाहीं. सरकार म्हणजे आपणच ! लोकशाहीचें हें स्वरूप आम्ही ओळखण्यास हवें. मालकाच्या इच्छेवांचून वा अनुज्ञेवांचून मुनीम कांहीं करूं शकत नाहीं. हा विश्वास तुम्ही-आम्ही म्हणजे सर्व नागरिकांनीं बाळगला पाहिजे आणि तशी धमकहि दाखविली पाहिजे. लोकशाहीचें भरणपोषण व संचलन तुम्ही आम्ही करावयाचें आहे. प्रत्येक नागरिकावर हें उत्तरदायित्व आहे.

मुनीम हा नेहमीं सांगकाम्या असतो. मालक सावध व कार्यदक्ष असेल तरच प्रामाणिक राहील !

तरुण मित्रांनो, लोकशाहीचें स्वरूप समजून घेतलेंत. ठीक. आतां तुमच्या कानीं पडावी व तुम्ही तिला साद द्यावी. अशी पुढील दवंडी ऐका :

घरटीं मातापित्यांची व वडील माणसांची इच्छा आम्हांला जवान पुत्र हवे. जे कर्तव्यनिष्ठ, कर्तृत्ववान् व कुलदीपक असतील.

कार्यकर्त्या पुढाऱ्यांची हांक : तरुण मुलांनो व मुलींनो, समाज-कार्यांची व लोकसेवेची धुरा वाहणारे जवान स्वयंसेवक आम्हांला हवेत. कार्ये अनेक आहेत. होतकरू, उत्साही, स्वकार्यतत्पर व देशहितरक्षक असे जवान आम्हांला हवेत. अहमहमिकेनें पुढें या. शेंकड्यांनीं—हजारांनीं !

संरक्षण व उपाधिनिवारण खातें. भूदल, नाविक दल, विमानदल, यांत्रिक दल. यांतील सेनानी म्हणताहेत : आम्हांला तगडे सैनिक हवेत. जे निधड्या छातीनें कोठल्याहि धाडसाच्या कार्यांत आशा मिळतांच उड्या घेतील. या जवानांनो, लाखांनीं गर्दी करा नि राष्ट्राचा रक्षणभार उचला.

—सर्वत्र आणि सर्वांकडून एकच मागणी :

जवान हवेत !
जवान हवेत !
जे आपल्या मातेची कूस धन्य करतील !
जे आपल्या पित्याचें नांव गाजवितील !
जे राष्ट्राचें नांव त्रिखंडांत दुमदुमत ठेवतील !
जवान हवेत !
जवान हवेत ! !

## थोडा अभ्यास

महाराष्ट्रराज्य व भारत सरकार या उभयतांनीं आपल्या देशाची समग्र माहिती देणारीं पुस्तकें काढलीं आहेत. तीं अवलोका.

गतकालांतील सर्व जातींचे, पंथांचे, भारतांतील विविध भागाचे पुढारी आणि त्यांनीं पुनरुत्थानार्थ केलेले अफाट प्रयत्न यांचें सिंहावलोकन करा. महर्षी रानडे, ना. गोखले, लो. टिळक, आगरकर, म. कर्वे यांची समाज-कार्याविषयींची तळमळ व स्वार्थत्याग लक्षांत घ्या व त्यांचा आशीर्वाद घ्या.

महात्मा गांधीजींची संक्रमणशील कार्यप्रणाली अभ्यासा.

राष्ट्रसेवादल व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांनीं चालविलेलीं कार्यें निःपक्षपातानें पाहा.

× × ×

*भला रे भला बोलती तें करावें ।*
*बहूतां जनाचें मुखीं येश घ्यावें ॥*

× × ×

*उद्यमेन हि सिद्ध्यन्ति कार्याणि न मनोरथैः ।*
*नहि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः ॥*

× × ×

*उद्यमः साहसं धैर्यं बुद्धिः शक्ति पराक्रमः ।*
*षडेते यत्र वर्तन्ते तत्र देवः सहायकृत् ॥*

★ ★ ★

*विचारसूत्र आठवें*

# जवानांचें भाग्य व भांडवल

प्रत्येक व्यक्तीचें मोठें भाग्य म्हणजे तारुण्यकाल होय. आणि यांतच भर म्हणजे त्या तारुण्याचा योग्य उपयोग करण्यासारखीं कार्यें पुष्कळ व तीं यथामति यथाशक्ति आचरून आपलें चरित्र व चारित्र्य सार्थकीं लावण्यास वावहि पुष्कळ !

जवानांनीं या भाग्याचें स्मरण ठेवून साक्षेपी व्हावें आणि वर्तावें. 'सांडावें भय पोटिंचें !' कारण, हें भाग्य राबवून घेण्यास प्रत्येक जवानाला इष्ट व आवश्यक असें भांडवलहि पुरविण्यांत आलेलें आहे.

हें पहा तें भांडवल. मन, मनगट आणि मेंदू. शक्ति-बुद्धि व युक्ति ! आणि याच्या जोडीला – तगडें शरीर, पांच ज्ञानेंद्रियें व कर्मेन्द्रियें ! उणीव कसलीच नाहीं.

तरुण मित्रांनो, मागें आपण "स्वतःला ओळखा व हळूहळू शिकवा" असा पाठ घेतला. त्याचाच हा पुढचा विस्तार आहे.

समाज व जीवन याविषयीं सहज विचार केला तरी हें लक्षांत येतें कीं, जन्मतः अनाथ, पंगू, दुबळी व बुद्धिमंद एवढा अल्पसा वर्ग वगळतां वर सांगितलेलें भाग्य व भांडवल बहुतेक सर्वांना लाभलेलें आहे.

आतां नवलाची गोष्ट पहा. चांगलें विद्यार्जन करून जीवनाच्या आखाड्यांत उतरलेल्या जवानांचा हा केवढा मोठा समुदाय ! या मेळाव्यांत सुविचारी, साक्षेपी, महत्त्वाकांक्षी व देश-काल-परिस्थितीची जाणीव असलेले तरुण लोक कांहीं कमी आहेत का ?— पण असें असूनहि देशसेवा वा लोकसेवा करण्याची त्या मार्गाला लागून थोर लोकांनीं घडवीत आणिलेली परंपरा चालविण्याची धमक दाखविणारे तरुण विरळा कां आढळतात ?

त्यांचें भाग्य व भांडवल त्यांना जाणवत कसें नाहीं? गबाळ व सामान्य अशा लोकांच्या मालिकेंत ते कां जाऊन बसतात?

हा परिणाम त्या लोकांच्या बावचळलेल्या मनाचा खेळ होय. सगळें कांहीं कळत असतां स्वतःच्या मनाला वळवून कसें घ्यावें? याचा उलगडा त्यांना पडत नाहीं. ते उदास राहतात. त्यांचें मन चुकारतट्टू व चवचाल होत जातें.

यासंबंधीं नवें वा जुनें मानसशास्त्र असें सांगतें. आपल्या आचारा-विचाराचें व कर्माकर्माचें अधिष्ठान आहे मन. ज्ञानेंद्रियें निरनिराळ्या बऱ्या-वाईट ज्ञानाचा पुरवठा मेन्दूला करतात. पण मेंदू केवळ ज्ञान सांठविण्याचें कोठार आहे. आणि या कोठाराचें धनी आहे मन.

खरें म्हणजे मन ही माणसाला लाभलेली प्रचंड शक्ति आहे. ही शहाण-पणानें राबवून घेण्याचें माणसानें योजिलें पाहिजे. याचा अर्थच हा कीं, माणूस मनाचा धनी आहे. पण तो खबरदार असला पाहिजे. गबाळ वा बेसावध असेल तर मन माजोरी बनतें व माणसाच्या मानगुटीं बसतें.

असें सैल सुटलेलें मन मग भारीच स्वच्छंदी व अवखळ बनतें. पाण्या-प्रमाणें खालीं खालीं वाहात जाण्याची त्याची सहज प्रवृत्ति व त्यांत वाऱ्या-प्रमाणें सैरावैरा धावण्याचा गुण! कुठेंहि व कसेंहि नाचत सुटतें आणि विजेच्या गतीनें धक्के देत नाना उपद्व्याप करतें!

मोठी विचित्र आहे मनाची धारणा! उपयुक्त व आवश्यक उद्योग वा कार्य करण्याचें तें साफ नाकारतें. पण नको असलेली उठाठेव सतत करीत राहातें!

भरमसाट मनोराज्य करून भव्य व दिव्य राजवाडे उठवणें त्याचा सहज खेळ! पण कांहीं चांगलें कार्य करीत कांहीं उद्दिष्ट साध्य करावें म्हटलें तर तें माणसाला मुळींच साह्यभूत होत नाहीं.

त्याचप्रमाणें विचाराविचारांचीं वादळें तें पेलूं शकतें, पण साधासुधा विवेक त्याला सहन होत नाहीं.

मनाच्या या माकडचेष्टा किती म्हणून सांगाव्या! त्याचा हा धिंगाणा सर्वांच्या परिचयाचा आहे. म्हणून विशेष पाल्हाळ नको.

स्वतःचें सामर्थ्य अनाठायीं खर्च करून ते स्वतः हतबल होतें व माणसाला ( मालकालाच ) निराशेच्या खड्डयांत लोटून देतें !

ही विकृति मनाला कां जडतें !— विचार करण्यासारखा प्रश्न आहे. जाणत्या लोकांनीं याचें उत्तर असें शोधून काढलें आहे. त्यांचें म्हणणें असें– मुळांत मन वाईट नाहीं. पण तें परिस्थितिसापेक्ष आहे. पानी तेरा रंग कैसा ! जिसमें मिलावें वैसा ! असें मनाचें होत असलें पाहिजे. कोणीहि तरुण जीवनाच्या आखाड्यांत उतरून स्वतःचें व भोंवतालच्या इतरेजनांचें जीवन तोलून पाहूं लागतांच त्यांच्या मनांत कांहीं शंका येतात व त्यांना अनुसरून कांहीं प्रश्नहि उद्‌भवतात. अशा वेळीं खरें म्हणजे त्या शंकांना व प्रश्नांना फारसें महत्त्व नसतें. पण उठवळ मन त्यांचा बाऊ करतें. कारण, समोरचें कर्तव्य त्याला नको असतें. तें त्या शंकांचा वा प्रश्नांचा ध्यास घेतें. चुकार होण्याची मनाची किमया ती ! मनुष्याची बुद्धि हटकून गोंधळते. प्रश्नांतून प्रश्न व शंकांतून शंका अनेकरूपांत निर्माण होतात ! त्यांचें अरण्य माजतें ! या जंगलांत मनाचा मूळ मार्ग चुकतो. तें सैराट धांवूं लागतें ! त्याच्याभोंवतीं एक बिकट चक्रव्यूह रचलें जातें.

मनाची ही दिशाभूल कां होतें ? त्याच्या भोंवतीं जें रान माजतें, तें बहुशः चिन्ताजनक व उद्वेगाचें असतें. गतकालाचा कांहीं शोक त्यांत असतो व भविष्यकालासंबंधीं कांहीं भयानक चिंता उसळलेल्या असतात ! चालू घडीशीं वा जीवनाशीं त्यांचा संबंध फारसा नसतोच. किंवा असलाच तर दूरान्वयी असतो. तेव्हां जाणत्या व विवेकी लोकांचें सांगणें आहे. विजयोत्सुक तरुणांनीं थोडा नेट धरून संपर्कशून्य अशा या विचारांच्या मुळांत घाव घालावा ! कदाचित् मूळ एकदम सांपडणार नाहीं. कुछ पर्वाह नहीं ! समोर दिसतील त्या फांद्या व जाळ्या तोडून टाकाव्या !—मनाला किती तरी हलकें हलकें वाटेल.

गोंधळलेल्या व भ्रमांत पडलेल्या मनाला सांगून टाकावें. कालचा दिवस खलास झाला. अनुचित असें पुष्कळ घडलें असेल किंवा उचित गोष्ट करण्याचें राहून गेलें असेल. कांहीं हरकत नाहीं. झालें तें होऊन गेलें. तें परतणें शक्य नाहीं. मग त्यासंबंधीं शोक करण्यांत अर्थ काय ?—त्याच पद्धतीनें भविष्याचा विचार, उद्यांचा दिवस उगवेल तेव्हां पाहूं काय

करायचें तें !– मध्यें कांहीं तासांची रात्र आहे. कांहीं चांगला उपाय सुचण्याचा संभव आहे. पुरुषस्य भाग्यम् ! कदाचित् राज्यलाभहि होईल. कोणी सांगावें ?–पण त्याचें मनोराज्य आतां कशाला ? बरें, उलटपक्षीं मृत्यूचा संभव असेल ! पण त्याचें भय तरी आज कां ?

भूत-भविष्यासंबंधीं असा निकाल लावला व चालू घडी, चालू दिवस याचाच विचार केला आणि कर्तव्य जाणून घेतलें तर ? विवेकाचा पायाच तयार होतो. तरुण मित्रांनो, समंजस व धीराचीं माणसें आपल्या जीवनाकडे अशा दृष्टीनें पाहातात. तसा विचार करतात ! धावऱ्या-बावऱ्या मनाला लागलीच पराणी लागतें.

मग ही विवेकजाग्रत माणसें मनाला बजावतात : " पाण्याप्रमाणें तूं अधोगामी आहेस ! ठीक. पण आम्ही जाणतों; पाण्याला अडवून, वळवून उंचीवर चढवून त्याला राबवितां येतें. किंवा पाणचक्की निर्माण करून शक्ति काढतां येतें तसे आम्ही तुला नमवूं. तुझ्याकडून आम्हांला हवें तेंच काम करून घेऊं. तुझें चांचल्य वा अवखळपणा वाटेल तेवढा असो. आम्ही तो युक्तीनें आमच्या इच्छित कार्याकडे वळवूं. आम्ही तुला बेलगामी होऊं देणार नाहीं. आम्ही तुला जें सांगूं तें तुला केलें पाहिजे. जसें शिकावूं तसें तुला वागलें पाहिजे. "

तरुण मित्रांनो, वरील आत्मविश्वासपूर्ण अभिप्राय त्या लोकांनीं कोणत्या आधारें प्रगट केला ? – विचार करण्यासारखा प्रश्न आहे, नाहीं का ?– स्वतःच्या वयाचा कानोसा घेतल्यास असें दिसून येईल कीं, मन हें एक आंतील न दिसणारें इंद्रिय आहे. तें स्वभावतः चांगलें किंवा वाईट असें कांहींच नाहीं. त्याला ठेवावें तसें तें राहातें. वळवावें तसें वळतें. तें बऱ्या-वाईट संवयीचें गुलाम आहे. माणसानें सावधान असलें पाहिजे.

माणसाला माणूस का म्हणतात, त्याला मन आहे म्हणून. इतर प्राणि-सृष्टि व माणूस यांच्या प्रकृतींत हा फरक आहे. ज्ञानेन्द्रियें प्राणिमात्रांना आहेत. पण मन व त्याच्यामागें असलेली बुद्धि–तुलनात्मक अशी विवेक-शक्ति केवळ माणसाला लाभलेली आहे आणि या देणगीचा उपयोग सतत करून माणूस श्रेष्ठ पदाला पोंचला !

सृष्टीच्या रचनेंत एक उघडें रहस्य दडलेलें आहे. दोन विरुद्ध स्वभाव-धर्म एकाच ठिकाणीं नांदत असायचे. जें वाईट तें युक्तीनें उपयोगिलें कीं चांगलें. जें जहाल विष तेंच अमृत ! योजना शहाणपणाची हवी. सोमल प्राणघातक आहे. पण औषध म्हणून त्याचा उचित प्रमाणांत उपयोग केला कीं, झाला तो प्राणदाता. आपलें मन या तोडीचें आहे. तें विवेकाच्या पकडींत आणण्याची खटपट माणसानें सावधान राहून मोठ्या चातुर्यानें केली पाहिजे. मन संयमाकडे वळलें कीं, तें अमृतमय झालें. माणसानें फार मोठी बाजू जिंकली. त्याचें भाग्य जागें होण्यास इथून प्रारंभ होतो. त्याच्या जवळचें इतर भांडवलहि मग कमी आणतां येतें.

श्री साधू तुकारामबुवांनीं मनाचें हें वर्म ओळखून एक उपाय खालच्या दोन ओळींत स्पष्ट केला आहे :

*तुका म्हणे मना पाहिजे अंकुश ।*
*नित्य नवा दीस जागृतीचा ॥*

[ मन बलशाही हत्ती आहे. त्याच्या कडून कार्य करून घ्यायचें तर माहुताच्या हातांत अंकुश हवा. ]

आपला श्रीगणेश देव हा बुद्धिदाता, विघ्नहर्ता व सुखकर्ता असल्याचें वर्णन आहे. पण त्याच्या एका हातांत अंकुश असल्याचें दाखविलें आहे. या प्रतीकांत बुद्धिमानाच्या हातांत अंकुश असला पाहिजे, असें रहस्य सांगून ठेविलें आहे का ?

विचार करण्यासारखा प्रश्न आहे, नाहीं का ?

खरेंच आहे. बुद्धिमान् मनुष्य संयमी हवाच हवा. त्याशिवाय त्याच्या-कडून मानास्पद, उन्नतिकारक व त्याला व जगताला हितप्रद असें कार्य होणेंच अशक्य ! म्हणून त्याच्या हातांत मनाला ताब्यांत ठेवण्याकरितां अंकुश हवा. विवेकजागृतीचा उपाय एवढा एकच. गणनायकत्व त्यावांचून यावयाचें नाहीं. आणि आलेंच तर तें पेलतां यावयाचें नाहीं.

जीवनधर्माचा विचार करून त्याप्रमाणें आचार करूं पाहणाऱ्या जवानांनीं मनाला अंकुश हवा या महत्त्वाच्या गोष्टीकडे आधीं लक्ष पुरवावें. वयाची विशी-बाविशी असतांना आणि पंचविशी उलटण्याच्या आंतच

त्यांनीं ही योजना कार्यवाहींत आणण्याचा खटाटोप केला पाहिजे. पुढच्या आयुष्याला वळण लावण्याची व जीवनविकासाला प्रारंभ करण्याची सुवर्णसंधि हीच होय. त्यांचें भाग्य व भांडवल यावांचून व्यर्थ ठरेल.

या वेळीं अनेकांच्या मनांत शंका येईल. ओढाळ व चवचाल मनाला असा अंकुश लावणें शक्य व साधण्यासारखें आहे का? शंका अगदीं बरोबर. मन भारी चंचल. त्याचा कान पकडून त्याला संयमाचा धडा शिकविणें व तो त्याच्याकडून गिरवून घेणें फार कठिण आहे ही गोष्ट नाकारण्यांत अर्थ नाहीं. पण तेवढेंच निमित्त पुढें करून दुर्लक्ष केलें तर मनोराज्यांत केलेला कोणताहि पुरुषार्थ सिद्धीला जाणार नाहीं. आणि मग तीच गोष्ट मनाला म्हणजे स्वतःला खाऊं लागेल. म्हणून प्रत्येकानें जागरूक असलें पाहिजे व मनाचा कान पकडण्याच्या खटपटीला लागलें पाहिजे. ही खटपट – ही जागरूकता – वायां जात नाहीं.

तरुण मित्रांनो, विद्यार्जन करीत असतांचा अनुभव ध्यानीं घ्या. परीक्षेंत यश मिळवावयाचें तर अभ्यासाची हेळसांड होतां कामा नये. याला उपाय मनःसंयमावांचून कोणता आहे?

हे दोन विद्यार्थी पहा. एक तीव्र बुद्धीचा आहे. दुसरा त्याच्या मानानें थोडा खालच्या पायरीवर आहे, पण यांपैकीं मनाला अंकुश लावण्यास जो समर्थ असेल त्याच्या यशाची निश्चिती हुकमी असते!

अभ्यासाकरितां पहांटे चारला उठलेंच पाहिजे याची जाणीव दोघांना. दोघांनीं पांच मिनिटें आधींच उठायचें ठरवून टाकलें. घड्याळाला तसा गजरहि लावून ठेविला.

पुढें रात्र संपते. पहांट येते. दोघांची झोप छान झालेली असते. यामुळें घड्याळ ठणठणूं लागतांच दोघांना जाग येते. अशा स्थितींत त्या दोघा विद्यार्थ्यांच्या प्रवृत्तींमध्यें फरक कुठें पडतो? चटकन् उठायचें कीं, पांच मिनिटें गुदमळत पडायचें? या विचारसरणींत!

ज्याला मनाला अंकुश लावण्याचें महत्त्व कळलें आहे तो घड्याळाचा गजर होण्याची वाट पाहात बसणार नाहीं. चारच्या सुमारास त्याला अपसुख जाग येईल. तो लगोलग उठेल. दिवा लावेल. गजर बंद करील व

मुखप्रक्षालन करून येऊन अभ्यासाला बसेल ! असा हा विद्यार्थी बुद्धीनें थोडा मंद असेना, तो अभ्यासांत पुढें राहील यांत शंकाच नाहीं.

याच वेळीं बुद्धिमान् परंतु निष्काळजी विद्यार्थी स्वतःशीं काय तर्क रचील ?— " उठूं पांच-दहा मिनिटांनीं. अभ्यास आहे कितीसा ? आपले सारे विषय तसे तयार आहेतच. अर्धा ताससुद्धा बस्स आहे आपल्याला ! " असें स्वतःचें कौतुक करीत व यशाची खात्री बाळगीत तो अंगावरचें पांघरूण वर ओढील. लोळत पडेल. घड्याळ गर्जू लागलें, तें बंद करण्याचेंहि त्याला साधणार नाहीं ! पहांटेची गंमतीची झोप ! तो मर्द गडी पुन्हा जागा होईल, त्या वेळीं आठ वाजलेले !– मग त्याचा तो पश्चात्ताप, तो आंबट चेहरा आणि ती घाई !– काय वर्णन करायचें ?

पुढच्या काळांत – परीक्षा देऊन आल्यानंतर दोघेहि उत्तीर्ण झाले असतील. पण बुद्धिमान् केवळ पुढें सरकला व त्याच्यापेक्षां बुद्धीनें कमी तो चांगला झळकला !

हा विचित्र अनुभव जवळजवळ सर्वत्र आढळतो, नाहीं का ?– म्हणून पुढच्या आयुष्यांतहि त्या दोघां विद्यार्थ्यांचें जीवन मागें पुढें होतें ! बुद्धिमान् मानतों – जगाला सांगतो : दैवाचा खेळ आहे हा !

पांच मिनिटाचें हें आवश्यक मूल्य न ओळखणारा हा विद्यार्थी मुद्दाम निवडून घेतलेला नव्हे. तर अशांचा भरणा सर्वत्र आढळतो आणि अशा झुंडींतून भारताचे पुढचे नागरिक तयार होतात.

जीवनाच्या आखाड्यांत उतरलेल्या जवानांनीं ही खोड लक्षांत घ्यावी आणि ती स्वतःला चिकटून न राहील याला जपावें. स्वतःच्या भाग्याचा व भांडवलाचा विचार करितांना त्याची दक्षताहि घ्यावी.

वर दिलेल्या तुकारामबुवांच्या उक्तीची आठवण ठेवून स्वतःच्या आयुष्य-क्रमाकडे पाहिल्यास नित्य नवा दीस जागृतीचा असतो, असा प्रत्यय त्यांना येईल.

प्रत्यहीं पुढें आलेला ताजा दिवस काय सांगतो ?—" या पहा सुवर्ण-संधीच्या अपूर्व लाटा ! किती अनुकूल आहेत. चला, शिडें उभारा. वल्हीं हातांत घ्या. इतरांनीं आपलीं जहाजें हाकारलीं ! घ्या या शर्यतींत भाग ! पांच मिनिटें सवड, नाहीं ! एक मिनिटाची नाहीं !–संधीची लाट गेली पुढें !

अनुक्रम 32043 वि: 1.1.9.. क्रमांक 9304 नों. दि.

तरुण मित्रांनो, तुम्ही भारी तत्पर असलें पाहिजे, असाच याचा अर्थ आहे, नाहीं का ?

या वेळीं पुन्हां एकदां आपल्या भाग्याचा विचार करा व भांडवलाचें मूल्य अजमावा.

जवानी = केवढें भाग्य.

मन – मेंदू – मनगट. पांच कर्मेन्द्रियें न पांच ज्ञानेन्द्रियें !—केवढी अलोट संपत्ति !

मनाचें स्वरूप जाणतांना आपण हें पाहिलेलें आहे कीं, सांसारिक सुखोपभोगाविषयी तें जितकें हपापलेलें आहे, तितकेंच तें सामाजिक प्रतिष्ठा, लोकांत मानमान्यता व त्याला शोभेसें पुढारीपण याला हपापलेलें आहे, नाहीं का ?— होय. मनाची ही भूकहि अनिवार्य आहे ! माणसांतील ती माणुसकी आहे. तिला डावलणें कठिण आहे. धोक्याचेंहि आहे.

प्रत्येक बुद्धिवान् जवानाने याचा विचार करावा. भांडवल खेळतें ठेवावें. कार्यनिष्ठेचें मूल्य तयार ठेवावें. आवांका पाहून व्यापार करावा. खोट आली, बिचकूं नये. धैर्यानें पुढें सरकावें. हा क्रम कांहीं दिवसांकरितां नाहीं कांहीं वर्षांकरितां नाहीं. जीवनभर व शक्तीबुद्धि चालू असेंपर्यंत चालवावयाचा आहे. आणि त्यांत आपलें कुल, समाज, देश व राष्ट्र यांचाहि संबंध येणार आहे. म्हणून धिमेपणानें गाडा हाकला पाहिजे.

अर्थात् हा कार्यभाग एकट्यावरच पडतो असें नाहीं. इतरांचें सहकार्य लाभतें व सज्जनाची सहानुभूति लाभतें. तेव्हां जवानांनीं गोंधळांत पडूं नये व इतर जाणत्या लोकांकडून मार्गदर्शन इच्छावें.

आपल्या भोंवतालच्या जीवनांत अनेक प्रकारें यशस्वी झालेले लोक असतात. त्यांच्याशीं स्नेह जोडून अडीअडचणी समजून घ्याव्या. त्याचप्रमाणें समाजकल्याणार्थ अहर्निश झटणारे लोक असतात त्यांचा आयुष्यक्रम समजून घ्यावा. शिवाय वाचनांत थोर थोर लोकांचीं चरित्रें असावीं. आपल्याला घेण्यासारखें साहित्य किती तरी सांपडेल.

आतां सहज आकलन होण्यासारखे, थोडी दक्षता घेतल्यास ( कष्टानें ) आचरणांत आणण्यासारखे आणि संवय झाल्यावर अत्यंत उपयुक्त होणारे

कांहीं नियम दिले आहेत. सभ्य व कार्यव्यापृत माणसांचे ते अनुभवात्मक बोल आहेत. विचारांत घ्या. आचारांत आणा आणि ते किती अमोघ आहेत तें स्वतःच ठरवा.

## १. कालाचें महत्त्व व मूल्य ओळखा.

सद्यःकाल घड्याळावर नियंत्रित झाला आहे व मिनिटामिनिटाकडे लक्ष देऊन आम्ही दिनक्रम चालविला पाहिजे असें म्हटल्यास त्यांत काडीची अतिशयोक्ति नाहीं. खेड्यापाड्यांतूनहि घड्याळांचा प्रसार झाला असून नगरांतून तर भिंतीवर घड्याळ, टेबलावर घड्याळ व बहुशः सर्वांच्या मनगटावर घड्याळ असा सुकाळ झाला आहे; पण यामुळें आम्हा भारत-वासियांना कालाचें महत्त्व कळतें असें म्हणणें वा मानणें ही गोष्ट अगदीं हास्यास्पद होईल !

काळ-वेळ व नियमितपणा यांच्याविषयीं अत्यंत बेपर्वा व त्यांची खंत न वाटणारा समाज बहुसंख्येनें फक्त भारतांतच आढळेल, असा आरोप कोणी केल्यास आम्हांला तो मुकाट मानावा लागेल.

" रिकामा जाऊं ना दी क्षण । तेंची भाग्याचें लक्षण " असा उपदेश श्री समर्थांनीं सांगून ठेविला ! पण या बाबतींत आम्ही इतकें गलथन आहों कीं, तसला नमुना इतरत्र सांपडणें कठिण ! सध्याच्या आमच्या अपेशी जीवनाचें, एकंदर करंटेपणाचें आणि सार्वत्रिक ऱ्हासाचें कारण एकच आहे. व्यर्थ चाललेला कालक्षेप ! फार फार लज्जेची व दुःखाची गोष्ट आहे ही !

आम्हांला वरपांगी कालाचें महत्त्व जाणावें लागतें. उदरनिर्वाहार्थ करावी लागणारी चाकरी आणि रेल्वेशीं संबंध. या गोष्टी आम्ही निरुपायानें पाळतों. बाकी घरांत काय, समाजांत काय, सभा-समारंभांत काय आम्ही वेळेची कदर मुळींच करीत नाहीं. हसण्यावारी साऱ्या गोष्टी न्यावयाच्या ! मनगटावर घड्याळाचा अलंकार चोवीस तास असतां !

तरुण मित्रांनो या स्वदोषाचा विचार तुम्ही अत्यंत काळजीनें केला पाहिजे. या एका दोषामुळें आमच्यामध्यें असलेल्या चांगल्या गुणांचें अगदीं मातेरें झालेलें आहे, ही गोष्ट मान्य केली पाहिजे.

मागें एकदां ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनीं सामाजिक गुणदोषांविषयीं लिहितांना असें निदान केलें आहे कीं, " आम्ही हिन्दु लोक भांडखोर, मत्सरी, परस्परद्वेष्टे, हलकट मनोवृत्तीचे आणि दरिद्री आहों, याचें कारण आमचा फावला वेळ आम्ही पूर्ण आळसांत घालवितों व सतत उद्योग करण्याची संवय आम्ही पार विसरून गेलों आहों ! "

एका प्रकाण्डपंडिताचा व अविश्रान्त श्रम करणाऱ्या विद्वानाचा हा अभिप्राय आहे. समाजाच्या तोंडावर तो सहज फेकलेला नाहीं. तें एक ठळठळीत सत्य आहे.

म्हणून जवान लोकांना आवर्जून सांगावयाचें कीं, कालाचें महत्त्व ओळखा व मूल्यहि ध्यानांत घ्या.

' Time is money. ' हें प्रसिद्ध वाक्य विद्यार्थिदशेंत तुमच्या वाचनांत आलें असेल किंवा तुमच्या कानावरून गेलें असेल. कुठें तरी वा केव्हां तरी तुम्ही तें बोलूनहि गेलां असाल. पण यांत खरी गोष्ट अशी आहे कीं, कालाचें मूल्य पैशांत करतांच येणार नाहीं, पैसा – एक रुपाया असो, हजार रुपये असोत–हरवले, खर्च झाले वा चोरीला गेले तरी ते परत मिळविणें माणसाच्या पुष्कळ आटोक्यांत आहे. निदान शंभराच्या ठिकाणीं एक या प्रमाणांत. पण भूतकालांत पांच मिनिटेंच नव्हे पाच सेकंद परत मिळणें अशक्य आहे. मनुष्याच्या आयुष्यांतील कोणतेंहि वय व अवस्था एकदां गेली की गेली ! मग तुम्ही कितीहि आक्रोश केलांत वा अनुताप दर्शविलांत तरी त्याचा काडीमात्र उपयोग नाहीं !–मागें ' पांच मिनिटें ' हा खुणेचा शब्द सांगितला ! त्याला दुसरा अर्थ काय आहे ?

यावरून जवानींतील प्रत्येक क्षण किती मोलाचा— पुन्हां न मिळणारा आहे, हें तुमचें तुम्ही ठरवा.

वाचनाला वेळ नाहीं. विचार करायला वेळ नाहीं. वेळापत्रकाप्रमाणें वागायला वेळ नाहीं. लहान मोटीं स्वहिताचीं व परहिताचीं कामें करण्यास वेळ नाहीं अशी तक्रार ज्या वेळीं तुम्हीं करतां त्या वेळीं तरुण मित्रांनो, तुमच्या कक्षेंतून मिनिटें, तास, दिवस, महिने झराझर गळून जात असतात ! आणि मागून तुम्हांला समजून येतें कीं, आपण केवढें तरी अध्युय व्यर्थ घालविलें !

म्हणून पुनः पुन्हां सांगायचें, निर्वाणीचें सांगायचें, कीं काळाचें महत्त्व ओळखा. आपण होऊन आपलें भाग्य लाथाडूं नका.

## २. प्रत्येक काम टापटिपीनें व व्यवस्थित करा.

ज्याला कालासंबंधींचें महत्त्व कळलेलें असतें व जो क्षणाक्षणाला जपतो, त्याला हा दुसरा नियम सांगण्याचें कारण पडत नाहीं. पण कालाच्या उधळपट्टीमुळें आम्ही या नियमालाहि पूर्ण पारखें आहों. स्वतःच्या संसारांत व हरघडीच्या जीवनांत आम्ही अत्यंत गबाळे, अनियमित व अव्यवस्थित आहों. मिळकतीचा जमाखर्च ठेवणें, आवश्यक पत्रव्यवहार वेळच्या वेळीं करणें, कौटुंबिक व सामाजिक कार्यें उरकणें वा व्यवहार सांभाळणें या सर्व प्रकारांत आम्ही पूर्ण बेबंद असतों. वेळेप्रमाणें आम्ही आपल्या शब्दाची किंमतहि ओळखीत नाहीं. कार्यें करण्यांत आम्ही उगीच घाई व भरपूर दिरंगाई करतों ! परिस्थिति याचें उट्टें आमच्यावर काढते ! आम्ही त्रासतों, रागावतों, चिडतों ! पण व्यवस्थितपणाचा विचार करीत नाहीं. टापटिपीनें वागण्याचें ठरवीत नाहीं. यांत आम्ही आमच्या सहजप्राप्त भांडवलाची केवढी अवहेलना वा उधळपट्टी करतों, हें काय सांगावयास पाहिजे ?

आमच्या तरुण मंडळींत पोशाखाची स्वच्छता व तिला अनुसरून छानछोकी भरपूर आढळते. पण याबरोबरच आचाराविचारांत व काम करण्याच्या पद्धतीमध्यें जी टापटीप, नीटनेटकेपणा व आस्था हवी ती मुळींच दिसत नाहीं. तरुण मंडळींनीं या आरोपाचा राग न मानतां स्वतःतील या दोषाचा विचार केला पाहिजे. ध्यान ठेवून सुधारणा करण्यास झटलें पाहिजे. त्यांच्या हिताहिताचा संबंध यांत दांडगा आहे.

## ३. कोणत्याहि अवडंबराला जपा.

कोणतेंहि कार्य स्वीकारतांना व स्वीकारल्यानंतर तें करतांना त्यांत अवडंबर न दिसेल याच्याविषयीं दक्ष असा. आधीं तें आपण सुबक वेळेवर, निरपेक्ष व जातीनें करूं शकूंना ? याचा पोक्त विचार करा. अज्ञान, अहंकार व दाम्भिकता ह्या तीन गोष्टींमध्यें माणूस आधीं स्वतःला फसवितो व त्यांतून निर्माण होणारी स्वतःची फटफजिती लपविण्याकरितां तो दुसऱ्याला

फसवूं बघतो ! ही फार मोठी चारित्र्यहीनता होय. तरुणांनीं या अपघाताला जपलें पाहिजे.

अहंकार मुळांत खोटा. अज्ञान लपविणें, त्याहून खोटें आणि दाम्भिकपणा करून वेळ मारून नेणें त्याहून खोटें. म्हणून सार्वजनिक काम करतांना काय किंवा स्वतःचें काम साधण्याकरितां काय, तरुण मंडळींनीं चारित्र्याला जपावें. कसलीहि लपवाछपवी करूं नये व आपला दोष वा घडलेली आगळिक दुसऱ्यावर ढकलून देण्याची घाई वा कारवाई करूं नये. प्रांजल व प्रामाणिक असावेंच असावें.

## ४. स्वतःचे विकार व भावना यांच्यावर लक्ष ठेवा.

स्वतःच्या आचाराविचारांत व कार्य करण्याच्या पद्धतींत कसलीहि उत्तेजकता दिसतां कामा नये. खोटा उत्साह, अकारण राग, सामान्य स्वार्थ, तोंडपुजेपणा, सहकाऱ्याविषयींच अनुदारता वा मत्सर व सूड घेण्याची वृत्ति यांचा संपर्क स्वतःच्या मनाला न होईल याला जपलें पाहिजे. दुसरा तसा वागतो मग मीच माघार कां घ्यावी ? हा विचार आत्मघातकी. यांत स्वतःचें भांडवल बुडतें व भाग्यहि लाथाडलें जातें. प्रारंभापासूनच स्वतःवर नियंत्रण घालण्याविषयीं सावध असावें. हें साधलें नाहीं तर शेवटीं स्वतःचा पराभव होतो, हें निश्चित समजावें.

## ५. मोकळें अंतःकरण, सुहास्य वदन आणि मधुर वाणी.

या तीन गोष्टी मोठ्या मोलाच्या, बिनखर्चाच्या व बिनत्रासाच्या आहेत. आणि त्या परस्परावर फार अवलंबून आहेत. मोकळें अंतःकरण असलें कीं, त्याचें प्रतिबिंब हास्यरूपानें मुद्रेवर उमटतेंच आणि या दोहींमुळें बोलण्यावागण्यांत आपोआपच गोडपणा येतो.

असे हे पांच नियम जीवनधर्म नीट आचरण्यास फार उपयुक्त व उपकारक आहेत. मात्र, स्वतःचा कडक पहारा स्वतःवर हवा. तरुण मित्रांनो, पुन्हां एकवार हे नियम मागें सरकत पहा. म्हणजे तुमच्या हें ध्यानीं येईल कीं, पांचवा चौथ्यावर, चौथा तिसऱ्यावर, तिसरा, दुसऱ्यावर आणि दुसरा पहिल्यावर अवलंबून आहे. या पांचांची सांगड आहे. आणि आपलें भाग्य व भांडवल यांचा तरणोपाय या सांगडीवर फार अवलंबून आहे.

## थोडा अभ्यास

हें सूत्र अनेकदां वाचा. त्याच्यावर सारखा विचार करा आणि त्यांचा सतत ध्यास घेऊन आचार विचार तसे ठेवा !

× × ×

*श्रद्धेनें मेळवी ज्ञान संयमी नित्य–सावध ।*
*ज्ञानानें शीघ्र तो पावे शांति शेवटची मग ॥*

× × ×

*उद्धरावा स्वयें आत्मा खचूं देऊं नये कधीं ।*
*आत्माचि आपुला बन्धु आत्माचि रिपु आपुला ॥*

—विनोबाकृत ‘ गीताई ’

* * *

*विचारसूत्र नववें*

# लौकिक व्यवहारांत जवानांचा आचारधर्म

तरुण मित्रांनो,

भिंगरीचा किंवा भाकऱ्यांचा खेळ या नावांचा एक गमतीदार खेळ खेड्यांत प्रसिद्ध आहे. तुमच्यापैकीं कांहींना हा माहीत असेल किंवा नसेलहि या खेळाचा प्रकार असा आहे :

नदीच्या वा तलावाच्या कांठीं हा खेळ खेळतात. तळहातांत मावेल व सहज भिरकावितां येईल असे चकतीवजा दगड जमा करायचे आणि ते जलपृष्ठाची पातळी साधून असे फेकायचे कीं, जेणेंकरून ते टप्पे घेत व प्रत्येक टप्प्याला वर्तुळें निर्माण करीत दूरपर्यंत जातील. यांत प्रत्येक खेपेला एकच दगड वापरावयाचा हें स्पष्ट आहे. फेकलेला दगड उसळ्या मारीत जास्तींत जास्त टप्पे घेईल, हें खेळांतील प्रावीण्य होय. हें एक प्रकारचें शरसंधान आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रयत्नानें हें संधान अचूक सांधतां येतें. आणि पांच-सात टप्पे सहज घेतां येतात. पण किती झालें तरी हा खेळ आहे. पहिल्या टप्प्यालाच दगड बुडणें संभवनीय असतें. दोन-तीन टप्पे घेणें सहज-साध्य असतें. यापेक्षां जास्त टप्पे घेणें हें चातुर्याचें काम आहे.

आपलें जीवन या भाकऱ्यांच्या खेळाप्रमाणें आहे. व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक, सार्वजनिक, राष्ट्रीय असे एकापेक्षां अनेक टप्पे घेण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असते. प्रत्येक टप्प्याला निर्माण होणारें वर्तुळ लहान-मोठें होणें हें व्यक्तीच्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. केवळ व्यक्तिगत वा कौटुंबिक जीवन जगून दगड बुडण्यांत विशेष स्वारस्य नाहीं ! अर्थात् या दोन जीवनांतील यशापयशाला वा भलेबुरेपणाला कांहीं अर्थ आहे. पण जीवनांत अनेक टप्पे साधणें व ते ठसठशीत करून दाखविणें याला

जवानांच्या जीवनधर्मांत मोठें महत्त्वाचें व मानाचें स्थान आहे, हें तरुण मंडळींनीं अवश्य ध्यानांत घ्यावें व आपल्याकडून तशी जोपासना होत राहील. याची दक्षता प्रथमपासून घ्यावी.

चालू सूत्रांत आपल्याला तो विचार प्रामुख्यानें करावयाचा आहे. जीवनाच्या पहिल्या टप्प्यांतील यशापयश पुढच्या कालाला तारक, मारक वा पूरक होत असतें, हें सांगायला नकोच.

प्रत्येक व्यक्तीचें अस्तित्व जगांत प्रगट होणें हा त्याच्या एकूण जीवनाचा केंद्रबिन्दु. या बिन्दूला धरून मग त्याचीं निरनिराळीं वर्तुळें. या दृष्टीनें प्रत्येक व्यक्ति आपआपल्यापरी अगदीं स्वतंत्र, एकली एक आहे यांत शंकाच नाहीं. कोणत्याहि दोन व्यक्तींच्या मुद्रा, स्वभाव, बुद्धिमत्ता सारख्या असत नाहींत. सर्वत्र भिन्नत्व हा निसर्गाचा कडक नियम आहे. म्हणून आपण जो तो आपल्या कर्माचा धनी असें मानतों व तें बहुतांशीं खरें आहे. पण जीवनांतील हा एक नियम झाला. यालाच पकडून जर कोणी स्वतःच्या व्यक्तिस्वातंत्र्याची प्रौढी गाईल व अहंमन्यतेनें म्हणेल कीं, " खाजगी जीवन केवळ माझें आहे. त्यांत मी कसाहि वागेन; इतरांनीं त्यांत डोकावण्याचें वा लुडबूड करण्याचें कारण नाहीं. " तर समाज–धर्म–नीति त्याचें हें स्वातंत्र्य मान्य करणार नाहींत. त्याला बजावतील : तूं कळप करून राहणारा जीव आहेस. कळप सुरक्षित राखण्याची जोखीम प्रत्येक घटकावर आहे. तेव्हां त्या संबंधांत जे निर्बंध आहेत, ते प्रामाणिकपणें मानणें व पाळणें तुझें कर्तव्य आहे. तें तुला जुमानावयाचें नसेल तर कळपांत राहण्यापासून मिळणारे जे लाभ आहेत, ते मागावयाचा अधिकार तुला नाहीं. आणि तसा कांहीं घसमुसळेपणा करून तूं स्वार्थ साधूं पाहशील तर त्यांत तूं अंतीं फार मोठा पराभव पावशील !

यावर उतावळेपणानें कोणी विचारतील : " कळपांत राहून ठराविक जीवन जगा, असा अन्याय मजवर झाला तर मी माझें स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कसें दाखवूं ? " प्रश्न गैर नाहीं. पण त्याचा विचार वेगळ्या दृष्टीनें करणें आवश्यक आहे. म्हणून तो विषय तूर्त बाजूला ठेवूं.

आतां व्यक्तिगत जीवनाचा पहिला टप्पा पाहूं व त्यांत जवानांनीं कोणत्या आचारधर्माकडे प्रथम लक्ष पुरविलें पाहिजे त्याचा विचार करूं.

तरुण मित्रांनो, जवानींत पदार्पण केल्यानंतर "आता मी तरुण आहें. माझें जीवन कसें जगावयाचें? हें माझें मी पाहतों." असा अहंभाव तुमच्या ठायीं निर्माण होतो, हें निसर्गाला धरून आहे. पण हा अधिकार किती ताणायचा, याचा विचारहि करणें तुम्हांला उक्त आहेच; पण तें तुम्हांला हितप्रदहि आहे. कारण, तुमचें मन, मनगट व मेंदू कितीहि कणखर असला तरी त्यांची उपयुक्तता इतरांच्या सहकार्यावांचून प्रत्ययास येणें सर्वस्वीं अशक्य असतें. कारण तुम्ही आपल्या ताठ्यांत राहिलां तर यांत तुमच्या माणुसकीला अपाय होतो.

आपण मागें पाहिलेंच आहे कीं; काल, जीवन, परिस्थिति व माणसें या सर्वांना जुळवून घेऊन जगणें याचें नांव माणुसकी. मग स्वतःच्या माणुसकीला अपाय होईल असें जगणें हितावह कसें होईल? म्हणून तारुण्यसुलभ अहंता शेफारूं द्यावयाची नाहीं.

यानंतर आचारधर्मांतील पहिला नियम—

**१. जगताच्या व्यवहारांत एकटे नाहीं.**

फार महत्त्वाचा व अभ्यासून आचरण्यांत आणण्यासारखा नियम आहे हा.

ही गोष्ट खरीच आहे कीं, व्यक्तिमात्राचें जीवन त्या त्या व्यक्तीपुरतें अगदीं स्वतंत्र असतें. अर्थात् आपलें साध्य काय? व तें आटोक्यांत आणण्याकरितां आपण काय केलें पाहिजे! हें ज्याचें त्यानें ठरवावें हें योग्यच आहे. पण त्यांत इतरांच्या अस्तित्वाला, सुख-दुःखाला व अधिकाराला धक्का न लागेल, असें अवधान राखणें आवश्यक आहे.

तरुण मंडळींनीं तर आणखी जपलें पाहिजे. कारण, त्यांच्या स्वतंत्र जीवनाला नुकता कोठें प्रारंभ झालेला असतो. विकासाचें अंतिम ध्येय त्यांना गांठावयाचें असतें.

प्रत्येक जवानानें हें जाणून असावें कीं, मानवी जीवन अनन्तांतून आलें आहे व अनन्ताकडे चाललें आहे. पण त्याचा मार्ग मात्र चांगला प्रशस्त आहे. ऐसपैस आहे त्यावरून होणारा व्यक्तीचा प्रवास क्षणभराचा आहे. व्यक्तीला मिळणारें आयुष्य शंभर आंकड्यानें मर्यादित आहे. म्हणून आपण सामान्य आहों व एकटें नाहीं याचें स्मरण ठेवायचें. आपलें अस्तित्व आपल्यापुरतें

अद्वितीय. इतरांच्या दृष्टीनें शून्य. शून्याला मागें कोणत्याहि आंकड्यांचा आधार हवा. तो नसेल तर व्यक्ति शून्य आणि नुसत्या शून्याला विचारतो कोण ?—होतकरू जवानांनीं आपल्या जीवनाचें शून्यत्व कांहीं आंकड्यांत आणणें याचें नांव जीवनविकास ! जीवनधर्माचें योग्य तें परिपालन.

जीवनमार्ग ऐसपैस असल्यामुळें त्याच्यावर सर्वांची सत्ता आहे. सर्वांनाच आपआपल्या पात्रतेप्रमाणें गमनागमन करण्याचा अधिकार आहे. नगरांतील राजमार्गांवरून जाण्या-येण्यासंबंधीं जे नीतिनियम आहेत, तेच थोड्याफार फरकानें मानवाच्या जीवनमार्गाला लागू आहेत.

खरें म्हणजे माणूस स्वभावत: कळप करून राहणारा प्राणी आहे. त्याला जनसमुदायाचा आधार हवाच असतो. पण आंधळा स्वार्थ व कोती बुद्धि यांमुळें त्याला वाटतें आपल्याभोंवतीं गर्दी फार आहे. ती त्रासदायक असून आपल्याला अडथळा करणारीहि आहे. या समजुतीनें तो इतरांवर रुष्ट होतो व स्वत:शीं अस्वस्थ व असमाधानी असतो.

पण शहाणी माणसें या वर्दळीकडे केवळ स्वार्थैक दृष्टीनें पाहात नाहींत आपण एकटे नाहीं व समुदायांत आहों हेंच आपलें भाग्य असें मानतात व त्या गर्दींतूनच आपली वाट अचूक हेरतात.

राजमार्गांवरील ही वर्दळ, कलकलाट व जाणाऱ्या-येणाऱ्यांची घाई पहा. यांत मोटारी, घोडागाडी, रिक्षा, छकडे, बैलगाड्या, जनावरें व सायकली यांची धांवपळ सुरू आहे. आणि यांतच पादचारी, उगीच धावणारे किंवा रेंगाळत चालणारे, वाट अडविणारे किंवा मुकाट्यानें वाट देणारे इत्यादि भिन्न भिन्न लोकांची इथें केवढी गर्दी आहे. आणि यांत कलकलाटहि किती विचित्र आहे ! पण असें असूनहि मार्गांवरील या समुदायाला व त्यांच्या गमनागमनाला कांहीं निर्बंध आहेत. कांहीं नीतीहि आहे.

सर्व लोकांनीं कांहीं क्रम धरून व मार्गाची एक बाजू धरून चालावें; वाहनेंहि डावी बाजू धरून जावीं. गर्दी सहसा करूं नये आणि इतरांना अडथळा होईल असा मार्गहि रोधूं नये. अपघात न होतील अशी काळजी सर्वांनींच घ्यावी इत्यादि नियम आहेत. त्यांचा भंग केल्यास कांहीं शिक्षाहि आहे.

सर्वसाधारण जनता मार्गांवरील हे निर्बंध पाळून आपला व्यवहार

अनुक्रम 32093 दि. 1.9.64
क्रमांक ...2385... नों. दि. 21492

चालविते, असाहि आपला अनुभव आहे. म्हणूनच कोणीहि फालतू तक्रार करण्यांत अर्थ नाहीं.

आतां हें खरें आहे कीं, माणसानें स्वतः कितीहि दक्षता घेतली तरी सर्व काळ आपण निर्वेध व निर्भय असूंच असें नाहीं. जनसंमर्दामध्यें गोंधळ, अडवणूक व अपघात यांचें कांहीं प्रमाण असावयाचेंच. वाट अडविणारे किंवा उगीच धटिंगणपणा करणारे गुंड आढळावयाचेच. या सर्वांपासून कांहीं त्रास होणें वा आपला वेळ जाणें अपरिहार्यच आहे. आपण एकटे नाहीं, समुदायांत आहों, घस सोसली पाहिजे असें ध्यानांत् ठेवून आपलें मार्गक्रमण चालूं ठेवण्यांत आणि आपल्याला इष्ट अशी वाट काढण्यांत खरी गंमत आहे. सोयहि आहे.

अगदीं याच पद्धतीचा जीवनमार्ग व त्यावरील नीतिनियम आहेत. पुढें सरूं पाहणाऱ्या व्यक्तीनें धीटपणा व धिमेपणा, शोधक दृष्टि व चतुराई आणि गतींतील चपळाई अवलंबिली पाहिजे. त्यांची अडवणूक सहसा होणार नाहीं. अधोगतीनें वाहणारें पाणी बगल देऊन वा प्रसंगीं खडक फोडून आपला मार्ग काढतें आणि मग कुठें तरी सुंदर झऱ्याच्या रूपानें प्रगटतें.

जीवनपथावरून जाणाऱ्या तरुण मंडळींनीं पाण्याचा हा गुणधर्म लक्षांत घ्यावा आणि सतत पुढें सरकावें. भोंवतालच्या गर्दीचें व कलकलाटाचें भान ठेवावें पण थांबूं नये. विरोध समजून घ्यावा पण त्याचें भय वाळगूं नये. कारण—

## २. सामान्य जग गतानुगतिक आहे.

लौकिक व्यवहारांत चटकन् पाहण्यास मिळणारी ही एक विशेष गोष्ट आहे आणि ती होतकरू जवानांना मोठी धीर देणारी आहे. आपण कांहीं कर्तृत्व गाजवून पुढें यावें व असावें असें बहुतेक जवानांना प्रथम प्रथम वाटत राहतें. त्या धर्तीचें कांहीं मनोराज्य ते करतातहि. पण जगताच्या रंगणांत येतांच त्यांना पहिलें भय वाटतें : स्पर्धेचें !

थोडें बाजूला उभें राहावें. आणि समोर चाललेली गडबड, घाई पाहावी एखादी मोठी शर्यत सुरू आहे व प्रत्येक माणूस आपआपल्या परीनें अग्रभागीं येण्याकरितां वा आहे ती मोक्याची जागा पकडून ठेवण्याकरितां गडबडगुंडा करीत आहे, असा देखावा दिसतो. तो पाहून पुढें सरूं पाहणाऱ्या

व्यक्तीला संदेह वाटूं लागतो : आपला मार्ग मोकळा नाहीं. आपल्याला वाव मिळणें फार कठिण कर्म आहे.

पण कोणाहि जवानानें गोंधळून जाण्याचें कारण नाहीं. त्यांनीं स्वतःला धीर देत, धीटपणानें समोरचें व आजूबाजूचें पाहावें. वस्तुस्थितीची चाळणा करावी. त्यांच्या ध्यानांत येईल कीं, सामान्य जग गतानुगतिक आहे. समोरची धावपळ, धक्काबुक्की व अरेतुरे सर्वसाधारण लोकांमध्यें चालू आहे. जाणती, ध्येयनिष्ठ व कार्यरत माणसें त्या झुंडींत नाहींत. त्यांनीं आपला मार्ग थोडा बाजूनें आंखला आहे. तिकडे गर्दीहि विरळ आहे. याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं, तिकडे स्पर्धा वा विरोध नाहींच. छेः! तसें सुतराम् नाहीं. जीवन झगडून जगावें लागतें आणि टाकीचे घाव सोसल्या-वांचून देवपण येत नाहीं. हा कठोर नियम सर्वत्रच आहे. पण हें गृहीत धरूनहि जवानांनीं हें ध्यानांत घ्यावें कीं, जगांत गतानुगतिक लोकांचा भरणा फार आहे. जीवनधर्म समजून घेऊन वाटचाल करणाऱ्या व्यक्तीला पुढें सरण्याला मधून मधून वाव आहेच.

तरुण मित्रांनो, आपला विद्यार्जनाचा काळ आठवा आणि त्या वेळीं तुमचे जे सहाध्यायी होते, त्यांचीं ध्येयें आशा-आकांक्षा, मनोराज्यांतील भराऱ्या कशा होत्या हेंहि मनांत आणा; नंतर त्यांचें पुढच्या जीवनांतील चरित्र पहा. तुम्हांला दिसून येईल कीं, ते सारे लोक गतानुगतिक झालेले आहेत. ठराविक जीवनप्रवाहांत वाहात चालले आहेत!

याचा अर्थ हाच सामान्य जग गतानुगतिक आहे! अग्रभागीं जाणारीं माणसें विरळा आहेत! तीं धिमेपणानें परिस्थितीशीं दोन हात करीत आहेत. आघात सोशीत आहेत. क्षणाक्षणानें व पावलापावलांनीं पुढें सरत आहेत. आपल्या इच्छिताकडे चाललीं आहेत!

जातिवन्त जवानांनीं त्यांचें अनुकरण करावें. मराठा तरुणांनीं बाणा राखावा : “ मरेंगे पर भी लढते रहेंगे ! ”

**३. समानशील शोधा, सहाय्य द्या व घ्या.**

जवानींत चांगल्या आचारा-विचारांचीं व समान शीलाचीं माणसें भेटणें, त्यांचा स्नेह लाभणें व त्यांच्या सहकार्यानें जीवन यशस्वी करण्याचें साधणें हें मोठें भाग्य होय.

प्रत्येक जवानानें अशा गांठी-भेटी होण्याविषयीं आतुर असावें. अशीं समान आचाराविचारांची व समाजांत प्रतिष्ठित ठरलेलीं माणसें हेरणें हें थोडें दक्षतेचें काम आहे. कारण सर्व साधारण जगताच्या व्यवहारांत बाह्यावडम्बर व पोकळ थाटमाट याला मोठें महत्त्व आलेलें आहे व त्यांच्याकडे माणसाचें सहज लक्ष जातें. पण हा पसारा बाजूला सारून गुणग्राहक दृष्टीनें शोध घेतला पाहिजे.

विद्यासंपन्न असूनहि विनयशील, साधा पोषाख, साधी राहणी, सौम्य स्वभाव व शांत संभाषण, सतत कार्यमग्नता आणि इतरांच्या उपयोगी पडण्याची तत्परता इत्यादि सभ्य शिष्टाचार त्यांच्या आचार-विचारांत आढळतो. आणि अशा माणसांची संख्या अल्पप्रमाणांत असली तरी तीं बहुशः सर्व वयाचीं व समाजांतील सर्व थरांत आढळतात. त्यांना शोधण्याचीं व त्यांचा परिचय करून घेण्याची उत्कंठा तरुण मंडळींना पाहिजे.

अशा संगतीपासून आपला उपयोग फारच होतो. आपल्या मनाची निराशा कमी होणें, उत्साह वाढविणें, ज्ञान मिळणें. अडचणींतून मार्ग काढण्याच्या सूचना मिळणें व आपली कार्यप्रवणता वाढणें इत्यादि लाभ होतातच होतात.

जवान मंडळींनीं आपल्या आचारधर्मांत या नियमाचा समावेश अवश्य करून घ्यावा. मोठा कल्याणप्रद विषय आहे तो.

तरुण मित्रांनो,

जीवनमार्गावरून जाणाऱ्या अनंत व अखंड अशा जनसंमर्दामध्यें तुम्ही मिसळला आहां. तुम्ही ठराविक पद्धतीचे यात्री आहां यांत शंका नाहीं. तुम्हांला या मार्गानें गेलें पाहिजे. झुंडीबरोबरच चाललें पाहिजे. पण ज्या वेळीं तुम्ही वर दिलेल्या नियमांचें थोडें थोडें पालन करूं लागाल, त्या वेळे-पासून तुमचें व्यक्तित्व वेगळें होऊं लागेल. भोंवतालच्या जगाला तें एकदम दिसणार नाहीं. पण तुमचें आगळेंपण वाटूं लागेल आणि त्यांत असणारे लाभ पुढच्या आयुष्यांत तुम्हांला उपयुक्त होऊं लागतील. तुम्ही मात्र त्या नियमपालनाचें सतत स्मरण ठेवलें पाहिजे आणि इतरांनीं ठरविलेल्या चाकोरीबाहेर राहात मार्ग आक्रमण्याचा ठेका चालू ठेविला पाहिजे.

यानंतर भोंवतालच्या जगांत म्हणजे तुमच्या कक्षेंत असणाऱ्या जगांत तुमचें वेगळेंपण कसें समजूं लागेल !

ज्ञानी व व्यवहारी पंडितांचे अडाखे असे आहेत. हें समजण्यास सोपें, आचरणांत आणण्यास पुष्कळसें कठीण परंतु अंतीं भारी हितावह असें त्यांचें स्वरूप आहे.

एकेक मोती अगदीं निवडक आहे.

× × ×

आपला दोष मोकळ्या मनानें पण लक्षांत येतांच मान्य करा. कांहीं प्रायश्चित्त वांट्याला आलें : भोगण्यास तयार असा. तुम्हांला सहानुभूतिक लोकांकडून क्षमा मिळण्याचा दृढ संभव आहे.

× × ×

उपकार जाणण्यास व कृतज्ञता व्यक्त करण्यास आळस करूं नका. साह्याचा हात तुम्हांला सतत मिळेल.

× × ×

आपल्या आचाराविचारानें वा बोलण्यानें कोणाचा अपमान झाला वा मन दुखावलें गेलें तर त्या वेळीं स्वतःची श्रीमंती, वयाचा मोठेपणा वा इतर प्रतिष्ठा ध्यानीं न घेतां मोकळ्या मनानें त्या दुखावलेल्या वा कष्टी झालेल्या माणसाची क्षमा मागा. त्या योगें त्याचें मन थोडें तरी शांत होईल. त्याला बोचणारें शल्य विरघळेल. तुमचें मनहि उगीच रुखरुखणार नाहीं.

× × ×

कोणतेंहि सार्वजनिक कार्य पत्करलेंत किंवा कोणाचें साह्य केलेंत तर स्वार्थनिरपेक्ष राहण्याची दक्षता घ्या. अशी स्वार्थनिरपेक्षता तुमच्या मनाला आल्हाददायक शांतता देईल व ती लोकांत भूषणावह ठरेल.

× × ×

कोणत्याहि कारणानें दुसऱ्याचें सांगणें ऐकण्याचा प्रसंग उद्भवला तर तें शांतपणें ऐकून घ्या. निवाडा देण्याची घाई करूं नका. उपदेश देण्यांत संयम राखा. आणि त्यासंबंधीं स्वतःकडून जगांत वाच्यता न होईल याला जपा.

× × ×

कारण नसतां इतरांच्या आचाराविचारांविषयीं वा खाजगी आचरणाविषयीं वाटाघाट करून स्वतःचें डोकें पिकवून घेऊं नका. प्रसंगच पडला तर मनाचें औदार्य ठेवा. तो माणूस आहे व आपणहि तसेंच आहों, हें ध्यान राखा.

× × ×

दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची खोटी ऐट आणूं नका वा वेळ मारून नेण्याकरितां वचनेंहि देऊं नका. वचन देणें भाग पडलें तर तें विचार करून द्या. तसें वचन दिलें गेलें व मागून स्वतःची असमर्थता लक्षांत आली तर कमीपणा मान्य करून व दोषहि पत्करून वचन मागें घ्या. पण दुसऱ्याला केवळ शब्दावर झुलवीत ठेवूं नका. शेवटीं तें तुम्हांला बाधेल.

× × ×

जें काम तुम्हांला साधलें नाहीं वा कळलें नाहीं, तें अशक्य आहे असें समजूं नका. कारण, पुढें मागें तें किंवा त्या धर्तीचें काम दुसरा एखादा सहज करीत आहे व त्यावर धन, प्रतिष्ठा व कीर्ति मिळवीत आहे असें तुमच्या पाहण्यांत येईल. मग त्या कार्यकर्त्यांचा हेवा करूं नका. त्याला गुरु माना व त्याची कार्यपद्धति समजून घ्या. तुमचा भ्रम नाहींसा होईल व तुम्हांला जी नवी दृष्टि येईल ती अन्यत्र उपयोगी पडेल.

× × ×

आयुष्यांत सगळे दिवस सारखे नसतात. आपण कितीहि दक्षतापूर्वक वागलों तरी कुठें तरी कांहीं तरी चुकतें. आपल्या कार्यांत व्यत्यय येतो. मग प्रसंगीं त्यामुळें आपलें आरोग्य, उत्साह, आनंद, धनलाभ, प्रतिष्ठा, मनःस्वास्थ्य इत्यादि सर्व गोष्टींत चढउतार होणें अपरिहार्य असतें. अशा वेळीं तारतम्यानें वागावें, दुसऱ्या कोणाला जबाबदार धरूं नये. शांतपणें परिस्थितीचा विचार करावा. म्हणजे मनःस्तापाला आळा बसतो.

ज्याचें डोकें चढतांना फिरत नाहीं, त्याचेच पाय उतरतांना लटपटत नाहींत.

× × ×

आधीं योजना आंखणें, मग साधकबाधक विचार करणें आणि मग कार्याला हात घालणें; असा कार्यारंभ श्रेष्ठ.

कार्य प्रारंभिल्यावर तें तडीला नेण्याविषयीं जागरूक असणें व शेवटपर्यंत धीर धरून तें तडीला नेणें याचें नांव चिकाटी !

लहान-मोठ्या अपयशानें निराश न होतां वा कच न खातां पुनः पुन्हा प्रयत्न करणें व सदैव कार्यमग्न असणें याचें नांव कसोटी !

× × ×

साऱ्याच कार्यांची ओढाताण वा आबाळ व्हावी. विश्रान्तीला वेळच सांपडूं नये व जीवन कंटाळवाणें व्हावें असें वाटत असल्यास—आजचें काम उद्यांवर टाकून पहा.

× × ×

जवान मित्रांनो,

वर सांगितलेले अडाखे साधेसुधे आहेत. यांपैकीं अनेक विचार तुमच्या वाचनांत वा ऐकण्यांत आले असतील. तुमच्या दैनंदिन आचारधर्मांत त्यांचा समावेश झाला असेल तर फारच उत्तम गोष्ट. निःसंशय तुम्ही प्रगतिपथावर आहां, असेंच कोणीहि मानील. वडील पिढीचा व गुरुजनांचा तुम्हांला आशीर्वाद मिळेल व भोंवतालचें जगहि तुमची पाठ थोपटील. जर तुमचें या शिकवणीकडे दुर्लक्ष झालें असेल तर? वा तुमच्याकडून त्यांची हेळसांड होत असेल तर?—तुमच्या स्वार्थाला धक्का लागेल हें आधीं ध्यानांत घ्या. तुमचें समाजांतील प्रतिष्ठास्थान डळमळीत राहील व तुमच्या व्यक्तित्व-विकासालाहि तजेला राहणार नाहीं. सावधान ! सावधान ! !

## थोडा अभ्यास

*यः पठति, लिखति, पश्यति*
*परिपृच्छति, पंडितानुपासयति ।*
*तस्य दिवाकर-किरणैः*
*नलिनीदलमिव विकास्यते बुद्धिः ॥*

[ जो अध्ययन करतो, लिहितो, ( जगाच्या व्यवहाराचें व ग्रंथांचें वरचेवर ) अवलोकन करतो, नेहमीं संशयनिवृत्ति करून येतो आणि पंडित लोकांच्या समागमांत असतो, त्याची बुद्धि सूर्यकिरणांनीं जशी कमलिनी फुलते तशी विकास पावत जाते. ]

★ ★ ★

*विचारसूत्र दहावें*

# जीवनधर्मातील पथ्यापथ्य-विचार

'धन्य धन्य नरदेहो। येथील अपूर्वता पहाहो।' अशा शब्दांत साधुसन्तांनीं वर्णिलेली नरदेहाची थोरवी आणि ज्ञानी व कर्मयोगी अशा श्रेष्ठ पुरुषांनीं केलेली मानवी जीवनाची प्रशंसा यांच्या तात्पर्यांत कांहीं फरक असला तरी हेतूमध्यें पुष्कळ एकवाक्यता आहे. मानवानें परम पुरुषार्थी असलें पाहिजे. असेंच उभय पक्षाचें म्हणणें. पहिला पारलौकिक श्रेयाचा विचार करतो. दुसरा ऐहिक कल्याणाविषयीं बोलतो. पण दोघांच्या विवेकाचा रोख आहे एकच. मनाचा संयम, स्वार्थत्याग, कष्ट सहिष्णुता निरलसता व कार्यैकनिष्ठा ही मनुष्याला पाहिजेच पाहिजे. असा अट्टाहास दोघांचाहि आहे.

आणि हीच गोष्ट लक्षांत घेऊन आपण गेल्या एका सूत्रांत निसर्गानें जवान मंडळींना बहाल केलेलें भाग्य व भांडवल किती श्रेष्ठ व बहुमोल आहे याचें विवेचन केलें.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होतें. मानवजातीच्या आजच्या प्रचंड व भव्य प्रगतीला एक विशिष्ट परंपरा आहे. दर पिढीला निरनिराळ्या कुलांत पित्यापेक्षां पुत्र श्रेष्ठ व समाजांत मागच्या पिढीपेक्षां पुढची पिढी अनेक गुणांनीं श्रेष्ठ असें घडत आलेलें आहे. अर्थात् हाच नियम व्यक्तीच्या व समाजाच्या अधोगतीला उलट दिशेनें लागू आहे हें सांगायला नकोच.

चालू युगांत इंग्लंड-अमेरिकादि राष्ट्रें उदयाला कां आलीं व आम्ही सुवर्णभूमीचे धनी खालीं खालींच कां घसरत चाललों याचा उलगडा होईल.

तरुण मित्रांनो, या फरकाचा विचार करून आपल्या राष्ट्राच्या पुनरुत्थानाचा प्रयत्न कोणीं करायचा ? हें सांगायला हवें का ?

तरुण मंडळींनीं या हांकेला ओ दिलीच पाहिजे. एकच गोष्ट यांत मोठी

शोचनीय आहे. आम्हांला हजारों हातांनीं एकाच काळीं दोन कार्यें करावयाचीं आहेत. एकीकडून अधोगतीची घसरगुंडी थांबवावयाची आहे आणि दुसरीकडून प्रगतीचा अडलेला गाडा मार्गाला लावावयाचा आहे.

होय. परिस्थिति अत्यंत विपरीत व कालाची अनुकूलता मुळींच नाहीं. हें मोठें संकट यांत आहे, ही गोष्ट नाकारून चालणार नाहीं. पण जवानांनीं आपलें भाग्य व भांडवल पणाला लाविलें तर ? त्यांना मात करतां येईलच. स्वतःचें व्यक्तीगत व सांसारिक जीवन चालवीत, स्वार्थांत परमार्थ गोवला पाहिजे आणि भोगांत त्यागाची आठवण ठेविली पाहिजे !

जातिवन्त जवानांना हें व्रत साधणें अशक्य नाहीं.

श्री समर्थांनीं नरदेहाची प्रशंसा करून माणसानें परमार्थाचा लाहो घ्यावा असें सांगितलें, पण त्याबरोबर त्यांनीं आधीं प्रपंच नेटका करावा, अशीहि शिकवण प्रांजलपणें देऊन ठेविली आहे. त्याचप्रमाणें साधुश्रेष्ठ तुकारामबुवा. ते स्वतः पूर्ण संसारविरक्त. पण त्यांनींहि गृहस्थाश्रमांतील आचाराविचारांचें सुस्पष्ट वर्णन करून तसें वर्तन करणारा माणूस शेवटीं उत्तम गति पावतो असा निर्वाळा दिला आहे. मौज ही आहे कीं, या अभंगांत बुवांनीं त्या काळची समाजसेवा व राष्ट्रकार्य यांचेंहि दिग्दर्शन केलें आहे असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. आजच्या काळांतहि त्या शिकवणीचा पुष्कळसा भाग विचारांत घेण्यासारखा आहे.

तरुण मंडळींनीं या दृष्टीनें नेटक्या संसाराचें स्वरूप समजून घ्यावें आणि स्वतःचें व्यक्तिगत व सांसारिक जीवन सुखमय व समृद्धीचें करण्यास झटावें. यांत केवळ स्वार्थच साधेल असें नाहीं, तर त्याबरोबर समाजसेवा वा राष्ट्रकार्य करण्याचे पाठहि मिळतील.

स्वतःच्या संसारांत जो प्रामाणिक राहील, तो परमार्थांतहि तसाच वागेल. आजचें समाज वा राष्ट्रकार्य हा परमार्थच. ज्याला संसार नीट साधणार नाहीं, त्याचें राष्ट्रकार्यहि पोकळ व निःसत्त्व राहील.

जीवनधर्मांतील पथ्यापथ्य-विचार याकरितां करावयाचा.

सध्यां आपलें मध्यमवर्गीयांचे संसारहि आपल्या राष्ट्राप्रमाणेंच अगदीं हीनदीन स्थितीला पोंचले आहेत. तुटपुंजी कमाई, वाढता खर्च व महागडें राहाणीमान यांमुळें सामान्य मनुष्य अगदीं जिकिरीला येऊन गेला आहे.

आणि असें असतांहि वयांत आलेलीं आपलीं मुलें संसारांत केव्हां पडतील असें वडील मंडळींना वाटतें. तरुण मंडळीहि कुरकुरत व " आतांच काय घाई आहे ? " म्हणत संसाराचें जूं मानेवर घेण्यास तयार होतात. यांत अयोग्य कांहींच नाहीं. जवानीमध्यें मनाची सुखलोलुपता व इंद्रियांची उपभोगवृत्ति सर्वांनाच जाणवूं लागते. वडील माणसें त्या अनुभवांतून पुढें सरकलेलीं असतात आणि तरुण मंडळींना त्याची जाणीव होऊं लागते. निसर्गाचा नियम आहे तो. यामुळें नव्या संसाराची उभारणी सहजच होऊन जाते. तरुणांच्या स्वावलंबी जीवनाला वाव मिळतो.

असें हें सांसारिक जीवन व त्यांतील मनाला, इंद्रियांना व शरीराला सौख्य देणाऱ्या अनुभवाचा आस्वाद तरुण मंडळींनीं निर्वेधपणानें घ्यावा आणि यांच्या जोडीला सध्यां इतर व्यावहारिक मौजा वा चैनी ( pleasures ) पुष्कळ निर्माण झाल्या आहेत, त्याहि तरतमभावानें भोगाव्या. कारण, जीवन त्यावांचून रुचिकर व स्वास्थ्यप्रद होणें कठिण आहे.

वाचनांत कादंबऱ्यांचा भरणा थोडा जास्त असला तरी विशेष कांहीं बिघडत नाहीं. त्याचप्रमाणें सवड साधून नाटक-सिनेमा पाहणें, चांगल्या गायनाच्या जलशाला जाणें, घरीं फोनो वा रेडिओ घेऊन त्यावरील गाणें वा कार्यक्रम ऐकणें आणि इतर कांहीं करमणुकीचा छंद असल्यास श्रमपरिहारार्थ त्यांत कांहीं काळ घालविणें इत्यादि करमणुकीच्या गोष्टी खुशाल भोगाव्या. सदां कामाच्या रगाड्यांत सांपडणें आणि त्या निमित्तानें करमणुकीचीं व विश्रांतीचीं साधनें डावलणें याला कांहीं अर्थ नाहीं. संसार म्हणजे तुरुंग नव्हे किंवा योगसाधन करण्याचा मठ नव्हे. शरीर तरतरीत राखणें जितकें आवश्यक तितकेंच काम करून कंटाळलेलें मन करमणुकीच्या द्वारा पुन्हां ताजेतवानें करणें आवश्यक आहे. रुक्ष जीवन व कंटाळलेलें मन कांहीं पुरुषार्थ साधावयाचा झाल्यास निरुपयोगी होतें; म्हणून मनोरंजक विषयापासून सुख मिळविणें महत्त्वाचें आहे.

पण यांत जवानांच्या पायाखालची वाळू सरकतां उपयोगी नाहीं. त्यांचें आरोग्य, धन व वेळ म्हणजेच त्यांना लाभलेलें भाग्य व भांडवल याला धक्का लागतां कामा नये. ही दक्षता प्रत्येक जवानानें मान राखून घेतली पाहिजे.

सर्व तरुण मंडळींनीं आणखी असें ध्यानांत घ्यावें कीं, कोणतींहि सुखें कितीहि अवीट असोत वा वाटोत, त्यांच्याविषयींची इंद्रियांची उपभोगशक्ति मर्यादित आहे. ती सदैव हात राखून वापरण्यांतच जीवनांतील खरा आनंद सांठविलेला आहे. सुखोपभोगांत अंतिम साध्य समाधान ( happiness ) असलें पाहिजे. मनःसंयमाचें महत्त्व इथें आहे. पुरुषार्थ करण्याचेंहि मूळ इथेंच आहे. जवानांनीं पुनः पुन्हां विचार करावा व सावधचित्त असावें. तरच त्यांचा निभाव लागेल.

विषयोपभोग घेतां घेतां शरीर थकावें व मनाला उबग यावा आणि मग सारेंच जीवन बेचव वाटूं लागावें, असें कोणाहि जवानाला वाटत नाहीं. मग चूकभूल कुठें होतें ?

कांहीं कर्तृत्व गाजवून समाजांत मान व प्रतिष्ठा मिळवावी असें जीवनारंभीं उत्कटत्वानें वाटत असतां, अल्पावधींत त्याचा विसर पडावा ! काय याचें कारण ?

समाज सेवा करणें व राष्ट्राच्या हिताकरितां झटणें फार आवश्यक आहे. इतरांच्या प्रेमामुळें, कष्टामुळें व सावधगिरीमुळें आपलें भरणपोषण झालें व आपणास जीवनाच्या आखाड्यांत उतरणें फार सुलभ झालें; ही गोष्ट लक्षांत असतां व तें अनाहुत ऋण आपल्याला फेडलेंच पाहिजे, असें कळत असतां, आपण कृतघ्न झालों,—कां ?

असे अनेक प्रश्न शहाण्या जवानांच्या मनांत पुढें पुढें येऊं लागतात. त्यांचें मन लज्जेनें अस्वस्थ होतें आणि मग काल लोटत गेला म्हणजे तें मोंड बनतें.

तरुण मित्रांनो, या सर्व भानगडीचा विचार जीवनारंभींच करणें आवश्यक आहे. अंतिम हिताचें आहे. म्हणून याविषयीं कोणता पथ्यापथ्य विचार केला पाहिजे, तें पाहूं.

जवानांच्या मनाला अस्वस्थ करणारी ही अनवस्था निर्माण होण्याचें कारण एकच—

फावल्या वेळेचा इष्ट असा उपयोग न करणें.

मनापुढें कांहीं चांगलें उद्दिष्ट नसणें

सांसारिक जीवनांत प्रारंभीं थोडी नवी नवलाई असते व तिच्याभोंवतीं धांदल, गडबड व व्यग्रता यांचें एक वलयहि असतें. मोहित झालेल्या मनाला तेवढें निमित्त पुरतें. तें बेलगामी होण्यास तात्काळ प्रवृत्त होतें. म्हणून ज्या जवानांना स्वतःच्या जीवनाची आस्था आहे, त्यांनीं फावल्या वेळेकडे आधीं लक्ष द्यावें व त्यांत चपखल बसेल असें कांहीं उद्दिष्ट ठरवावें.

मनाच्या गुणावगुणाचा विचार करतांना मागें आपण असें पाहिलें आहे. मन उच्छृंखल खरेंच पण तें मोठें नादिष्ट आहे. त्याच्या अवतीं-भोंवतीं जो विषय सतत ठेवावा, त्यांत तें रंगूं लागतें आणि माणसानें चिकाटी धरल्यास तें त्या विषयाशीं तद्रूपहि होतें. मग तो विषय कितीहि किचकट वा नीरस असो.

आतां फावल्या वेळाचा हिशेब घेऊं.

चोवीस तासांचा दिवस. या सर्वांचा वांटणीला सारखा आला आहे. आठ तास झोप. आठ तास जीवनांतील प्रत्यहींचा कार्यक्रम. यांत प्रातः-कालीन कर्में, स्नान-भोजनादि गोष्टी आणि धनोपार्जनाचा खटाटोप एवढ्या गोष्टी सामावूं शकतात. राहिले आठ तास. यांपैकीं चार तास इकडे तिकडे गेले वा घालविले तरी चार तासांचा वेळ अगदीं फावला वेळ असतो. प्रत्येक दिवशीं !

जवान मित्रांनो, स्वतःची कसलीहि तरफदारी न करतां या अमोल ठेव्याचा आपण उपयोग काय करतों ! असा प्रश्न मनाला विचारा. तुमचा तुम्हांला विस्मय वाटेल. खंतहि वाटेल.

आणि मनाशीं एक खूणगांठ बांधून ठेवा. कोणत्याहि गोष्टीचें मूल्य-माणसाला कळलें नाहीं कीं, ती त्याला टाकाऊ वा अडचणीची वाटते. त्याच्याकडून त्या बाबतींत हेळसांडहि होते. मग अत्यंत अमूल्य अशा कालाविषयीं काय सांगावें ? माणूस आपल्या जीवनाविषयीं जर असा बेपर्वा राहिला तर ? त्यानें आपण होऊन स्वतःची फार मोठी हानि करून घेतली असा कटु अनुभव त्याला आल्यावांचून राहणार नाहीं.

ऐन तारुण्यांत माणसानें फार सावध असलें पाहिजे. आपला दैनंदिन कार्यक्रम सुरळीत पार पाडण्याचें कार्य परिस्थिति करीत असते. त्याची

बुद्धि व ज्ञान ठराविक चाकोरींतून जात असतें. त्यांच्यावर ताणहि फार थोडा पडतो. त्यांचा उपयोगहि माणसाला कारणापुरताच होतो. म्हणजे सारे कांहीं यांत्रिक. बाहेरून गति मिळत असते. चाकें फिरत असतात. जीवन सरकत राहतें. पण फावला वेळ—रिकामपण—याची गोष्ट तशी नाहीं. निष्क्रियतेनें तें तुंबलें जातें. वाहण्याचें थांबतें ! मग काय होतें, सांगावयाला का हवें ?— एखादें डबकें जाऊन पहा.

निरुपयोगी काल माणसानें दक्षता घेतली नाहीं तर दुरुपयोगी होऊं लागतो. मनाचें चांचल्य व कालाचा दुरुपयोग यांची गट्टी जमण्यास वेळ लागत नाहीं. माणसाच्या जीवनाला अनर्थाकडे जाण्यास मार्ग मिळतो. म्हणून जवानांनीं आपल्या फावल्या वेळेसंबंधीं फार फार दक्ष असलें पाहिजे आणि कांहीं ध्येयात्मक कार्यक्रम मनापुढें ठेवला पाहिजे. स्वतःचें अनियंत्रित स्वातंत्र्य नियंत्रित केलें पाहिजे. नाहीं तर हिन्दी कवि व सन्त कबीर म्हणतात त्याप्रमाणें :

*रात गँवाई सोय करी, दिवस गँवायो खाय ।*
*हीरा जन्म अमोल था कौडी बदले जाय ॥*

[ रात्र झोपून गमावली, दिवस खाऊन घालविला. लाख मोलाचा हिरा ( जन्म ) कवडीच्या बदल्यांत गेला ! ]

आतां पुढचा प्रश्न मनापुढें कोणतें उद्दिष्ट असावें ?

ज्यांचें बऱ्यापैकीं विद्यार्जन झालें आहे त्याला अनुसरून वाचन आहे. भोंवतालच्या जगाचेंहि ज्यांनीं निरीक्षण केलें आहे आणि कार्यकर्त्यांच्या हालचालीकडे ज्यांचें लक्ष आहे अशा जवानांना या विषयांत सांगण्यासारखें काय आहे ? किंबहुना कोणत्याहि जवानाला ' तुझें उद्दिष्ट अमुक असूं दे. ' असें सांगण्याचें प्रयोजन राहिलेलें नाहीं. ज्याचा त्यानें थोडा विचार केला तर त्याला हा प्रश्न सहज सोडवतां येईल.

प्रत्येक जवानानें कसें करूं ? काय करूं ? या संदेहांत पडूं नये. आपल्या आवांक्याचा विचार करावा. फावल्या वेळेचें कांहीं वेळापत्रक करावें आणि एखादा छंद लावून घ्यावा. मित्रमंडळींत सुद्धां चर्चा करूं नये. एका वर्षाची योजना आंखावी झटकन् कार्याला लागावें.

विद्यार्जनाच्या कालांत भावी कालासंबंधीं किती तरी मनोरथ रचलेले असतात ! किती तरी कल्पना वाऱ्यावर गेलेल्या असतात. समाजाविषयीं, देशाविषयीं आणि सर्वसाधारण जीवनाविषयीं किती तरी चर्चा कानावरून गेलेली असते, उद्दिष्ट ठरविण्यास हें साहित्य काय थोडें आहे ? त्याचप्रमाणें या प्रबंधांतहि जीवनधर्माचीं विचारसूत्रें समजून घेतांना किती तरी ऊहापोह केलेला आहे. जवानांनो, चर्वितचर्वण करण्याचें कारण नाहीं. पण परिस्थिति तुम्हांला आव्हान देते आहे. कार्यें अनंत आहेत. कार्यक्षेत्र अफाट आहे आणि कांहीं कर्तृत्व गाजवून राष्ट्रसेवा करण्यास संधिहि भरपूर आहे अडवणूक आहे कुठें ? स्थितींत कमरेवर हात ठेवून जर विचाराल : " बोला, काय करूं ? " तर तें किती हास्यास्पद व अनुकंपनीय ठरेल !

यांतूनहि एक साधी गोष्ट तुमच्या नजरेस आणतों. हिंदी ही आपली राष्ट्रभाषा आहे. बंगाली, गुजराथी, कानडी या आपल्या जवळच्या मराठीच्या भगिनी-भाषा आहेत. त्यांच्या अभ्यास करून प्रावीण्य मिळविण्याचें साधें उद्दिष्ट तुम्हांला वर्षा-दोन वर्षांपुरतें नाहीं का पुरणार ? महाराष्ट्राच्या मातीच्या कणांकणांत संपत्ति आहे, ज्ञान आहे. सह्याद्रीचा विस्तार, त्याच्या अंगावर असलेल्या वनस्पति आणि पोटांत असलेलीं खनिज द्रव्यें संशोधकाची मार्गप्रतीक्षा करीत आहेत. ज्ञानविज्ञानाच्या अनंत शाखा " अभ्यासू हवेत. " म्हणून हांक देत आहेत ! वेळ तुमच्याकडून आहे !

जवान मित्रांनो, यापेक्षां काय सांगतां येईल ?—कार्याला लागा ! मित्रांनो कार्याला लागा ! एवढेंच ना.

आतां यावरचें पथ्य. दिसण्याला सोपें आहे. पण पाळण्यास थोडें कडक आहे. तुमच्या उद्दिष्टाचा कार्यपद्धतीचा व प्रत्यक्ष कार्याचा प्रारंभींच गाजावाजा न होईल याला जपावें. आपल्या ज्ञानांत व कार्यकुशलतेंत भर पडण्याकरितां समान धर्मीय मित्र मंडळींत सामान्य चर्चा करणें आणि इतरांचें बोलणें नीट ऐकून घेणें निःसंशय हिताचें असतें. पण स्वतःच्या आकांक्षेविषयीं वा प्रत्यक्ष कार्याविषयीं फारसें कांहीं बोलूं नये. असें मौन धरण्यांत स्वतःची प्रशंसा होण्याची वा करून घेण्याची धास्ती असत नाहीं व सभ्य शिष्टाचारहि पाळला जातो.

दुसरा एक धोका. आपण स्वतःविषयीं कांहीं बोलूं लागलों कीं, एखादें

वेळीं आत्मप्रौढी टाळूं; पण स्वतःकडे खोट्या विनयानें कमीपणाहि घेऊं. ही गोष्ट बरी नाहीं. स्वतःची स्तुति करणें जितकें गैर तितकेंच कारण नसता कमीपणा घेणेंहि गैरच, म्हणून फार कमी बोलावें.

सध्यांचें युग वर्तमानपत्री घाई, गडवड व बडबड यांचें आहे. जाहिरात-बाजीचें स्तोम माजलें आहे. या प्रकारांत कांहीं लाभ नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. पण चतुरस्र तरुणांनीं भान ठेवून वागावें. थोडेंसें कर्तृत्व गाजविलें न गाजविलें तों वर्तमानपत्रांतील औट घटकेचा बडेजाव वांट्याला यावा व तो होतकरू तरुणांना रुचिकर वाटावा ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. तरुणांनीं खरोखरच स्वतःला जपलें पाहिजे.

## कीर्तीहि निढळाच्या घामाची असावी.

सहजप्राप्त धनाचें मूल्य व महत्त्व जसें ऐतोबाला कळत नाहीं. तसेंच नाममात्र कर्तृत्वानें वर्तमानपत्रांतून बोभाटत आलेली कीर्ति तरुणांना ऐतोबा बनविण्याचा संभव असतो. म्हणून तें संकट मानावें.

मनुष्याला स्वतःचें नांव मुळांतच भारी प्रिय असतें. तें कोठें छापून आलें कीं, त्याला बरें वाटतें. तें कां व कसें आलें, हें जाणून घेण्याची त्याला उत्कंठा लागते. अनोळखी जगांत इतरांच्या बोलण्यांत तें आलें तर तो लागलीच कान टवकारतो. हा व्यक्तिमात्रांत आढळणारा स्वभावदोष आहे. यावर पूर्ण जय मिळविणें कठिण आहे. पण ही लोलुपता आटोक्यांत राहील अशी दक्षता कार्यनिष्ठ तरुणांनीं घ्यावी. थोडें उदासीन राहण्याचा अभ्यास करावा. चारित्र्याचा कस वाढण्यास स्वतःच्या स्तुतिनिंदेविषयीं निःस्पृह होण्यांत यश आहे. लोकांनीं चांगलें म्हणावें एवढी आतुरता क्षम्य होईल. पण तसें केव्हां होतें? किती घडतें? यावर लक्ष ठेवणें धोक्याचें आहे. आणि प्रसिद्धिविन्मुखतेचा आव आणीत आंतून तसा कांहीं प्रयत्न स्वतः किंवा मित्राकरवीं करणें शुद्ध आचरटपणा आहे.

तरुण मित्रांनो, कांहीं खराखुरा पुरुषार्थ घडण्याच्या आंतच स्वतःच्या नांवाचा गवगवा होण्याची चटक मनाला लागणें म्हणजे कर्तृत्वशून्यतेला आव्हानच होय. यांतून मग ढोंगी बुवाबाजी निर्माण होते! या टोकाला जपलें पाहिजे. श्री समर्थांनीं बजावलें आहे—

*अभ्यासें प्रगट व्हावें । ना तरी गुप्तचि असावें ।*
*प्रगट होवोनि नासावें । हें बरें नव्हे ॥*

वर सांगितलेलें पथ्य वा दर्शविलेला धोका यांचा बाऊ मानण्याचें कारण नाहीं. अपरिहार्य गोष्टींचा विचार कसला करावयाचा ? कालपरिस्थिती-प्रमाणें निर्माण झालेलीं नवीं विचारमूल्यें लक्षांत घेतलींच पाहिजेत. शिष्टमान्य असतील व स्वतःला झेपतील एवढीं विचारांत घ्यावीं व बाकीचीं दुर्लक्षावीं. आपल्या जीवनाची व कर्तृत्वाची उभारणी सुबक होत जाईल, एवढें लक्ष पुरवावें म्हणजे झालें.

प्रारंभीं उत्साहाचा भर दांडगा असतो व स्वतःचा उरक दाखविण्याची खुमखुमी असते. यामुळें एक ना धड भाराभर चिंध्या असे नाटक होण्याचा संभव असतो. म्हणून तें पथ्य पाळावें. स्वीकृत कार्याचा व्याप हळूहळू वाढवावा. तसें जीवन जगणारी मित्रमंडळी शोधावी. आवडीच्या कार्या-विषयीं वाचन चांगलें व मूलगामी असावें. इतिहास व चालू राजकारण आणि जगांतील घडामोडी यांचीहि चाळणा करावी. त्यांत पक्षांधता नसावी. निःपक्षपातानें सर्व कांहीं पाहावें. विचार शांतपणें करावा. ऐकावें पुष्कळ. चांगलें स्वीकारावें पुष्कळ पण बोलावें थोडें.

आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट : कष्टाला कंटाळूं नये. मन व शरीर शहाणपणानें केलेल्या श्रमानें थकत नाहीं. मात्र मधून मधून कंटाळा वाटतो, त्या वेळीं कार्यांनंतर करावें. बागेचा छंद असला व तशी सोय असली तर अभ्यासिका सोडावी. काचा मारावा. खोरें कुदळ घेऊन बागेंत जावें. गायनाचा शौक असला तर आवडतें वाद्य घेऊन रमावें. असली कांहीं सोय नसली, दूर फिरण्यास जावें. लोकवस्तीपासून दूर, किंवा स्वतःच्या परिसरा-पासून दूर जावें, मनाचा उबग ओसरतो.

ज्या थोर पुरुषांचीं नांवें जगभर गाजलीं, त्यांची कार्य करण्याची व उरकण्याची शक्ति दांडगी असते. प्रख्यात अमेरिकन संशोधक एडिसन हा आपले प्रयोग करण्यांत गुंतला कीं, अठरा अठरा तास अविरत कार्यमग्न राही. अशा माणसांना कसलाहि थकवा जाणवत नाहीं. त्यांची बुद्धि, शक्ति व वृत्ति अत्युत्तम असते व तीं दीर्घायुषी असतात.

जवानांनीं असा अभ्यास ठेवावा. मनाला व शरीराला तसें वळण लावावें. आणि स्वतःच्या प्रगतीविषयीं जागरुक असावें.

## थोडा अभ्यास

१. साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकर यांचें वाङ्मयकार्य अवलोका. थोडें-फार वाचूनहि काढा.

२. अर्नोल्डो बेनटे कृत—How to live on 24 hours a day.

३. फ्रेंच लेखक अँड्रे मारवाँकृत—The Art of Living आणि चिनी पंडित लिन युटांगकृत—The Importance of Living हीं पुस्तकें पहा.

× × ×

*जो उत्तम गुणें शोभला । तोचि पुरुष महा भला ।*
*किती एक लोक तयाला । शोधीत फिरती ॥*

* * *

*विचारसूत्र अकरावें*

# जवानांचा संगतपरिवार आणि इतरेजन

तरुण मित्रांनो,

आपला जीवनधर्म समजून घेतांना आपण आतांपर्यंत जो कांहीं ऊहापोह केला; त्याचें सार असें आहे : माणसानें आपला उद्धार आपणच करून घेतला पाहिजे. आपलें जीवन यशस्वी होणें वा न होणें हें केवळ आपल्या कृतिवृत्तीवर अवलंबून आहे, इत्यादि.

वरील अनुमान बहुतांशीं खरें आहे यांत शंकाच नाहीं. तरी पण बाहेरच्या कांहीं उपाधी अशा आहेत कीं, त्यांचा प्रभाव आपल्या यशापयशाशीं फारच गुंतलेला आहे. अशांपैकीं एक उपाधी म्हणजे आपला संगतपरिवार होय.

माणूस ज्या संगतींत राहील व मिसळेल तसा तो बनत जाईल. या दृष्टीनें संगतीचा प्रभाव फारच दांडगा आहे. मनुष्य कितीहि स्वतंत्र बुद्धीचा व साक्षेपी असो, स्वतःभोंवतीं असलेल्या संगतीचा वास त्याला लागल्या-वांचून राहात नाहीं. म्हणूनच एका इंग्रजी सुभाषितांत म्हटलें आहे. " तुम्ही कोणत्या संगतींत राहतां-वागतां तें सांगा; म्हणजे तुम्ही कसें आहां हें सहज ओळखतां येईल. "

याचें कारण असें आहे.

आपण हें जाणतों कीं, कळप करून राहणाऱ्या सर्व प्राण्यांत माणूस हा अग्रगण्य आहे. यामुळें तो आपल्या कुटुंबाच्या बाहेरच्या माणसांतहि लौकर मिसळतो. समुदायांत राहणें त्याला स्वभावतःच आवडतें. जीवन सुरक्षितपणें जगण्यास तें आवश्यक आहे, याचीहि त्याला जाणीव आहे. इतरांनीं आपल्या संगतींत असावें व आपणहि त्यांची संगत करावी. आपले आचार-

विचार सारखे असावे. आपसांत त्यांची देवाण-घेवाण व्हावी आणि सर्वांनींच एकमेकाला सांभाळून न्यावें, ही सामाजिक नीतीहि माणसाच्या आतां अंगवळणीं पडली आहे.

या संगतिप्रीयतेबरोबर माणसाची आणखी एक उपजत प्रवृत्ति आहे. भोंवतालच्या माणसांचें अनुकरण करण्याची. मुलांचें बाळपण पाहावें. तें सर्व विषयांत वडील माणसांचें अनुकरण करीत वाढत असतें. मोठेपणींसुद्धां माणूस कळत न कळत इतरांचें अनुकरण करीत राहतो.

या पद्धतीनें एकूण जीवनांत माणूस एकमेकाच्या संगतींत राहून आपल्या आचाराविचारांचा प्रभाव इतरांवर पाडतो व इतरांचा आपल्यावर पाडून घेतो. यावरून व्यक्तीचें भलेंबुरें आचरण त्याच्या संगत परिवारावर अवलंबून आहे, हें उघड आहे. याकरितांच प्रत्येकानें जन्मभर सज्जन-संगतींत राहावें आणि दुर्जन संगतीपासून जास्तींत जास्त दूर असावें; हें नीतितत्त्व जगन्मान्य झालें आहे.

सुरळीत जीवन जगण्यास व बालपणापासूनच चांगलें वळण लागण्यास चांगली संगत फार आवश्यक आहे, हें ज्या मातापित्यांना कळतें; तीं आपल्या मुलांबाळांच्या संगतीविषयीं शक्य तितकी दक्षता घेतात.

वयांत आल्यानंतर संगतीविषयीं ही चिंता ज्याची त्यानेंच करावयाची असते. तरुण मंडळींनीं या गोष्टीचें ध्यान ठेविलें पाहिजे. आपण मोठे झालों आहों. बऱ्यावाइटाचा उलगडा आपल्याला सहज होतो. तेव्हां संगत कसली असली तरी आपल्याला डग नाहीं, अशा भ्रमांत राहूं नये. आपला संगत परिवार जरा पारखूनच घ्यावा.

मराठीं एक खेडवळ म्हण आहे : ‘ ढवळ्याशेजारीं बांधला पवळा; वाण नाहीं पण गुण लागला ! ’

माणूस या पद्धतीचा आहे. तरुण वयांतहि व्यक्ति शिक्षणालंकृत असो नसो–ती ज्या संगतींत राहील, तिच्या बऱ्यावाईट प्रभावांतून ती सुटणार नाहीं ! म्हणून ध्येयप्रवण अशा प्रत्येक तरुणानें पहिल्यापहिल्यांदा आपल्या संगतपरिवाराची चांचणी मधूनमधून अवश्य घ्यावी.

बऱ्यावाईट संगतीसंबंधीं असा विचार करितांना सध्यांची कालपरिस्थितीहि

लक्षांत घेणें योग्य होईल. मध्यंतरीं इंग्रजशाही होऊन गेल्यामुळें आमची समाजधारणा पार बदलून गेली असून आम्हांला नवी दृष्टि आली आहे. *एक नवी संस्कृति आपण निर्माण करीत आहों.* जातपात, धर्म, पंथ भाषा, आचारविचार, पोषाख व रीतिभाती इत्यादींचा संकर विलक्षण झाला आहे. ही उलथापालथ नगरांनगरांतून फारच स्पष्ट दिसते. इतरत्रहि या स्थित्यंतराचा प्रसार झपाट्यानें होत आहे. आपल्या संगती-असंगतीसंबंधीं विचार करितांना तरुण मंडळींनीं ही वस्तुस्थिति ध्यानांत घेणें योग्य होईल.

आपल्याभोंवतीं सहज पाहिलें तरी असें आढळतें कीं, सारा लोक-व्यवहार सापेक्ष आहे. व्यापारांत वस्तूवस्तूंचा किंवा पैसा व माल यांचा मोबदला होतो. यामुळें व्यापार सुसंगत चालतो, तसेंच व्यवहाराचें आहे. मार्गानें जातां-येतां आपण परिचित व्यक्तींना नमस्कार करतों किंवा स्मित करून ओळख पटवतों. ही एक प्रकारची देवाण-घेवाणच होय. संगत निवडण्यांत व ती चालू ठेवण्यांत आणि तींतून आपल्या कार्याकरितां साह्य मिळविण्यांत आपल्याला ही सापेक्षता लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

आपला जीवनधर्म आचरतांना आपल्यास इतरांच्या साह्याची व सहानु-भूतीची अत्यंत आवश्यकता आहे यांत शंकाच नाहीं. म्हणून आपला लोक-संग्रह स्वतःला झेपेल व आवश्यक असेल एवढा वाढवीत नेणें अंतीं सुज्ञपणाचें ठरतें. आतां हें जर खरें तर संगतीमध्यें येतील तीं माणसें आपंगून घेतल्या-वांचून गत्यन्तर नाहीं. मग अमुक माणसें चांगलीं. संगतीला योग्य. अमुक बरीं नाहींत, सारा बाजूला; असें आपल्यास कसें करतां येईल व निवड तरी कोणत्या आधारें करावयाची ?

उपाय एकच. संगतपरिवार आटोक्यांत राहील याची कलानुरूप व कार्यानुरूप दक्षता घ्यावयाची. मनुष्यस्वभावाचे नमुने व्यक्ति तितक्या प्रकृति न्यायानें अनेकानेक आहेत आणि त्यांत सर्वस्वीं चांगले व अगदीं वाईट अशीं टोकें नसतातच. चांगल्यामध्यें कांहीं वाईट व वाइटामध्यें कांहीं चांगलें असें मिश्रण सर्वत्र असतें. माणसाशीं जुळवून घेणें ती माणुसकी; अशी व्याख्या आपण मागें पाहिलीच आहे. तीच संगतपरिवार जमवितांना ध्यानांत ठेविली म्हणजे झालें.

हें झालें सामान्य विधान. पण कांहीं मानवी नमुने असे आहेत कीं, जे आपल्या संगतीमध्यें आल्यावांचून राहात नाहींत व त्यांना निवडून काढून बाजूला सारणेंहि आपल्याला शक्य होत नाहीं.

हे पहा ते नमुने :

**१. निंदक.**

या व्यक्तीला जगांत चांगलें असें कांहीं दिसत नाहीं. पुढाऱ्यांची, प्रतिष्ठित स्त्री-पुरुषांची, लहान-मोठ्या संस्थांची, एकंदर लोकव्यवहाराची आणि उरल्यासुरल्या जगाची उघड वा स्तुतिगर्भ निंदा करावयाची आणि आपल्या बोलण्यांत रंग भरायचा. या अशा मैफलींत तो स्वतःला व समोरच्या श्रोत्यांना भलीं माणसें म्हणून वगळतो. बाकीचें जग टाकाऊ !

**२. तोंडपुजे.**

नांवावरूनच यांची तोंडओळख होण्यास हरकत नाहीं. निंदकाच्या उलट यांचें बोलणें-चालणें. मात्र ते सर्वांची स्तुति करतील असें नाहीं. फक्त समोर असतील त्यांची स्तुति. भाषा मिठास व मतलबी. स्वतःकडे कमीपणा घेत दुसऱ्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवावयाचें. कारण असो नसो. तुम्ही त्यांचे देव असूं शकतां.

**३. विघ्नसंतोषी.**

इतरांचीं दुःखें, संकटें व अडचणी समाजांत असलेलीं वा नसलेलीं कुलंगडीं हा यांचा आवडीचा विषय. अमक्याचें नुकसान कां झालें? तो त्या लायकीचा होता म्हणून. तमक्याची बायकोवा मुलगी अशी कां आहे? डोळे मिचकावीत वाटेल तें बकायचें !—कोणी विशेष आजारी असला; या महाशयांच्या दृष्टीनें तो जगणें कठिण आहे असें भाकीत असायचें आणि त्याच्या कुटुंबाची पुढें वाताहत होणार हेंहि ठरलेलें असायचें. तात्पर्य, जगांत कांहीं मंगलकारक, कल्याणप्रद, हिताचें आहे हें त्यांना दिसायचें नाहीं.

**४. गप्पीदास.**

यांच्या संगतींत आल्यावर त्यांच्या बोलण्यांत कोणता विषय निघेल व त्यांतून कोणकोणत्या शाखा फुटतील याचा कांहीं नेम नाहीं.

या गप्पीदासांमध्यें दोन-तीन वर्ग आढळतात, पहिला वर्ग– कंटाळा आणणारे. दुसरा– बोलण्यांत रंगत आणतील, पण ठराविक विषयांची उजळणी फार. आणि तिसरा– दरवेळीं विषय नवा. अभिनययुक्त वाक्चातुर्य आणि स्वतःची प्रसंगोचित स्तुति वा निंदा करीत बैठकीला रंग भरणारे. वेळ कसा निघून जाईल याचें श्रोत्यांना भान राहणार नाहीं.

**५. उपद्व्यापी.**

वर सांगितलेल्या चारी प्रकारांचें मिश्रण या वर्गांत दिसून येतें. शिवाय ते इतरांच्या भानगडींत स्वतःला गुंतवून घेतात व संबंध असो नसो, नवे नवे उपद्व्याप शोधीत असतात. जगाचें भलें व्हावें व आपला उपयोग भोंवतालच्या माणसांना व्हावा ही त्यांची सदिच्छा. पण त्यांत खरेपणा कुठेंच नाहीं. यामुळें कधीं हे लोक निंदक तर कधीं स्तुतिपाठक; कधीं विघ्नसंतोषी तर कधीं थापेबाज अशा यांच्या भूमिका दिसतात! या असल्या लोकांची डाळ सहसा कुठें शिजत नाहीं. लोक त्यांना झिडकारतात, फजीत करतात, प्रसंगीं लाथाडतातहि. पण याचा स्वाभिमान कधीं जागा होत नाहीं. कधीं साधें शहाणपणहि यांना सुचत नाहीं. हंसण्यावारीं साऱ्या गोष्टी न्यावयाच्या व नवे उपद्व्याप शोधीत राहावयाचें!—असो.

उदाहरणादाखल हे पांच प्रकार सांगितले. यापलीकडेहि कांहीं प्रतवार आहे. धूर्त, कावेबाज, पाताळयंत्री, गळेकापू इत्यादि.

या सबंध मालिकेंतील मण्यांना सरकारी कायद्याच्या दृष्टीनें गुन्हेगार म्हणतां येत नाहीं. समाजकंटक असूनहि त्यांना शासन करतां येत नाहीं. निरुपायानें समाजपुरुष त्यांना आपल्या उदरांत रिचवून घेतो. पण या अनर्थापासून स्वतःचा बचाव करणें हें मात्र जवानांनीं चागलें जाणून असलें पाहिजे. आपल्या संगतपरिवारांत असले खडे गोटे नाहींत ना? याची देखभाल केली पाहिजे. फार आवश्यक गोष्ट आहे.

तरुण मित्रांनो,

वर सुचविल्याप्रमाणें स्वतःच्या संगतींत येणाऱ्या मंडळींची तुम्ही सहज व वरवर पाहणी केलीत तरी तुम्हांला आढळून येईल कीं, ज्यांची संगत हितावह तीं माणसें संख्येनें हाताच्या बोटांपेक्षांहि कमीच आहेत आणि वरच्या

यादीप्रमाणें खट्याळ लोकांचा भरणा मोठ्या प्रमाणावर आहे ! सोन्याच्या खाणीसारखा प्रकार. मातीचा ढीग पुष्कळ, सोन्याचे कण थोडे !

पण या विषमतेचा विषाद मानण्याचें कारण नाहीं, मानवी जीवनाची रचनाच तशी आहे, आपण तरी स्वभावगुणांमध्यें बावनकशी कुठें असतों. तेव्हां ही वस्तुस्थिति ध्यानीं घेऊन, जीवनपथ आक्रमावयाचा आणि आपल्या प्रमुख उद्दिष्टावरची दृष्टि ढळूं द्यावयाची नाहीं.

सर्वांचाच अनुभव आहे कीं, जीवन जगावयाचें म्हणजे अनेक लोकांचें साह्य घेतल्यावांचून पाऊल टाकतां येत नाहीं. मग ज्या तरुण मंडळींना कांहीं चांगलें उद्दिष्ट साधावयाचें आहे व स्वतःचा विकास पूर्णतेला न्यावयाचा आहे, त्यांना कोणाचा उपयोग कसा करून घेण्याचा प्रसंग येईल हें काय सांगावें ? तेव्हां अमुक माणसांची संगत नको म्हणण्यांत अर्थ नाहीं. संगत सर्वांची जोडायची. कारणापुरतें सख्यहि ठेवायचें, पण आपण फार पुढें जावयाचें नाहीं, आणि इतरांनाहि आपल्याभोंवतालीं आंखलेल्या वर्तुलाच्या आंत येऊं द्यावयाचें नाहीं, असा एक संकेत आपल्या मनाशीं ठरलेला असावा, तरच आपला निभाव लागेल. आपलें जीवन आपल्याला निर्वेधपणें जगतां येईल, अर्थात् असलें तुटक वागणें हा एक प्रकारचा स्वार्थच ठरेल, पण तो निरुपद्रवी राहील.

वर जी पंचकडी सांगितली, त्यांना स्वतःच्या वेळेची किंमत नसते. आणि त्यांनीं रंगविलेली बैठक आपण मान्य केली कीं, आपल्या वेळापत्रकाचा व ठरविलेल्या कार्यक्रमाचा बिघाड होतो. ही गोष्ट समंजस जवानांनीं लक्षांत घेतली पाहिजे आणि वर सुचविलेला स्वार्थ साधला पाहिजे.

कोणत्याहि कारणांनीं आपल्या संगतीमध्यें आलेल्या रिकामटेकड्या लोकांना आपण फार जवळ केलें, तर आपला बहुमूल्य वेळ वायां जातोच. शिवाय त्यांच्या संवादाचा गलिच्छ केरकचरा आपल्या मानसमंदिरांत येऊन पडतो. आपल्या विचारांना नको तें खाद्य मिळतें. आपल्या मनाचें चांचल्य उसळून वर येतें आणि आपला संयम डळमळतो !—ही आपली फार मोठी हानि होय. वेळेपरी वेळ जावयाचा आणि त्यांत आपलें स्वत्व दुर्बल व निकामी व्हावयाचें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32093 दि: 17.9.55
क्रमांक 3305 नों. दि. 2/2/56


' असंगाशीं संग नि प्राणाशीं गांठ ' म्हणतात तो प्रकार. तरुण मंडळींनीं फारच सावध राहिलें पाहिजे. संगत भली असो वा बुरी असो, तिच्याविषयीं आपण जागरूक राहणें फार आवश्यक आहे.

रिकामटेकड्या लोकांची संगत – समजा, आपण कांहीं युक्तीनें स्वतःला बाधूं दिली नाहीं, तरी तींत आपण फार गुंतलों तर ज्यांची संगत आपल्याला अत्यंत इष्ट असते, ते सुजन आपल्याविषयीं साशंक होतात, दुरावूं लागतात. ही गोष्ट आपल्या हिताची नाहीं. आपल्या सौजन्यानें व कार्यतत्परतेनें समाजांत प्रतिष्ठा पावलेल्या लोकांच्या मनांत आपल्याविषयीं गैरसमज न होईल याला प्रत्येक तरुणानें जपलें पाहिजे.

आणखी एक गोष्ट. आपल्या वेळापत्रकांत अकारण फरक पडला कीं, वेळेचा अपव्यय होतो आणि त्याबरोबर आजचें काम उद्यांवर ढकललें जातें. तें दामदुपटीनें पुढच्या दिवसाला सांठतें. मग त्यांत हलगरज होते. आणि ही टाळाटाळ आपल्या मनाला फार खाते. आपण स्वतःशींच फार लज्जित होतों. त्यामुळें अवश्यक व उपयुक्त संगत टाळण्याची इच्छा आपोआप निर्माण होते. आपला धीटपणा व मनमोकळेपणाहि बिघडूं लागतो.

हे सारे परिणाम टाळावयाचे तर आपल्या संगत-परिवारावर आपली देखरेख सारखी असली पाहिजे. याला उत्कृष्ट उपाय एकच. रिकामटेकड्या लोकांपासून आपला वेळ व कार्यक्रम न बिघडेल याला जपलें पाहिजे. अशा लोकांना दूर ठेवणें ही एक कला आहे. डांस-मच्छर-ढेकूण यांपासून स्वतःचें रक्षण करून आपण निद्रासुख भोगण्याकरितां मच्छरदाणीचा उपयोग करितों. धूपादि सुगन्धाचा धूर करून वातावरण शुद्ध करतों. तोच प्रकार संगतीमध्यें आचरावा. दुसऱ्याचें मन न दुखवितां नको असलेल्या माणसाला टाळणें हें फक्त सावधगिरीचें काम आहे. फारसें अवघड नाहीं. थोडी चतुरस्रता हवी.

आणि मानवी जीवनांत आणखी मौज आहे. वाइटाच्या आसपासच चांगलें असतें. फुलाबरोबर कांटे. आणि कांट्यांत फुलें. आपल्या संगत-परिवारांत हाच प्रकार आहे. आपले हितचिंतक, वेळीं उपयोगी पडणारे व आपल्याविषयीं पूर्ण सद्भाव बाळगणारे लोक या परिवारांतच दडलेले असतात. त्यांना आपण शोधलें पाहिजे व त्यांची मैत्री संपादन केली पाहिजे.

जवानींत व पुढच्या पुढच्या वयांत चांगला मित्र व त्याचें मित्रत्व ही एक महत्त्वाची व मोलाची आवश्यकता आहे, ही गोष्ट कोणीहि विसरूं नये. मात्र मित्राचें वर्तुळ फार फार लहान असावें. कारण, मित्रत्व हें एक श्रेष्ठ प्रतीचें नातें आहे. त्यांत रक्ताचा संबंध असेल वा नसेलहि. पण तें फार सापेक्ष आहे. . . .

मित्रत्व जोडणें व पाळणें यांत स्वतःवर फार मोठी जबाबदारी असतें. मित्रत्वांतहि सापेक्षता आहे. पण तिचा वेष व आत्मा निरपेक्षता आहे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

मित्रत्वाला प्रतिशब्द आहे : स्नेह = तेल !

जीवनयंत्र सुरळीत चालण्यास तेलाची केवढी आवश्यकता आहे, हें काय सांगायला हवें ?

## थोडा अभ्यास

*परोक्षे कार्यहन्तारं प्रत्यक्षे प्रियवादिनम् ।*
*वर्जयेत्तादृशं मित्रं विषकुम्भं पयोमुखम् ॥*

× × ×

*शुचित्वं त्यागिता शौर्यं सामान्यं सुखदुःखयोः ।*
*दाक्षिण्यं चानुरक्तिश्च सत्यता च सुहृद्गुणाः ॥*

* * *

१२२८७

*विचारसूत्र बारावें*

# जवानांच्या पौरुषाचा कस !

तरुण मित्रांनो,

आपल्या भोंवतालची सृष्टि व तिचा विकासक्रम यांचें सहज अवलोकन केलें तर मनांत असा एक विचार येतो कीं, ही एक प्रचंड प्रयोगशाला असून, तींत भरलेल्या पदार्थमात्रावर व मानवासकट सर्व प्राण्यांवर प्रयोगांवर प्रयोग चालू आहेत आणि त्यांचें मूल्यामूल्य ठरविलें जात असून त्यांच्या गुणधर्मांचा विचारकसहि पाहण्यांत येत आहे आणि त्यांची प्रतवार लाविली जात आहे.

इतर प्राणिजातामधून मनुष्य वेगळा काढण्यांत आला तो या पद्धतीनेंच असेल का ?—निश्चित काय सांगावें !—पण माणसाच्या बुद्धीची झेप आणि त्याची आजची विशाल प्रगति पाहिली म्हणजे मात्र मनांत येतें कीं, या विलक्षण द्विपादानें केव्हां तरी अति प्राचीन कालीं स्वतःच्या देहामनाची सहज पाहणी केली आणि सृष्टीच्या झगड्यांत आपला वरचष्मा कसा बसेल याचा विचार केला असावा.

काय घडलें असेल कोण जाणे ! एवढें अनुभवास येतें कीं, मनुष्यानें आदिमावस्थेमध्यें स्वतःवरच कांहीं प्रयोग केले, स्वतःला निकष लावून घेतला आणि त्यावरून त्यानें ठरवून टाकलें कीं, सृष्टींतील इतर लहान-मोठ्या व प्रचंड प्राण्यापेक्षां आपण देहानें एवढेंसें असलों तरी प्रतवारीनें आगळे आहों. वरचढ आहों. आपली श्रेष्ठता आपणच प्रस्थापित केली पाहिजे !

आणि असा विचार करून तो त्या उद्योगाला लागला. स्वतःवरच त्यानें प्रयोग चालविले ! पिढ्यामागून पिढ्या आल्या व गेल्या. पण आदि-

मानवानें प्रस्थापित केलेल्या स्वतःच्या श्रेष्ठतेची विचारधारा अखंड राहिली ! प्रारंभीं एवढासा वाटणारा झरा आज प्रचंड नदाचें स्वरूप पावला आहे !

नव्या पिढीला हीच परम्परा पुढें चालवावयाची आहे. त्यांना लाभलेलें भाग्य व भांडवल त्यांनीं पणास लाविलें पाहिजे. चालू शर्यतींत आघाडीवर राहण्याचा साक्षेप दाखविला पाहिजे.

चालू विचारसूत्र त्याकरितां आहे. जवानांच्या जीवनधर्माचा विचार एका निराळ्या दृष्टिकोनांतून केला आहे.

जवानांच्या पौरुषाचा कस कसा लागतो ?—विचार करूं.

जवानींतील पौरुष ! म्हणजे सोन्यांत सुगन्ध ! किंवा आपण मागें विचार केल्याप्रमाणें जवानी हें भाग्य आणि त्यांतील पौरुष ही त्याची तेजस्विता ! अर्थात् ही तेजस्विता प्रगट होणें हा पौरुषाचा खरा कस ! तरुणांनीं पुनः पुन्हा विचार करावा.

या संबंधांत निसर्गाकडे पाहिल्यास पौरुषाचा मुख्य हेतु : वंशपरम्परा चालू ठेवणें आणि व्यक्तीला हवें असलेलें देहाचें व इंद्रियांचें सौख्य मिळवून देणें हा आहे.

निसर्गाच्या या नियमानुसार मनुष्यप्राणी एवढ्यावरच तृप्त राहिला असता तर इतर जीवकोटीमध्यें व तो यांत कांहींच अन्तर राहिलें नसतें. पुच्छ-विषाणहीन असा तो द्विपाद पशूच राहता ! परंतु तसें घडलें नाहीं. केव्हां तरी फार फार मागच्या कालांत इंद्रियांच्या मागें असलेलें एक अगोचर सामर्थ्य – ज्याला आपण आतां मन म्हणतों — तें आपल्याजवळ आहे, याची जाणीव त्या कालच्या मानवाला एकाएकीं झाली असावी. नंतर याच स्थित्यंतरांतून आपल्या मनाला चालना देणारी बुद्धि नांवाची देवता आहे, याचा प्रत्यय त्याला आला असावा.

माणसाच्या मानसाचा हा थारेपालट केव्हांहि झाला असो आणि कोणत्याहि पद्धतीनें झालेला असो; आपणास एवढें म्हणतां येईल कीं, माणसाचें मानव्य असें प्रगट झालें व तो अन्य जीवमात्रापासून एकदम अलग झाला. तो विवेकपूर्वक सृष्टीकडे व स्वतःकडे पाहूं लागला. त्याचें जीवनमान वेगळें होऊं लागलें.

या विवेकजागृतीनंतर मनुष्याचें लक्ष आपल्या सुखदुःखाकडे गेलें. मग त्याच्या लक्षांत आलें कीं, इंद्रियांच्या द्वारें व पौरुषाच्या साह्यानें आपल्याला सुखें मिळतात. पण तीं क्षणभंगुर असतात. त्यांतून खरा आनंद किंवा शाश्वत समाधान लाभत नाहीं !

कां ? — कां ? — कां ? — हा प्रश्न त्याला सतावूं लागला. अगदीं एकाग्र मनानें त्यानें विचार केला. त्याला सुचलेले कांहीं उपायहि त्यानें करून पाहिले. प्रयोग करतां करतां त्याच्या बुद्धिदेवतेनें त्याला सांगितलें :

१. निसर्गाची व्यवस्था पाहतां वंशपरम्परा टिकविण्यास व इंद्रियाचें सुखोपभोग घेण्यास पौरुष फार थोडें पुरतें. तेव्हां तें अनाठायीं व अयोग्य प्रकारें उपयोगिलें तर तें व्यर्थ जातें व तो अपव्यय आपल्या सुखाला व स्वास्थ्याला बाधक होतो.
२. पौरुष हें मोठें तेज आहे. ऐश्वर्य आहे. अग्नीप्रमाणेंच तें विवेकपूर्वक वापरलें पाहिजे. अर्थात् त्याचा उपयोग अन्यत्र केला पाहिजे.
३. पौरुषाचें रूपान्तर पराक्रमांत केल्यास तें स्वतःस भूषणास्पद व इतरांना हितावह होतें. जीवन कष्टमय व कंटाळवाणें होत नाहीं.

स्वतःच्या पौरुषासंबंधीं माणसानें हा जो विवेक केला, त्याचा परिणाम काय झाला ?—कुटुंबसंस्था पक्क्या पायावर उभारली गेली. समाजाचें सामर्थ्य वाढलें. स्त्रीजाति सुरक्षित झाली व मानास्पद ठरली आणि माणसांतील पशुत्व झपाट्यानें कमी होत गेलें !

तरुण मित्रांनो, तुम्ही सुविद्य आहां. समंजस आहां. ध्येयप्रवण आहां. तुम्ही स्वतः शांतपणानें आणखी थोडा विचार केलांत तर पौरुषासंबंधीं वर जें सांगितलें, तें तुम्हांस सहज पटावें. स्वतःचें पौरुष मनुष्यानें स्वपराक्रमांत रूपान्तरित करणें हेंच जीवनधर्माचें सार आहे. कोणाहि थोर पुरुषाचें चरित्र पहा. त्यांत हेंच उत्तर सांपडेल.

आपल्या जीवनविकासांत गढून गेलेल्या जवान मंडळींना वरील ऊहापोह पुष्कळच उपयुक्त होईल असें वाटतें. आतां या संबंधांत आणखी थोडा निराळा विचार पुढें ठेवतों.

सध्यांच्या देश–काल–परिस्थितीचा विचार करतां खालीं देत असलेल्या तीन गोष्टी जवानांनीं आत्मीयतेनें लक्षांत घ्याव्या व त्या आचरण्यांत आणण्यास प्रामाणिकपणें झटावें. यामुळें त्यांचें पौरुष व पराक्रमशीलता यांचा सांधा बेमालूम जुळेल. त्यांचें चारित्र्य एकदम उठून दिसेल आणि समाजांत त्यांची प्रतिष्ठा उंचावेल.

त्या तीन गोष्टी येणेंप्रमाणें :

१. नारीजातीविषयीं अत्यंत आदर बाळगणें व त्यांची मानखंडना न होईल व त्या सुरक्षित व निर्भय होतील अशी परिस्थिति निर्माण करणें.

२. अन्यायपीडितांचा कैवार घेणें व त्यांना न्याय मिळावा म्हणून यथाशक्ति प्रयत्न करणें.

३. निःसाह्य अशा दुर्बलांना व परिस्थितीने वाकविलेल्या हताश मंडळींना हात देणें, त्यांना धीराच्या गोष्टी सांगणें व त्याचें जीवन सुस्थिर होईल याकरितां करतां येईल तें करणें.

उथळपणें विचार केल्यास या गोष्टी तुच्छ वा सामान्य वाटतील किंवा आपल्या आवांक्याच्या बाहेरच्या वाटतील. परंतु विवेकी तरुणांनीं दुर्लक्ष करूं नये. आत्महितार्थ त्यांचा विचार करावा.

आतां प्रथम पहिली गोष्ट विचारांत घेऊं.

आमच्या राष्ट्राचें व समाजाचें जें भयंकर व दुःसह अधःपतन झालें आहे. त्याला अवान्तर कारणें अनेकविध आहेत. पण त्या सर्वांत स्त्री-जाती-विषयींची आमची तुच्छ बुद्धि, त्यांच्याविषयींचा अनादर व अनुदारता हें बलवत्तर कारण आहे असें मला निश्चयपूर्वक वाटतें.

जवान मित्रांनो, तुम्हीहि या आरोपाचा न्यायबुद्धीनें व सहृदयतेनें विचार करावा. मनुष्य हा दोन जिवांचा एक जीव आहे, हें काय सांगावयाला पाहिजे ? म्हणजे स्त्री अर्धी. पुरुषहि अर्धाच. मग एका अर्ध्या अंगानें दुसऱ्या अर्धांगाला तुच्छ वा शून्यवत् लेखलें तर उभय अंगें विकल, सामर्थ्यहीन व निकामी होणार नाहींत काय ? सबलांपुढें–आडदांड वृत्तीच्या लोकांपुढें–आम्ही दुर्बल व भेकड ठरलों, दडपावें तितकें दडपलें गेलों किंवा

क्रियाशून्य झालों, तर त्याचा दोष कोणाकडे?—क्षणभर तरी प्रत्येकानें थांबावें आणि या वस्तुस्थितीचें मूळ पाहावें. लज्जेनें मान खालीं घालण्याचा प्रसंग येईल!

स्त्री सहज अधःपतित होते का? मुळींच नाहीं. अनेक पुरुषांची अधमता तिच्या मुळावर येते! इतर बध्ये तिची टवाळी करतात किंवा उदासीन राहतात! एकदम ती निराधार होते! मातींत लोळण घेणें एवढा एकच उपाय तिच्यापुढें असतो! बिचारी अबला!—पण ती अशी मातींत गेल्यावर काय होते? तिच्या निकटच्या पुरुषांचे पुरुषार्थ मातीमोल होतात! मग त्यांना कोणीहि लाथाडावें!—विशेष वर्णन करण्याचें कारण नाहीं. स्त्रीजाती-विषयींची आमची पिशुनता व केवळ तीमुळें आमच्या वांट्याला आलेलें अधःपतन सर्वत्र पसरलें आहे. आम्हांला त्याची खंत वाटूं लागेल तो सुदिन.

तेव्हां हा विषादकारक विचार आपण बाजूला सारूं व जरा डोळसपणें आपल्याभोंवतीं भरून राहिलेलें नारीजातीचें सोज्वळ व वंदनीय रूप पाहूं.

निरपेक्षभावानें आपल्या अपत्यांचें संगोपन करणारी व सदैव त्यांच्या कल्याणाची चिन्ता वाहणारी ही माता पहा. किंवा प्रेमाला प्रेम देणारी ही भगिनी, किंवा तुमचा संसार उभारून ढालीप्रमाणें तुमचें रक्षण करणारी कान्ता किंवा तुमचें हित चिंतून तुम्हांला धीर देणारी मैत्रीण, किंवा कोणत्याहि कलेची उपासना करणारी कलावंत किंवा समाजसेवेला वाहिलेली महिला, अशांपैकीं कोणतीहि भूमिका पत्करून ती निष्ठापूर्वक पार पाडणारी नारी पहा. आणि त्यांच्याशीं त्या त्या भूमिकेंतील पुरुष पहा, शांतपणा, एकनिष्ठा, कार्यमग्नता, कनवाळूपणा, ऋजुता इत्यादि गुणांत स्त्रीजाति थोडी तरी श्रेष्ठ आहे, असें दिसून येईल.

अर्थात् या तुलनेला व वर्णनाला अपवाद आहेतच. पण त्यांत स्त्रीची नैसर्गिक कोमलता, दुर्बलता, भीरुता व लज्जाशीलता लक्षांत घेतली पाहिजे. म्हणून पुरुषानें स्त्री ही वन्दनीय व रक्षणीय मानलीच पाहिजे. तिचा आदर केलाच पाहिजे.

आज आपण काय पाहतों?— समाजांत वा राष्ट्रांत आमची नारीजाति सुरक्षित नाहीं व निर्भयहि नाहीं! येथील पुरुषवर्गाला हें केवढें लांच्छन आहे?

तरुण मित्रांनो, तुम्ही याचा विचार केला पाहिजे. आणि मनाशीं कृतनिश्चय केला पाहिजे कीं, प्रत्येक स्त्री सुरक्षित व निर्भय राहण्याकरितां माझें पौरुष खर्ची पडलें पाहिजे. मी माझ्याकडून कोणाहि स्त्रीचा अनादर होईल, माझ्या आचाराविचारांनीं ती शंकाकुल वा भयभीत होईल किंवा ती हतबल होईल असें वागणार नाहीं आणि इतर कोणाला तसें वागूं देणार नाहीं.

जवानांनो, या धर्तीनें विचार करून तसें वागणाऱ्या तरुणांचीं जर पथकें तयार झालीं, त्या पथकांची दहशत नारीजातीविषयीं हीन व राक्षसीवृत्ति दाखविणाऱ्या अधमांना वाटूं लागली, तर तुमचेंच बल अनंत पटीनें वाढेल. आणि कर्तुमकर्तुम् असें तुम्ही व्हाल, यांत काडीमात्र शंका नाहीं.

नारी पुरुषाकडून प्रेमापेक्षांहि न्याय व रक्षण याची अपेक्षा करते. पण त्या बरोबरच ती आपल्या हृदयांतील वत्सलतेनें, नेत्रांतील तेजानें व फार धीराच्या अशा स्पर्शानें तुम्हांला हजार हत्तींचें बल देऊन तुम्हांला पुनीतहि करते ! हें वरदान फार मोठें आहे व त्याकरितां जवान मंडळींनीं नारीजातीचें रक्षण करण्याविषयीं तत्पर असलें पाहिजे. त्यांना योग्य ती मानवन्दना दिली पाहिजे. असो.

यापुढें दुसरी गोष्ट, अन्यायपीडितांचा कैवार !

नारीजातीच्या रक्षणाविषयीं ज्यांनीं पोक्त विचार केला व आपल्या जीवनक्रमांत तोहि विषय महत्त्वाचा मानला, त्यांना या दुसऱ्या प्रकरणांत आपलें पौरुष धसाला लावणें कठिण जाणार नाहीं. कारण, जवानांना अपमान सहन होत नाहीं. खोटे आरोप रुचत नाहींत आणि नालायक लोकांचा टेंभा सहन होत नाहीं. याचा अर्थ त्यांना स्वतःशीं झालेला अन्याय सहन होत नाहीं, असेंच नाहीं का ? मग त्यांना समाजांत आढळणारे अकारण अन्याय तरी कां सहन व्हावेत ?

याचा अर्थ असा मात्र नाहीं कीं, सदा त्याच भानगडींत गुंतायचें आणि अव्यापारेषु व्यापार करून हास्यास्पद वा पराभूत व्हावयाचें !–छेः ! तसें सुतराम नाहीं. अन्यायपीडितांचा कैवार वैयक्तिक असण्यापेक्षां सामाजिक असला पाहिजे म्हणजे त्यासंबंधीं संघटना करून प्रतिकार करणें सुलभ जातें यांतहि जवान मंडळींनीं प्रथम कांहीं काळ पुढाकार घेण्याच्या फंदांत पडूं

नये. कोणाचें तरी अनुयायित्व पत्करावें. अनुभव घेत शहाणे व्हावें पुढारी-पण आपण होऊन आपल्याकडे आलें पाहिजे. तें ओढून अंगावर घेतलें तर ? सारेंच ऑफस !

यापेक्षां अनुयायी होऊन अन्यायपीडन म्हणजे काय ? हें शिकावें. शिपाई होऊन हुकूम बजवावा. पौरुषाचा कस दाखवावा. या योगें किती तरी अनुभव मिळतील. सारासार विवेक करण्याचें साधेल. धीटपणाला धार चढेल आणि भोंवतालच्या जगाचा विश्वासहि बसत जाईल.

आतां तिसरी गोष्ट : निःसाह्याचें साह्य. बुडत्यास हात देण्याचा उपक्रम. स्वतःच्या जीवनविकासांत हा उपक्रमहि नीट ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें यथाशक्ति यथामति झटणें आवश्यक आहे.

*जितुकें कांहीं आपणासी ठावें । तें इतरां हळूहळू शिकवावें*
*शहाणे करून सोडावें । सकळ जन ॥*

या श्री समर्थांच्या सांगीप्रमाणें समाजांत वागावें. म्हणजे आपल्या जीवनाला व आचाराविचारांना बळकटी येते.

आपल्या भोंवतालच्या समाजांत अनेक लहान-मोठीं माणसें परिस्थितीनें गांजल्यामुळें मोठीं चिंतातुर, हताश, दुःखीकष्टी व किंकर्तव्यमूढ असतात. सर्वांना पैशाचेंच साह्य हवें असतें असें नाहीं. पुष्कळांना केवळ स्नेहत्वाचे व धीराचे दोन शब्द हवे असतात ! कोणी तरी आपल्याला अपंगावें व आपल्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवावा असें कांहींना वाटत असतें आणि कांहींना आपलें दुःख मोकळें करण्यास सहानुभूतिक कान व हृदय असलेला माणूस भेटावा असें वाटतें.

अशा वेळीं आपण काय करावें व कसें वागावें हा प्रश्न आर्त माणसें जवळ आल्यावर पडतो. आपण किती जणांचें ऐकणार ? त्यांत खऱ्या-खोट्याची व सोंगाढोंगांची पारख कशी करणार ? आणि प्रत्यक्ष असें काय करणार ? इत्यादि घोटाळा कोणालाहि पडेल ?

पण यांतहि जवान लोकांनीं गोंधळून जाण्याचें कारण नाहीं. माणसांची पारख करण्याचा अभ्यास करावा. प्रथम कांहीं काळ फसगत होण्याचा व आपल्या वेळेचा अपव्यय झाल्याचा अनुभव येईल; पण त्याला तोंड दिलें

पाहिजे. लोकप्रीति संपादन करण्याच्या ईर्ष्येंत फापटपसारा वाढवूं नये; पण अंतःकरणाची आर्द्रता कायम राखावी. जिथें खरी आर्तता आढळेल तिथें सर्व कांहीं ऐकावें. धीर द्यावा. ज्या बाबतींत आपण असमर्थ असूं ती प्रथमच स्पष्ट सांगावी. उगीच आशा दाखवूं नये. सडेतोड बोलून अंतःकरण दुखवूं नये. वाचेनें रसाळ असावें, पण त्याबरोबर अंतःकरणहि निर्मळ असावें.

## थोडा अभ्यास

**विद्या नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, व्यवस्थित आचरण, आणि गृहस्थिति** यांचा एकमेकांशीं जो नित्य संबंध असावा लागतो तो असल्याखेरीज राष्ट्रांतील विद्वान् लोक पुढारीपणा घेऊन राष्ट्राचा उत्कर्ष करण्यास पात्र होत नाहींत.

आपल्या कर्तबगारीनें व्यावहारिक उन्नतीहि आपण प्राप्त करून घेऊं असा निश्चित भरंवसा असतां मनोदेवतेस साक्ष ठेवून संकटें, विपत्ति, हाल-अपेष्टा सोसूनहि मी आपलें देशकार्याचें मनोगत पूर्ण करीन असें म्हणणारे पुरुषच खरे धीरपुरुष होत.

धैर्य हें ईश्वरदत्त देणगी म्हणण्यापेक्षां विचाराचें फळ आहे असें म्हणावें लागतें.

कोणत्याहि समाजाचा ज्यास पुढाकार घ्यावयाचा असेल त्यानें आपल्या एकनिष्ठपणानें, नीतिमत्तेनें, स्वार्थत्यागानें आणि समाजाच्या खऱ्या कळकळीनें समाजाचा विश्वास पहिल्यानें संपादन केला पाहिजे.

पुढचे पडले तर मागच्यांनीं आपलें कर्तव्य बजावणें यांतच खरें समाधान आहे — रडण्यांत नाहीं.

—[ लो. टिळकसूक्ति-संग्रहांतून ]

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32093 दि: 1-7-9६५
क्रमांक 9306 नों: दि: २५५८

*विचारसूत्र तेरावें*

# जीवनांत धर्मनिष्ठेचें महत्त्व

जीवनविकासांत धर्मनिष्ठेला महत्त्वाचें स्थान आहे. अन्नवस्त्रादिक जसें शरीरपोषणाला आवश्यक; तसेंच मनःस्वास्थ्याकरितां स्वधर्मपालन हेंहि अत्यन्त आवश्यक आहे. असें असतां सद्यःकालीं बहुसंख्य तरुण मंडळी धर्माविषयीं पूर्ण उदासीन दिसतात. समाजधारणेच्या दृष्टीनें ही मोठी शोचनीय अवस्था आहे, तेव्हां या विषयाकडे या मंडळींनीं आस्थेनें पाहूं लागावें, त्यासंबंधीं विचारहि करावा आणि देश–काल–परिस्थित्यनुरूप स्वधर्मनिष्ठेचें महत्त्व ओळखावें म्हणून हा लेखांक.

देवाधर्माविषयींची ही उदासीनता केवळ तरुण मंडळींतच आढळतें, असेंहि म्हणतां येत नाहीं. यासंबंधांत सर्वसाधारण समाजाची पाहणी करावी. सुबुद्ध समाजालाहि धर्म अडगळीवजा झालेला आहे, असें दिसतें. याचा अर्थ देवपूजा, धार्मिक आचार व इतर निष्ठा पार लुप्त झाल्या आहेत, असें म्हणणें नाहीं. बाह्योपचारी सर्व देखावा परंपरेला धरून चालला आहेच. पण त्यांत श्रद्धा व निष्ठा यांना ओहोटी लागल्याचें आढळतें. आणि कांहीं आचार-विचार – श्राद्ध-महालयादि–लुप्त झाल्याचें दिसतें. देवपूजाहि अनेकानेक कुटुंबांत दिसेनाशी झाली आहे. नियमानें देवदर्शनाला जाणाऱ्या पुरुष मंडळींची संख्याहि रोडावलेली आहे. या अवस्थेमुळें पुढील पिढीला स्वधर्मनिष्ठेचे पाठ कसें मिळणार ? आणि त्यांच्याकडून स्वधर्माचरण कसें होणार ? हा एक मोठा चिंतेचा विषय आहे. तरुण मंडळींनीं इकडे लक्ष दिलें पाहिजे, असें भारी मनांत येतें.

बरें; ही धर्माविषयींची उदासीनता व तीमुळें समाजधारणेला आलेला विस्काळितपणा केवळ भारत राष्ट्र व हिन्दूजाति यांच्यापुरताच मर्यादित

आहे का ?– नाहीं. जगांतील पुढारलेलीं राष्ट्रें व त्यांचे धर्म यांच्यासंबंधीं शोध घेतल्यास अगदीं आपल्याप्रमाणेंच तिकडेहि धर्मोपदेशक व समाजनेते तरुण मंडळींना धर्मनिष्ठा कशी पटवून द्यावी या विवंचनेंत पडल्याचें आढळतें.

यावरून धर्माविषयींची पूज्यता व ईश्वराविषयींची आस्तिक्यबुद्धि सबंध जगभर डळमळित झाली आहे, हें स्पष्ट दिसतें. आणि ही वस्तुस्थिति समाजधारणेच्या दृष्टीनें मोठी हानिकर आहे, असेंच राज्यसत्ताधारी, विद्वान् लोक व समाजधुरीण म्हणूं लागले आहेत. अर्थात् रशिया व त्याच्या तत्त्वज्ञानांत गुरफटलेले लोक याला अपवाद आहेत, हें विसरून चालणार नाहीं. भारतानें आपलें राष्ट्रब्रीद धर्मातीत ठरविलें आहे आणि या चमत्कारामुळेंच कीं काय कोण जाणें; आमच्या मांडीला मांडी लाविलेल्या जमातीची धर्मनिष्ठा परपीडनार्थच वाढलेली आहे असा दैवदुर्विलास पाहण्यास मिळतो. असो.

गेल्या शंभर वर्षांत पाश्चिमात्य शास्त्रज्ञांनीं व संशोधकांनीं अनेक प्रकारचे प्रचंड शोध लाविले. मानवजातीच्या हितार्थ मानवी शक्तीला व बुद्धीला मागें टाकतील अशीं यंत्रें व उपकरणें तयार केलीं; असाध्य रोग साध्य होतील अशीं नानाविध औषधें आणि माणसाचें आरोग्य व आयुर्मान वाढेल अशीं सत्त्वें निर्माण केलीं ! तात्पर्य, निसर्गावर अनेक बाजूंनीं मोठाच विजय मिळवला. तो एवढा प्रचंड कीं, विश्वाचें नियंत्रण करणारी ईश्वरी शक्ति व सत्ताहि चकित व्हावी !

मानवाच्या महान् विजयाची ही एक बाजू झाली. पण याच नाण्याची दुसरी बाजू किती भयानक आहे ! मानव्याला केवढी कलंकप्रद आहे ! अवघ्या पंचवीस वर्षांच्या अंतरानें दोन प्रचंड महायुद्धें झालीं ! अब्जावधि धन व कोट्यवधि माणसें मातींत गेलीं ! लाखों लाखों कुटुंबांची वाताहत झाली ! सबंध जग होरपळून निघालें ! आणि यांत लाभ काय ? जेताहि हैराण ! जितहि हैराण ! विजयाच्या दुंदुभि वाजल्या पण त्या, झालेल्या हाहा:कारापुढें पिपाण्या ठरल्या ! केलें काय नि झालें काय ?

दुसरें महायुद्ध संपून पंधरा-सोळा वर्षें झालीं ! जगांतील एकाहि राष्ट्राचा जम बसलेला दिसत नाहीं. मग तें राष्ट्र सधन असो वा भिकारी असो. सबल

असो वा दुर्बल असो; पुढारलेलें असो वा मागसलेलें असो; सर्वत्र बजबजपुरी माजलेली आहे. गुन्हेगारीला ऊत आला आहे आणि साधी माणुसकी लुप्तप्राय झालेली आहे.

आणि यांत मनाला थक्क करणारा चमत्कार म्हणजे बन्धुता, समानता आणि एकता यांचा गजर रंगमंचावर – आणि पडद्याच्या मागें सुरामारी-संबंधीचे नवे नवे प्रयोग! तूं तरी जगशील किंवा मी तरी जगेन अशा स्पर्धेचे! दैनिकें व साप्ताहिकें वाचणाऱ्या वाचकांना जगांतील सध्याच्या घडामोडीचें स्वरूप माहीत आहेच. या मंथनांतून कोणतें हलाहल निघणार आहे व त्याचा शेवट कशांत होणार आहे, हें काय सांगावें!

या वेळीं कोणाहि बहुश्रुत वाचकाला भगवद्गीतेंतील पहिल्या अध्यायांतच अर्जुनानें स्पष्ट करून सांगितलेले युद्धाचे परिणाम किती भयानक व अधोगतीचे असतात, याचें स्मरण झाल्यावांचून राहणार नाहीं. त्याचें मन अत्यंत खिन्न व चिन्तातुरहि होईल.

युरोप-अमेरिकेंतील सर्व विचारवन्त, शास्त्रज्ञ व सर्वभूतहितरत स्त्री-पुरुष या परिस्थितीकडे पाहून मोठे अस्वस्थ झाले आहेत व यांतून मार्ग कसा काढावा व जगांत शान्तता व सुव्यवस्था कशी प्रस्थापित करावी, याचे उपाय शोधीत आहेत.

पण या दुःस्थितीचीं कारणें शोधतांना बहुतेक सर्वांना असें मनोमन पटलें आहे कीं, भौतिक सुधारणांचा उच्चांक गांठतांना आपलें धर्माचें अधिष्ठान नामशेष झालें आहे. ईश्वराचें अस्तित्व सुखवादाच्या धुंदींत पायातळीं तुडवलें गेलें आहे! आणि अध्यात्माची भूमिका आपल्याला राहिलेली नाहीं! भोंवतालीं पसरलेल्या साऱ्या अनर्थांचें मूळ हें आहे.

आणि या दृष्टीनें त्या त्या राष्ट्रांतून समाजांत धर्मनिष्ठा वाढावी म्हणून नवें आंदोलन सुरू झालें आहे. ख्रिस्ती धर्माचा संस्थापक जीजस ख्राइस्त याच्या चरित्रावर शेंकडों ग्रंथ नव्या दृष्टीनें लिहिले जात आहेत, टेन कमांडमेन्टस्-सारखे चित्रपट निघत आहेत आणि बायबलची शिकवण देणारीं पुस्तकेंहि भरपूर प्रकाशित होत आहेत.

मग आम्ही हिन्दवासियांनीं इकडे दुर्लक्ष कां करावें? राज्यशासन-प्रणालींत आम्ही त्यांचें अनुकरण केलें आहे. भौतिक सुधारणा व सुखवाद

यांचेहि धडे आम्ही त्यांच्याकडे पाहत गिरवितों आहों आणि एकंदर समाजरचनाहि त्यांच्या वळणावर नेण्याचा आमचा अट्टाहास चालू आहे. मग आम्ही त्यांनीं विचारपूर्वक ठरविलेल्या धार्मिक आंदोलनाकडेहि राष्ट्रीय दृष्ट्या कां लक्ष देऊं नये ?

तरुण मित्रांनो, आपण नको का लक्ष द्यावयाला ?

मला माहीत आहे. यावर तुम्हांपैकीं अनेक प्रामाणिकपणें म्हणतील : देवाधर्मावरील आमचा विश्वास साफ उडाला आहे. तुमचें वरील लिहिणें रास्त असलें तरी आमच्या जागृत बुद्धीला व नव्या विचारप्रणालीला मुळींच पटण्यासारखें नाहीं. आम्ही नीतिशास्त्र जाणतों व समाज धारणे-करितां त्याची आवश्यकता आहे. हें आम्हांला मान्य आहे. पण तो तुमचा देव, त्याच्याभोंवतीं असलेला धर्म आणि श्रद्धा किंवा निष्ठा नाहीं पटत आम्हांला. व्यक्तीच्या व राष्ट्राच्या अभ्युदयाला देवाधर्माची आवश्यकता आहे, ऊं हूंः ! केवळ भोळीभाबडी समजूत आहे ती. रशियाकडे पाहा. देव, धर्म, देवळें बायबल या साऱ्या बुजगावण्यांना त्यांनीं पूर्ण डच्चू दिला आहे ! तीस-पस्तीस वर्षें झालीं आहेत या प्रयोगाला ! रशियाचें काय वाकडें झालें आहे. यांत उलट सबंध जगांत एक बलाढ्य अग्रेसर राष्ट्र म्हणून त्याची कीर्ति गाजत आहे. मग देवाधर्माभावीं आम्हांलाहि तोच अनुभव कां येऊं नये ?

या सडेतोड विचारांचा प्रतिवाद करण्याचें हें स्थल नव्हे. या प्रबंधाच्या रचनेंत त्याची आवश्यकताहि नाहीं. उत्तरार्थ आम्ही एवढेंच म्हणूं कीं, रशियाचा अभ्युदय अभूतपूर्व आहे यांत कांहींच शंका नाहीं. पण या अद्भुततेपलीकडे रशियांतील सामान्य जनतेचें जीवनमान व आयुष्यक्रम कसा चालला आहे, याची पूर्ण व खरी ओळख बाह्य जगताला फारशी कळत नाहीं; हा लोकप्रवाद जगभर प्रसिद्ध आहे. तेव्हां या ढालीची दुसरी बाजू कोणत्या धातूनें मढवलेली आहे हें आपण काय सांगणार ? व त्यासंबंधीं तर्कवितर्क तरी काय करणार ?—— पण मानवी स्वभावधर्म लक्षांत घेतां एवढें निश्चित वाटतें कीं, परमेश्वराविषयींची आस्तिक्यबुद्धि व तिच्या पोटीं असलेली धर्मप्रवणता ही माणसाच्या पिंडांत—रक्ताच्या कणाकणांत—भिनलेली आहे आणि ती तेथून उपटून काढून समूळ नाहींशी करणें कोणत्याहि राज्यसत्तेला शक्य नाहीं. यासंबंधीं असें ऐकण्यांत येतें कीं, रशियांत सार्वजनिक

चर्चेस् नाहींशीं झालीं आहेत; पण खाजगी तऱ्हेनें बायबल वाचणें व प्रार्थना करणें याची मुभा देण्यांत आलेली आहे !

एवढ्यापुरता हा विषय आपण इथेंच सोडूं आणि आमच्या जवानांच्या जीवनक्रमांत आस्तिक्यबुद्धि व धर्मश्रद्धा कां असली पाहिजे; हा विचार पुढें चालवूं.

सध्यांच्या तरुण मंडळींमध्यें देवाधर्माविषयीं जी अश्रद्धा किंवा उदासीनता आढळते, ती केवळ चालू–( कलि ) युगाचा परिणाम आहे असें नव्हे. फार प्राचीन कालापासून " देवधर्म सब झूट है ! " म्हणणारीं माणसें निघालीं. तोच प्रकार आज आहे व पुढच्या काळांतहि ही नास्तिकवादी परंपरा चालू राहणार आहे.

दुर्योधनाचे उद्‌गार पहा :

*जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः ।*
*जानामि पापं न च मे निवृत्तिः ।*
*केनापि देवेन हृदिस्थितेन ।*
*यथा नियुक्तोऽस्मि तथा करोमि ॥*

वरील उद्‌गारांतील पहिल्या दोन ओळी अगदीं बेछूट आहेत. पण पुढच्या दोन ओळींत मनुष्यमात्रांत आढळून येणारी द्विधा वृत्तीहि आहे. हृदयांत वसणारा परमेश्वर माणसाला सहज उखडून टाकतां येत नाहीं. आज ' देवधर्म नाहीं ' म्हणून वागणारीं माणसें उद्यां देवपूजेला लागल्याचीं उदाहरणें कांहीं थोडीं थोडकीं आढळत नाहींत. याचा अर्थच हा कीं, सर्वसामान्य व्यक्तीला नास्तिकपणा झेपण्यासारखा नसतो व अश्रद्धा ही तिची सहजप्रवृत्ति नसते. धर्मनिष्ठा व आस्तिक्य बुद्धि ही मनुष्याला अन्नवस्त्रा-इतकीच आवश्यक आहे, असें वर म्हटलें आहे तें याकरितां.

तेव्हां तरुण मंडळींनीं आस्तिक्यबुद्धीचें महत्त्व ओळखून ईश्वराचें अस्तित्व देवधर्म व त्यांच्यावरील श्रद्धा यांविषयीं घरांतील वडील माणसांचें म्हणणें नीट ऐकून घ्यावें व शंकानिरसनार्थ थोर थोर लोकांचें सांगणें काय आहे

याचा शोध घ्यावा. तसल्या ग्रंथांचें वाचनहि करावें. त्यांच्या जीवनाला चांगलें वळण लागण्यास याचा चांगला उपयोग होईल.

ईश्वराचें अस्तित्व व त्याच्याभोंवतीं असलेलें पूजन-स्मरणादिकाचें वलय ही गोष्ट सहजीं निघालेली नाहीं. फार प्राचीन कालापासून तपोनिधि अशा ऋषीमुनींनीं एकाग्रचित्तानें हे शोध लाविलेले आहेत आणि लोककल्याणाची चिंता वाहणाऱ्या सन्तामहन्तांनीं त्यांना दुजोरा दिलेला आहे.

विचारी माणसानें ईश्वराची सत्ता मानण्यांत व श्रद्धापूर्वक त्याचें भजन-पूजन करण्यांत त्याला कसलाहि कमीपणा नाहीं. उलट, जीवन यशस्वीपणें जगण्याचीं जीं अनेक साधनें आहेत, त्या सर्वांत श्रेष्ठ व अमोघ साधन देवधर्मनिष्ठा हें आहे. विद्यमान जगांतील सारे श्रेष्ठ लोक, एडिसन्, आइन्स्टीन यांसारखे अतुल बुद्धीचे संशोधक ईश्वरनिष्ठच होते व आहेत. मग त्यांच्या मागोमाग जाण्यांत आपल्याला कमीपणा कसला ?

आतां हें मान्य आहे कीं, नास्तिकवाद व तशा पंडितांची परम्परा आजहि चालू आहे; पण तो मार्ग एकांडे शिलेदारांचा आहे. सर्वसाधारण माणसांना तो झेपण्यासारखा नाहीं व अनुसरण्यासारखाहि नाहीं.

एवढा ऊहापोह केल्यानंतर मला वाटतें जवान मंडळींना देवधर्मनिष्ठा आकलन होण्यास अडचण पडूं नये. पण आणखीहि एक अगदीं जवळची साक्ष पाहूं.

तरुण मित्रांनो, जरा स्वस्थ बसा आणि स्वतःच्या हृदयांतच डोकावून पहा. प्रामाणिकपणें शोध घ्या. काय आढळेल !—देवा-धर्माविषयींची आपली श्रद्धाहीनता व बेछूट वृत्ति अगदींच तकलुपी आहे ! शंका वाटते ? स्वतःवर संकट आल्याचा प्रसंग ध्यानांत आणा किंवा एखाद्या त्रासदायक अडचणींत सांपडल्यावर मन कसें बावरून गेलें, तें आठवा. त्या कालीं तुम्ही दीन झाला कीं नाहीं !—त्या स्थितींत–आपल्याला कोणी तरी सांभाळून घ्यावें, मार्ग दाखवावा. कोणी तरी तारक व्हावें; अशीच आतुरता तुमच्या मनाला वाटली कीं नाहीं ? त्या वेळीं तुम्ही आईप्रमाणेंच देवाला हांक मारलीत कीं नाहीं ? पाप-पुण्याचा विचार तुम्हांला सुचला कीं नाहीं ? आणि श्रद्धा तुम्हांला चाटून गेली कीं नाहीं ?—निःसंशय या स्थितींतून

तुम्ही जातां. व्यक्तिमात्राचा हा नित्याचा अनुभव आहे. मग प्रसंग पडल्यावर देवाच्या नांवें टाहो फोडण्यापेक्षां व तेवढ्यापुरती श्रद्धा वा निष्ठा दाखवण्यापेक्षां आपल्या नित्याच्या जीवनांत या गोष्टी गुंतवून घेतल्या तर ?— आपण जास्त निर्भय व निश्चित नाहीं का राहणार ?

वरील विवेचनावरून कोणी अशी अटकळ करूं नये कीं, आतां आपल्यास स्नानसंध्या करण्याचा व देवदेवतार्चनांत काळ घालविण्याचा पाठ मिळणार आहे. तसें मुळींच नाहीं. नव्या कालाला अनुरूप असें धर्माचरण व धर्मनिष्ठा हवी तरच ती फलदायी होईल. या दृष्टीनें आपला सनातन धर्म प्रगमनशील आहे. लवचीकहि आहे त्यांत. कसलाहि आग्रह नाहीं. कोणत्याहि कालाला पुरून उरेल असें त्यांचें स्वरूप आहे.

१. " परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् " ही त्याची पापपुण्याची व्याख्या आहे. २. " कोणाहि जिवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचें ।। " हें त्यानें ईश्वरपूजन सांगितलें आहे. ३. अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ त्याचे गळांमाळ असो नसो ।। हें त्याचें व्रताचरण आहे.

आपल्या धर्मानें अगदीं थोडक्यांत दर्शविलेली ही रूपरेखा सुविद्य मनाला चटकन् पटण्यासारखीच आहे; नाहीं का ?—आणि या रीतीनें धर्मनिष्ठ राहणें सध्यांच्या कालांतहि सुलभ आहे; नाहीं का ? जवनांनीं अवश्य विचार करावा.

हें स्पष्ट आहे कीं, वरील चिमुकलें विवरण थोडें उच्च पातळीचें आहे. पण सध्याचें युगमान ठेंगणें कुठें आहे ? आकाशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न आम्ही करतों आहों. त्या उंचीवरून आपण पाहिलें पाहिजे आणि तरतम भावानें जीवननिष्ठेला धर्मनिष्ठेची जोड दिली पाहिजे.

मात्र यालाहि थोडा धार्मिक अभ्यास हवा. तरुण मंडळींनीं फावल्या वेळेचें जें वेळापत्रक आंखलें असेल, त्यांत आपला सनातन धर्म, आपली संस्कृति व आपलें अध्यात्म यांच्यासंबंधीचें ग्रांथिक ज्ञान संपादन करावें. यासंबंधांत आपल्या राष्ट्रानें कमींत कमी दहा सहस्र वर्षांचें आयुष्य भोगलें आहे. चक्रनेमीक्रमानें भाग्याभाग्याचे अनेक चढउतार पाहिले ! आणि बौद्ध महम्मदीय आणि खिस्ती अशा तीन धर्मांशीं व संस्कृतींशीं टक्कर देऊन अद्याप तो स्वत्व टिकवून आहे !—कां ? आपल्या धर्माचें अधिष्ठान त्याच्या

पायांत आहे. हा पोकळ अभिमान नव्हे. ऐतिहासिक सत्य आहे. आम्हांला हें रुचलें पाहिजे, पचवितां आलें पाहिजे !

श्रीभगवद्गीता हा आमचा सर्वश्रेष्ठ असा धर्मग्रंथ ठरलेला आहे. त्यांत जीवनव्यवहाराचें व परमार्थाचें असें उभयविध शिक्षण आहे. जवानांनीं रोजच्या पठनांत गीता ठेवावी. एके दिवशीं एक अध्याय शांतपणें व एकाग्रमनानें वाचण्याचा संकल्प असावा. या निष्ठेनें त्यांचा जीवनोत्साह टिकून राही. कर्तव्याकर्तव्याचा उलगडा पडेल आणि कार्यप्रवणता वाढत राहील.

याशिवाय श्री रामदास-तुकारामादि सन्तांचें वाङ्मय वाचनांत असावें. कुलाचार व कुलधर्म समजून घ्यावे. प्रत्यहीं प्रातःकालीं उठतांच, भोजनाचे वेळीं आणि झोंपतांना कांहीं नामस्मरण असावें. परमेश्वराची करुणा भाकावी आणि जीवन यशस्वी होण्याचें वरदान मागावें. मनाला व शरीराला वळण लागेपर्यंत या गोष्टी अवघड वाटतील. पुढें तें आचरणांत आपोआपच भिनेल.

आणि यांतच तुम्हांला प्रत्यक्ष परमेश्वराचें रूप पाहावेंसें वाटेल नाहीं का ?–भोंवतालचें मानवी जीवनच कौतुकानें पाहण्याचें ठरवा. मिळेल तो बोध घ्या. देवाचें अस्तित्व व पानें, फुलें यांतील रंग, रूप, विविधता अवलोका. मन प्रसन्न होईल. नेत्रेन्द्रिय लाभल्याचा आनंद होईल ! ईश्वराची लीला सहज प्रतीत होईल. आणि मग ती रानावनांत, पर्वतराजींत व खाली-वर पसरलेली निसर्गदेवीची आरास पहा !

हीच चालू कालांतील देवपूजा व धर्मनिष्ठा. जवानमित्रांनो यांत समजण्यास दुर्बोध व आचरण्यास कठिण असें काय आहे !—सांगा पाहूं.

## थोडा अभ्यास

खालील ग्रंथ वाचा व त्यांवर मनन करा.

१. अले. कॅरोल कृत : MAN. The Unknown.

२. लोकमान्य टिळकांचें : गीतारहस्य तथा कर्मयोगशास्त्र.

३. ( हिन्दी ) " संस्कृति के चार अध्याय "

लेखक–श्री रामधारी सिंह ' दिनकर. '

× × ×

*सुखदुःखे समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।*
*ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यासि ॥*

× × ×

*प्रसादे सर्व दुःखानां हानिरस्योपजायते ।*
*प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवातिष्ठते ॥*

* * *

# समारोप

※

## असें हें जीवन !

स्वतःच्या अंगीं जेवढा पुरुषार्थ असेल, तेवढाच अर्थ जीवनांत दिसेल.

जग विशाल आहे. तसें जीवनहि आहे. व्यक्ति बिन्दुमात्र आहे. पण आपण आहों म्हणून जग आहे असें व्यक्तीला वाटतें. बिन्दु पुसला गेला तर जग संपलें, हा भास. जग व जीवन चालू राहातें. म्हणून कविश्रेष्ठ केशवसुत म्हणतात :

प्राप्तकाल हा विशाल भूधर ।
सुन्दर लेणीं तयांत खोदा ! !

हिन्दी कवि नझीर म्हणतो :

यह कलिजूग नहीं करजूग है ।
इस हाथ दे उस हाथ ले ॥
चार दिन की चांदणी फिर अंधेरी रात है ! !

कबीर म्हणतात :

काल करै सो आज कर, आज करै सो अब्ब !
पल में परलै होयगी बहुरि करेगा कब ?

[ उद्यां करणार तें आजच कर. आणि आज करायचें तें आत्तांच कर. क्षणांत प्रलय होण्याचा संभव. मग केव्हां काय करणार ? ]

× × ×

तीन तपें : शरीराचें. मनाचें. वाचेचें.
शरीराचें : उत्तम आरोग्य. स्वच्छता. योग्य आहार-विहार.
मनाचें : आचार-विचार उच्चार यांत एकवाक्यता.
वाचेचें : बोलणें थोडें, मधुर, शांत व मृदु.

× × ×

कविवर्य टिळक म्हणतात :

खरोखर लोकमित्र ते ।
जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा देव न ठावा ।
प्रेम आणखी देव दिसावा ।
एक सदा ज्यातें । खरोखर लोकमित्र ते ! ॥

× × ×

कवि मोरोपन्त यांची आकांक्षा :

सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो ।
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ॥
न निश्चय कधीं ढळो, कुजनविघ्नबाधा टळो ।
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्त मार्गीं वळो ॥

तुमची-आमची आकांक्षा हीच असली पाहिजे, नाहीं का ?

* * *

## प्रार्थना

*असतो मा सद्गमय ।*
*तमसो मा ज्योतिर्गमय ।*
*मृत्योर्मा ऽमृतं गमय ।*

[ मला नश्वरांतून शाश्वताकडे ने. अज्ञानांतून ज्ञानाकडे ने मृत्यूपासून अमृताकडे ने. ]

*समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।*
*समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥*
*यथा वः सुसहासति ॥*

[ तुमचा अभिप्राय एकसारखा, तुमचीं अंतःकरणें एकसारखीं व तुमचें मन एकसारखें असो. जेणेंकरून तुमचें सुसाह्य म्हणजे संघशक्ति बळकट होईल. ]

★ ★ ★

## परिशिष्ट

# चरित्र-ग्रंथांचें वाचन

थोर व सुप्रसिद्ध अशा लोकांची संगत आणि आदरणीय गुरुजनांचें मार्गदर्शन ज्या तरुण मंडळींना मिळालें असेल ते मोठे भाग्यवान्. त्यांचा जीवन-विकास सुलभतेनें घडत जातो, यांत शंका नाहीं. पण सर्वांनाच अशी सज्जन संगत व मार्गदर्शन मिळणें शक्य असतेंच असें नाहीं. तेव्हां अशा एकाकी जवानांनीं ही उणीव कशी भरून काढावी ?

ग्रंथ-वाचनानें. विशेषेंकरून चरित्र-ग्रंथाच्या वाचनानें. या दृष्टीनें ग्रंथ कोणाहि व्यक्तीचे मोठे कल्याणकारी आप्त आहेत यांत तिळमात्र शंका नाहीं.

सज्जनांची संगत व गुरुजनांचें मार्गदर्शन असें दुहेरी कार्य साधून देण्यांत ग्रंथांची महती अनन्यसाधारण आहे. मात्र या संबंधांतहि जसा शिष्य भेटेल, तसा गुरूचा प्रसाद शिष्याला लाभेल ही गोष्ट कोणीहि विसरूं नये. कबीर याविषयीं म्हणतात :

*सिख तो ऐसा चाहिये, गुरु को सब कुछ देय ।*
*गुरु तो ऐसा चाहिये, सिख से कुछ नहिं लेय ॥*

[ शिष्य कसा असावा ?—गुरूला सारें कांहीं देऊन टाकणारा. तन-मन-धन. वेळीं प्राणहि ! आणि गुरु कसा असावा ? शिष्यापासून कशाचीहि अपेक्षा न करणारा ! ]

अर्थ स्पष्ट आहे. शिष्यानें गुरूच्या शिकवणीशीं अगदीं तन्मय व्हावें. आणि गुरूनें स्वतःला माहीत असेल तेवढें ज्ञान शिष्याला देऊन टाकावें. कसलीहि अपेक्षा न ठेवतां !

चांगले चांगले ( विशेषेंकरून चरित्र- ) ग्रन्थ या दृष्टीनें किती अपूर्व

आहेत हें काय सांगायला पाहिजे?—जवानांनीं याकरितां निवडक ग्रन्थांचें वाचन एकाग्रतेनें करावें. मात्र, असल्या वाचनाला प्रथमपासूनच कांहीं रीत असावी. चरित्रें वाचण्याचीच गोष्ट घ्या. हातासीं येईल तें वा ज्याचा गाजा-वाजा झाला असेल तें चरित्र वाचावें असें मुळींच नाहीं. आपल्या जीवनास उपयुक्त होतील व देश-काल-परिस्थितीचा नीट उलगडा पडेल अशा चरित्र-ग्रन्थांचें वाचन करणें हिताचें आहे.

या दृष्टीनें संबंध मानवजातीच्या धारणेकडे लक्ष दिल्यास असें आढळून येतें कीं, मोठमोठे धर्मसंस्थापक व साधुसंत यांनीं आपआपल्या समाजांना मार्ग-दर्शन करण्याचें व त्या त्या जातींना अज्ञानावस्थेंतून सज्ञानावस्थेंत आणण्याचें कार्य मोठ्या प्रमाणावर केलें आहे. आणि या त्यांच्या प्रयासांनीं मानवी जीवनाचा कायापालट कल्पनातीत झालेला आहे.

उदाहरणार्थ : श्रीकृष्ण, गौतमबुद्ध, झरतुष्ट्र, येशू ख्रिस्त, महम्मद पैगंबर व कानफ्युशियस यांचीं चरित्रें पाहावीं. गेल्या तीन-चार सहस्र वर्षांत सबंध भूगोलावर झालेल्या घडामोडी व त्यांचा इतिहास आपल्याला सहज कळेल. याविषयीं विद्यानिधि चित्रावशास्त्री यांच्या चरित्र-कोशांत एक मार्मिक वाक्य आलें आहे, तें असें : चरित्रकोशकर प्रस्तावनेंत म्हणतात —

"इतिहास हा बहुंशानें व्यक्तिचरित्रमय असतो. किंबहुना जगांत इतिहास असा कांहीं नसून जग म्हणजे एक मोठा चरित्रकोशच होय!"

वर निर्देशिलेलीं धर्मसंस्थापकांचीं चरित्रें वाचावीं व तत्कालीन जगाचा इतिहास पाहावा. म्हणजे चरित्रकोशकारांचें म्हणणें किती सार्थ आहे, हें ध्यानीं येईल.

सध्यां मानवजातीला जें ज्ञान लाभलेलें आहे व ज्यामुळें बुद्धिमान मानव हा प्रतिपरमेश्वर बनलेला आहे, यांचें सर्व श्रेय इंग्लंड-अमेरिका, जर्मनी व रशिया इत्यादि देशांतील भौतिक शास्त्राचे मोठ मोठे शोधक व पंडित यांच्याकडे जातें यांत शंकाच नाहीं. युरोपांतील या जागृतीची, शास्त्रीय शोधांची व प्रगतीची परंपरा पाहूं लागल्यावर कमींत कमी तीनशें लोकांचीं चरित्रें दृष्टिपथांत येतात. पण यांतहि कांहीं प्रमुख टप्पे आहेत. आणि यांचा इतिहास पांचशें वर्षांचा तरी आहे.

या पांचशें वर्षांच्या कालांत आपल्या भारतांत इतर ज्ञानोपार्जन वा शास्त्रीय संशोधन अगदींच झालें नाहीं असें नाहीं. पण युरोपांत ज्ञानाची जी प्रभात होती, ती आमच्या राष्ट्राची संध्याकाळ होत आली होती असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. व्यापारी उलाढालींत भूतकालापासूनच भारताचा संबंध बाह्य जगताशीं दूर दूरपर्यंत होता, ही वस्तुस्थिति इतिहास सांगतोच आहे. पण या मोठ्या व्यापांत आम्ही भारतवासियांनीं इतर राष्ट्रांना कांहीं निरनिराळें ज्ञान निःसंशय दिलें; पण बाहेरच्या जगांत ज्ञानार्जनाची, शास्त्रीय शोधांची व इतर अनेक सुधारणांची जी वाढ होत होती, तिकडे आम्ही मुळींच लक्ष दिलें नाहीं. म्हणजे युरोपखंड जागें होऊन पुढच्या महान् उद्योगाला लागलें आणि आम्ही भारतीय आहे त्यांत संतोष मानून पथारी पसरली व हळूहळू झोंपीं गेलों !

पांचशें वर्षांपूर्वींची युरोपांतील जागृति पहा. याचें श्रेय दोन-तीन व्यक्तींना आहे. हीं माणसें विद्वानांत मोडणारीं नव्हेत. पण अत्यंत जिज्ञासु, शोधक बुद्धीचीं, महत्त्वाकांक्षी, धाडसी व प्राणावर उदार होऊन झगडणारीं अशीं होतीं. तीं माणसें हीं—

१. **कोलंबस** : इ. स. १४९२ ते १५०५—यानें तीन तपें एका गोष्टीचा ध्यास घेतला. अटलांटिक महासागराच्या पलीकडे भू-भाग असलाच पाहिजे हें त्याचें वेड. आणि शेवटीं त्यानें इ. स. १४९२ ते ९८ एवढ्या कालांत हजारों मैलांचा महासागर तीनदां ओलांडून अमेरिकेचा शोध लावला ! आणि जग विशाल आहे हें युरोपांतील लोकांना दाखवून दिलें.

२. **फर्डीनन्ड मॅगलन** : इ. स. १४८० ते १५२१—कोलंबसाप्रमाणेंच हा एक धाडसी प्रवासी. समुद्रपर्यटक. यानें इ. स. १५१९ सालीं पृथ्वीप्रदक्षिणेचा घाट घातला व तो तडीला नेऊन भूगोलाच्या आकाराची व स्वरूपाची पूर्ण ओळख करून दिली. या प्रयत्नांत त्याला आपले प्राणहि गमवावे लागले !

३. **जॉन गटेनबर्ग** : मुद्रणकलेचा शोधक. कोलंबसाच्या आधीं पन्नास वर्षें यानें खिळे जुळणीचा प्रयोग करून ग्रंथ छापण्याचें काम सुलभ

करून दिलें. यामुळें कोलंबस व मॅगलन यांनीं पाहिलेला भूगोल व केलेले प्रवास युरोपांतील लोकांत लगोलग प्रसृत झाले. हीच गटेनबर्गची महाविद्या विलियम कॅक्स्टन यानें इंग्लंडांत नेली आणि इ. स. १४७५ मध्यें इंग्लंडमध्यें पहिला छापखाना काढला !

युरोपांतील सर्वच राष्ट्रें खडबडून जागीं झालीं आणि एव्हांपासून तिकडे नव्या युगाला प्रारंभ झाला ! आम्ही भारतवासी मुळांत ज्ञानपिपासू असूनहि या क्रान्तिला पूर्ण पारखें राहिलों. इंग्रजी सत्ता येईपर्यंत आमची काळझोप चालू होती ! बाहेर चक्क उजाडलेलें ! आम्ही गाढ निद्रेंत.

गतकालांत हें कांहीं घडलेलें असो. इंग्रजी सत्ता व ज्ञान यांच्या प्रभावानें आम्ही जागृत झालों. आमची निद्रा साफ उडाली. युरोपीय लोकांच्या धावपळींत आपण फार मागें आहों, याची आम्हांला तीव्र जाणीव झाली ! आम्ही नवा काल ओळखला ! आमची ज्ञानोपासना नव्या दृष्टीनें चालू झाली !

हा सारा इतिहास जवानांना मोठा धीर देणारा व मार्गदर्शन करणारा आहे. ज्या थोर थोर लोकांनीं नव्या युगाचा व क्रान्तीचा पाया घातला त्यांच्यापैकीं अनेकानेक पुरुषांचीं चरित्रें आम्ही वर वर तरी चाळलीं पाहिजेत. कारण, आजच्या तरुण पिढीपुढें एक नवें युग येत आहे. म्हणून मागें पाहात पुढचा मार्ग कायम करावयाचा आहे.

सद्यःकालीं फार पुढारलेलीं व परस्परांशीं तिखट स्पर्धा करणारीं राष्ट्रें दोन. धनाढ्य अमेरिका व झुंझारवृत्तीचा रशिया. अमेरिका म्हणजे संस्थानें असलेली अमेरिका. या राष्ट्राचें आयुष्य तीनशें वर्षांच्या आंत-बाहेर असून इंग्लंड हें त्यांचें मायपोट ! जॉर्ज वाशिंगटन्, बेंजामिन फ्रँकलीन, जेफरसन लिंकन यांसारखे धीर वीर नियन्ते त्याला लाभले ! त्या त्या लोकांच्या बुद्धिमत्तेनें व प्रयासानें या राष्ट्राचें नंदनवन झालें.

हा विचार करीत असतांच गेल्या अर्धशतकांतील अमेरिकेच्या इतिहासाचें अवलोकन केल्यास काय आढळतें ? बुद्धिमत्ता, शास्त्रीय संशोधन आणि त्यामुळें लाभणारें वैभव याची भरती अफाट वेगांत चालू असल्याचें दिसून येतें ! शेती घ्या व्यापार घ्या किंवा उद्योगधंद्यांचे प्रचंड कारखाने पहा. सारेंच अचाट, अद्भुत व मोठें सूत्रबद्ध. पाहावें तेवढें थोडें, विचार

करावा तेवढा थोडा ! महत्त्वाकांक्षी, पराक्रमी, धाडसी व बुद्धिमान लोकांचें भरघोस पीक आल्याचें दिसतें ! यशाची परंपरा अव्याहत चालू ! याला कारणीभूत होणाऱ्या थोर थोर स्त्री-पुरुषांचीं नांवें तरी किती सांगावीं ?

पण या नामावलींत तीन नांवें साऱ्या जगांत गाजत आहेत आणि त्या तिघा नरश्रेष्ठांनीं सवंध मानवजाति सुखी होईल असा अलौकिक चमत्कार करून दाखविला आहे !

हे तीन पुरुष साधारण बहुश्रुत वाचकांना सहज ओळखूं येतील.

१. **टॉमस एडिसन** : प्रख्यात विद्युत्-शास्त्रज्ञ. याचें शालेय शिक्षण अत्यल्प. बुद्धीनें ढ असल्याचा बोभाटा. पण याची बुद्धिमत्ता, कल्पकता व संशोधकदृष्टि एवढी प्रचंड कीं, त्याला तोड नाहीं. यानें आपल्या दीर्घ आयुष्यांत अनेकानेक शोध लाविले व ज्ञानाचे व उद्योगाचे नवे नवे मार्ग दाखवून दिले. **विजेचा दिवा, फोनोग्राफ** व **चित्रपट** हे याचे महान शोध होत. या तीन शोधांमुळें मानवी जीवनांत केवढी अपूर्व क्रान्ति झाली आहे, याचें वर्णन करण्याचें कारण नाहीं. आहारा-विहारांत हा मोठा योगी पुरुष होता. अठरा अठरा तास अविरत काम करणें ही त्याची तपस्या होती. त्याचें तरुणांना सांगणें असे : बुद्धि एक टक्का पुरते. निढळाचा घाम नव्याण्णव टक्के लागतो.

२. **जॉर्ज इस्टमन** : कोडॅक कॅमेरा व फोटोग्राफीचीं इतर अनेक अंगें याचा उत्पादक. एडिसनचा स्नेही. त्याच्याइतकाच कल्पक व संशोधक. आज आमचे अनेकानेक तरुण हौशी फोटोग्राफर म्हणून मिरवीत आहेत ! त्यांपैकीं किती जणांना इस्टमनचें चरित्र माहीत असेल ?

३. **हेन्री फोर्ड** : स्वस्त व उपयुक्त मोटारगाडीचा संशोधक व उत्पादक. सामान्यांतून कोट्यधीश झाला !

वरील तीन नरश्रेष्ठांनीं आपल्या राष्ट्राचें वैभव पराकोटीला पोंचाविलें व मानवजातीचें हित केलें.

वरील तीन नांवांत आणखी एका नांवाची भर घातली पाहिजे.

टेलिफोनचा संशोधक **अ. ग्राहाम बेल** होय. सध्यां दैनिक जीवनांत, व्यापार व उद्योगधंद्यांत व इतर व्यावसायिक दळणवळणांत टेलिफोनच्या व्यवस्थेला केवढें महत्त्व आलें आहे, नाहीं का? पुण्या- मुंबईसारख्या महानगरींत टेलिफोनचें अस्तित्व एकाएकीं बंद पडलें तर केवढा गोंधळ निर्माण होईल? पण हाच महान् शोध लोकांना पटवून देण्यास, आणि त्याचें महत्त्व व उपयोगित्व सर्वांच्या प्रत्ययास आणून देण्यास संशोधक बेल यास किती सायास पडले! त्याच्या या शोधाला तें एक मुलाचें खेळणें आहे, असें सुजाण व व्यवहारचतुर माणसेंहि समजत. बेल साहेबाला वणवण करीत देशोदेशीं हिंडावें लागलें, तरी त्यांना एकदम कोणी आश्रयदाता मिळाला नाहीं.

तात्पर्य, महान् शोधाची बूज होण्यासहि संशोधकाला जिवाचा आटापिटा करावा लागतो. तरुण मंडळींनीं ही महत्त्वाची गोष्ट ध्यानीं घ्यावी. असो.

अमेरिकेच्या सध्यांच्या वैभवाचें व जागतिक प्रतिष्ठेचें मूळ वरील थोर थोर पुरुषांच्या तपस्येंत गुंतलेलें आहे. जवानांकडून चरित्र-ग्रंथांचें वाचन चोखंदळपणें केलें पाहिजे तें याकरितां.

आतां रशियासंबंधीं.

या राष्ट्राच्या भरभराटीचा इतिहास चाळीस वर्षांच्या आंतला आहे. पण यासंबंधींची विवेचनात्मक माहिती बाह्य जगताला मिळावी तितकी मिळत नाहीं. रशिया प्रतिष्ठा मिरवतो : "आम्हीं रामराज्य स्थापन केलें आहे!" त्याची स्पर्धा करणारी अमेरिका म्हणते : "तेथें रावणराज्य चालू आहे."

या दोन विरुद्ध मतप्रचारांत सत्य कोणत्या बाजूला आहे हें काय सांगावें? तें मध्यावर कुठें तरी आहे एवढें मानण्यास हरकत नाहीं. एक गोष्ट सत्य आहे कीं, रशिया एक बलाढ्य राष्ट्र आहे. याची जुळणी व राज्यघटना अभिनव आहे. लेनिननें त्याची स्थापना केली व त्याला मार्गाला लाविलें आणि नंतर स्टॅलिननें आपल्या पोलादी ताकदीनें त्याचा मान व दरारा वाढविला! आज रशिया शेती, व्यापार, उद्योगधंदे शिक्षण व

शास्त्रीय संशोधन या सर्व दृष्टींनीं स्वयंपूर्ण व अग्रेसर वाटतो ! अणुशास्त्रांतील रशियनांनीं चालविलेलें संशोधन व अंतराळांतील अवकाशाचा विजय अभूतपूर्वच आहे, आपण समजेल तेवढें घ्यावें. याचा अर्थच हा कीं, रशिया काय किंवा अमेरिका काय; दोन्ही राष्ट्रें भारतवासियांना श्रेष्ठ व मार्गदर्शक आहेत. असो.

युरोप-अमेरिकेंतील थोर थोर लोकांचीं चरित्रें अवलोकन करितांना जवान मंडळींनीं एक गोष्ट मात्र ध्यानांत घेणें आवश्यक आहे. त्या लोकांचा गुणगौरव करितांना आपण उगीच दिपायचें नाहीं. त्यांच्यापुढें आम्ही कोण ? हें दैन्य कोणीहि मनांत आणतां काम नये, आम्ही तसें होऊं शकतों असें प्रत्ययास आणून देण्याची जबाबदारी मान्य करावी आणि कार्याला लागावें.

आपल्याकडील थोर स्त्री-पुरुषांची चरित्रावलीहि अभिमानास्पद अभ्यासयोग्य व गौरवून सांगण्यासारखी आहे. भारत म्हणजे खंडप्राय राष्ट्र. एक विस्तृत संघराज्य. यांतील कोणताहि भाग घ्या. थोर पुरुषांची परम्परा चालू असल्याचें दिसेल. आमचें पुनरुत्थान व स्वातंत्र्यसंपादन त्यामुळें शक्य झालें आहे. उदाहरणार्थ, प्रथम बंगाल घेऊं.

राजा राममोहन राय, केशवचंद्रसेन, ईश्वरचन्द्र विद्यासागर, स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानन्द, डॉ. जगदीशचंद्र बोस, डॉ. प्रफुल्लचंद्र राय, महर्षी अरविंद, इत्यादि प्रख्यात नांवें डोळ्यांपुढें येतात.

आणि ते आपले जगद्वंद्य कवि रवींद्रनाथ ठाकुर ! साऱ्या जगांत भारताचें नांव उज्ज्वल केलें.

हा उत्तर प्रदेश. पंडित मदन मोहन मालवीय, गोविंद वल्लभपंत, गणेशशंकर विद्यार्थी, हृदयनाथ कुंझरू इत्यादि किती नांवें सांगावीं.

यांत मोतीलाल नेहरू व पंडित जवाहरलाल नेहरू या नांवांची भर घालावी ! आपलें मन भारावून जाईल.

आतां पंजाब. लढवय्या शीख व त्यांचा पंथ ध्यानीं येतो. आर्य समाजाचें संस्थापक दयानन्द सरस्वती, स्वामी श्रद्धानन्द आणि लाला लजपतराय हीं नररत्नें डोळ्यांत भरतात.

राजस्थान. मारवाड भारताच्या अंतर्बाह्य व्यापाराचीं सूत्रें हलविणारे नवकोट नारायण या भूमीने भारताला दिले आहेत.

मद्रासकडे पहा. डॉ. रामन्, डॉ. राधाकृष्णन्, रमण महर्षी, जगांत नाणावलेल्या या पुरुषांचें स्मरण होतें.

म्हैसूर-कर्नाटक म्हटलें कीं, सर विश्वेश्वर अय्यांचें कर्तृत्व डोळ्यांत भरतें.

मुंबईचा पारसी समाज. टाटाकुटुंब नजरेंत भरतें. सर जमशेटजीपासून पाहात जावें आणि दादाभाई नवरोजीपर्यंत यावें. थोर परंपरा चालू आहे.

आणि आपला महाराष्ट्र. यांत आधीं मुंबई आघाडीवर दिसते व मागून पुणें. सर्व समाजांत व थरांत मराठी माणसांनीं नांव गाजविलें आहे. तेलंग चंदावरकर, चौबळ, विष्णुशास्त्री पंडित, लोकहिदवादी, जगन्नाथ शंकरशेट गजानन भास्कर वैद्य, गंगाधरशास्त्री जांभेकर, डॉ. भाटवडेकर इत्यादि नांवें ध्यानांत येतात व मनाला धन्यता वाटते.

आणि यांतून मग पुढची परम्परा पाहावी. रानडे, गोखले, टिळक आगरकर, महात्मा फुले, पंडिता रमाबाई, यांच्या कारकीर्दी डोळ्यांपुढें येतात. अर्वाचीन महाराष्ट्राचा केवढा इतिहास या लोकांनीं आपआपल्या कर्तृत्वानें रचला आहे. ही नामावलि झाली बुद्धिवान लोकांची. याबरोबर ज्यांनीं स्वातंत्र्य-संपादनार्थ जीव तळहातावर घेतले, ते वासुदेव बळवंत, चाफेकर बन्धु, कान्हेरे, स्वा. वी. सावरकर व राजगुरु यांचेंहि स्मरण आपण केलें पाहिजे. यांत त्या त्या थोर पुरुषांचे मार्ग कसे होते, विचार कसे होते व त्यांनीं कोणत्या साधनांचा उपयोग केला याची चिकित्सा करण्यांत अर्थ नाहीं. त्यांनीं शौर्य, धैर्य दर्शवून इतिहास घडविला ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. त्यांच्या कर्तृत्वाचा देशोद्धारार्थ उपयोग झाला यांत शंका नाहीं. न्यायप्रिय, समंजस व सहृदय माणसांना यांचें कौतुक वाटेलच वाटेल. जवानांनीं या दृष्टीनें त्या त्या लोकांचीं चरित्रें पाहावीं. त्यांना त्या वाचनाचा उपयोग होईल.

जगांतील कोणत्याहि थोर लोकांचीं चरित्रें पहा. त्यांत कितीहि भिन्नता असली तरी कांहीं निवडक गुणांचे साधर्म्य सर्वत्र आढळतें ते गुण प्रामुख्यानें असे : शौर्य, धैर्य, माणुसकी, माणसाची पारख, कष्टसहिष्णुता, दूरदृष्टि,

व्यवहारचातुर्य, वचन-पालन, मातापित्यांविषयीं व गुरुविषयीं प्रेमादरभाव, अन्याय-प्रतिकाराची तीव्र इच्छा, भूतदया व स्वसुखनिरपेक्षता.

× × ×

**महत्त्वाची टीप :**

या पुस्तकांतील प्रबंधाच्या शेवटीं जो अभ्यास व पुस्तकें सुचविलीं आहेत, तीं मार्गदर्शनापुरतीच. त्या अनुषंगानें जवानांनीं आपला क्रम निराळा आंखण्यास कांहींच हरकत नाहीं. त्याचप्रमाणें चरित्र-ग्रंथांच्या वाचनाचें. लेखकानें समयानुसार सुचलेलीं नांवें दिलीं आहेत. त्यांत खास निवड नाहीं, थोर पुरुषांची परम्परा प्रचंड आहे. पुढें चालूहि आहे. व्यक्तीनें आपला तरतमभाव वापरून उपयोग करावा. स्वतःहि नांव मिळवून थोर व्हावें.

—लेखक

शा. क्र. १२२९०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३२०९३ वि: १९/४५
क्रमांक ७३०५ नों: दि: २/२/५२

REFBK-0012290